ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com

www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : संगीत उद्योगी सत्यवान उर्फ प्रेमसंसारनाटक

लेखक : बापू बळवंत देवधर

प्रकाशक : बापू बळवंत देवधर, मुंबई

प्रकाशन वर्ष : १९१२

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रूपांतर - २०२१

म. म. दत्तो वामन पोतदार

ग्रंथ संग्रह

दुर्मिळ ग्रंथ

(हे पुस्तक अत्यंत जपून हाताळावे)

लि. प्र. मंडळी कार्यालय,
शा... सभागृह,
स. प. महाविद्यालय आवार,
पुणे-३०.

कै. म. म. द. वा. पोतदार
ग्रंथ संग्रह

प ४१८०२

739

गुणागोविंद-पुस्तकमाला.

पुस्तक ३ रें.

# संगीत उद्योगी-सत्यवान

ऊर्फ

## प्रेमसंसारनाटक.

प्रेमसंसार हा गहन अति रंग वी ।
प्रणय सुखलालसा मनुजमति गुंगवी ॥

डॉ. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

लेखक,


बापू बळवंत देवधर.

१९१२.

[किं० ८६ ] [ पो० निराळें.

(*All Rights reserved by the Publisher.*)

Printed by V. P. Pendherkar, at his Tutorial Press,
3, Charni Road, Girgaon Bombay;
and published by Bapu Balvant Devdhar,
621, Girgaon, Bombay.



लीला—नाहीं, ही उद्योगी–सत्यवान उर्फ प्रेमसंसार नाटकाची

# दोन शब्द.

जगांतील सर्व चराचराकडे प्रेमाळूपणानें पाहणाऱ्यालाप्रत्येकजण आपापल्यापरी आपले नित्य व्यवहार करून आहों त्यापेक्षां जास्त सुखाची व समाधानाची प्राप्ति करून घेण्यासाठीं सारखा झटून राहिला आहे असेंच दिसेल; आणि प्रत्येकाच्या याच इच्छेमुळें जगाच्या उत्क्रांतीची मजल आज फोनोग्राफ, ग्रामो-फोन, इलेक्ट्रिक रेलवेज्, इतकेंच काय पण वायरलेस टेलिग्राफीपर्यंत येऊन पोहोंचली आहे व ती प्रत्यहीं आणखी पुढें पुढें जात आहे. कर्तृत्ववान पुरुषाची स्फूर्ति, त्याची जात किंवा स्थिति यांचा विचार न करितां, त्याच्याबरोबरच जन्मास आलेली असते. फक्त योग्य वेळीं ती योग्य चालनाच्या जोडीचीच वाट पहात असते. ती जोड सुदैवानें योग्यवेळीं त्याला मिळाली ह्मणजे कोणत्याही व्यावहारिक अडचणींस न जुमानतां त्याचा मार्ग त्याच्याकडून कसा नेटानें आक्रमवून ती त्यास जगापुढें आणिते, हेंच या नाटकांत पूर्वीं प्रसिद्ध केल्याप्रमाणें विनोदीपणानें दाखविलें आहे. तें वाचकबंधू गोड करून घेतील अशी उमेद आहे.

प्रकाशक.

पुढील पुस्तक.

# मोरयाचे मोदक.

( येत्या गणेशचतुर्थीस प्रसिद्ध होईल. )

आजपर्यंतच्या पुस्तकांप्रमाणें हेंही अत्यंत मनोवेधक, सुरस व चटकदार होईल. गणेशचतुर्थीचे दिवशीं प्रत्यक्ष मोदकतर घरोघरीं होतीलच, पण हे गुणागोविंदी मोरयाचे मोदकही त्या दिवशीं वाचक बंधूभगिनींस खात्रीनें मिटक्या मारावयास लावतील.

---

## पात्रांची यादी.

**गुणग्राही**... ... ... ... ... ...'गुणग्राही' पत्राचे एडिटर.
**विद्यादेवी**... ... ... ... ... ...गुणग्राहींची मुलगी.
**धुरंधर**... ... ... ... ... ... 'प्रेमसंसार'चे एडिटर.
**सगुणा**... ... ... ... ... ... धुरंधरांची पत्नी.
**लीला**... ... ... ... ... ... ... ,, कन्या.
**कला**... ... ... ... ... ... ... ,, ,,
**विलास**... ... ... ... ... ... एक धनिक तरुण.
**विनोद**... ... ... ... ... ...एक गरीब पण उद्योगी भिकारी.
**कौतुक**... ... ... ... ... ... ,, पण लवाड भिकारी.
यांशिवाय धंदेवाले, कारागीर, म्यानेजर्स, कारभारी, सावकार, नोकर,चाकर वगैरे.

---

# संगीत उद्योगी—सत्यवान

ऊर्फ

# प्रेमसंसारनाटक.

## अंक पहिला.

—:०:—

### प्रवेश १—मुंबई, लव्हर्ली लॉज.

( लीला पियानो वाजवीत गात आहे, कला फिडलनें तिला जोड देत आहे, विलास तबल्याची साथ करीत आहे आणि धुरंधर व सगुणा निरनिराळ्या आराम खुर्च्यांवर पडून ऐकत आहेत. )

[ पद—राग भूप; ताल दादरा. ]

**ॐ अखिलविश्वरंजना ॥ निखिलदुःखभंजना ॥**
**नमो नमो निरंजना ॥ ध्रु० ॥**
**सुनट-नाट्य-नाटना ॥ सुरंग-रंगरंगना ॥**
**गहन-गान-गायना ॥ महन्नाद-नादना ॥**
**रस—विनोद—हास्य—बोध—सुख—विमोद—वर्धना ॥ १ ॥**

**सगुणा**—वाः आज चांगला रंग भरला हो!

**धुरंधर**—विलास, तुह्मीही यांत बरेच तरबेज दिसतां!

**विलास**—लीलादेवी गाऊं लागल्या ह्मणजे मला फार हुरूप येतो.

**लीला**—पण मला यांची साथ मुळींच आवडत नाहीं.

**विलास**—( एकीकडे ) पहा. माझा एक शब्दही ठरूं देत नाहीं!

**कला**—मला विलासांची जोड मनापासून आवडते; पण—

**सगुणा**—‘ पण ’ तें काय आणखी?

**विलास**—पण मला पटत नाहीं. मीच सांगतों ध्याना तें!

**धुरंधर**—( हंसत ) असें का? हंः हंः हंः!

**सगुणा**—( एकीकडे ) अहाहा, काय मौज आहे पहा!

( पद्-राग-बहार; ताल त्रिवट.)

**जगतिं तरुणतरुणीरूपें प्रणय खेळे यापरी ॥ ध्रु० ॥**

**कुठें विनोदें बोले हांसे ॥ कुठें विरोधें टाकी फांसे ॥**

**कुठें सख्य जोडी बहु खासें ॥ कुठें वैर अति आदरी ॥ १ ॥**

**धुरंधर**—लीले, तूं म्हटलंस तें पद तूंच रचलं आहेसस वाटतं.

**लीला**—नाहीं. ही उद्योगी-सत्यवान ऊर्फ प्रेमसंसारनाटकाची नांदी.

**सगुणा**—दुसऱ्याचे प्रेमसंसार ही गाते व इच्या प्रेमसंसार-

**धुरंधर**—इचाही प्रेमसंसार थाटेल. राहतो थोडाच.

**लीला**—( एकीकडे ) कोणाबरोबर थाटेल ईश्वरास ठाऊक!

**विलास**—कांहीं मागण्याविगण्या येऊं लागल्या का ?

**धुरंधर**—हो हो. इच्यासारख्या सुशिक्षित मुलीला मागण्यांचा काय तोटा ? आतांपर्यंत कितीतरी प्रेमपत्रें, प्रणयगीतें, प्रीतिलेख, प्रेमनाटकें, चित्रें-आणखी पुन्हां हे पाठविणारे असे तसे नव्हत, तर—

[ पद्-" फुलवाजी ही० " ही चाल. ]

**कुणि राजे कुणि अधिराजे ॥ कुणि सेनापति कुणी सभापति ॥**

**कुणि विद्याधर कुणी कलाधर ॥ कुणी रसिकनर कुणि योगीवर ॥**

**सर्वांचि सुंदर ॥ आत्मस्तुतिपर॥ म्हणति लीलाधर ॥ मीची साजे॥१॥**

**विलास**—( स्वगत ) एवढ्या गर्दींत मला कोण विचारणार ?

**सगुणा**—लीले, माझ्या मनाजोगी नशीबदार निघालीस बाई!

**विलास**—आणखी घरीं समक्ष येत असतील ते निराळेच !

**धुरंधर**—उंः त्यांची तर खिसगणतीच नाहीं !

**विलास**—( एकीकडे ) तें लीला सांगेल तेव्हां खरं मानतां येईल.

**लीला**—कले, काळजी करूं नकोस. तुझंही असं कौतुक होईलहो.

**कला**—बरं हो. पण माझी काळजी तूं नको करायला ताई!

**धुरंधर**—आपल्या जिनसेला कल्पनेबाहेर मोल देणारीं गिऱ्हाइकें येऊं लागलीं म्हणजे ती अति अमोलिक असेलसें वाटून व्यापारी जसा चकित होतो तद्वतच माझी स्थिति झाली आहे. इच्या अगाध योग्यतेची कल्पनाच होत नाहीं.

**सगुणा**—इच्यासारखी हीच. हलाच द्यावे ते सर्व लेख निर्णयासाठीं.

**धुरंधर**—तिच्याजवळच आहेत सारे ते.

**सगुणा**—होय का ? मग सांग, लीले, त्यांत तूं कोणाला प्रेफरन्स देतेस ?

**लीला**—( हंसत विनोदानें ) मी तर उद्योगी-सत्यवानच प्रिफर करतें.

**धुरंधर**—कां आहे कीं नाहीं ?

**सगुणा**—तिचं नांवच लीला !

**विलास**—( एकीकडे ) खरेंच. बाकी आंत नुसती अवलीलाच ! काय करूं.

[ **पद** "आमद आमद०" ही चाल. ]

**लीलेनें फसविलें ॥ मला भ्रमविपिनीं भ्रमविलें ॥ लीलेनें० ॥ धु० ॥**
**नामरूपाची नटुनि लीला ॥ गूढ मना ठेविलें ॥ लीलेनें० ॥ १ ॥**
**मानित होतों जी गुणशीला ॥ गुण तीनें उधळिले ॥ लीलेनें० ॥ २ ॥**
**मनोराज्य मम प्रणयरताचें ॥ हाय मनांतचि जळे ॥ लीलेनें० ॥ ३ ॥**

( **उघड** ) हा उद्योगी-सत्यवान कोण ? आं, हा उद्योगी-सत्यवान कोण ?

**धुरंधर**--(हंसत) तिच्या प्रेमसंसारनाटकांतला नायक !

**विलास**--हात्तिच्या! मग तो तर कवीच्या अमूर्त कल्पनेचा अमूर्त पुतळा!

**लीला**--कवीची नाट्यकल्पना मूर्त होण्यासाठींच असते.

**सगुणा**--मग तुझा उद्योगी-सत्यवान केव्हां मूर्तरूप धारण करील ?

**कला**--( खोंचून ) या विलासाना तो पाहण्याची फार इच्छा आहे !

**विलास**--( एकीकडे ) ही एक साडेसातीच लागली आहे माझ्यामागें !

**लीला**—त्याची वेळ आली म्हणजे तो येईल. तूर्त आपण तर नटलों आहों !

**धुरंधर**—म्हणजे ? आपला त्याचा काय संबंध ?

**लीला**—तें त्या कवीला माहित! कारण त्यानं पहिल्या प्रवेशकांत पांच पात्रं घेतलीं आहेत व आपणही इथें पांचजण. अन् आपलीं जीं नांवं तींच त्या पात्रांचीं नांवं—धुरंधर, सगुणा, लीला, कला, विलास, हींच--आणखी पुन्हां अशींच भाषणं, असलंच स्थळ व असलाच समय ! !

**सगुणा**—लीले, विनोदबिनोद तर यांत नाहांना कांहीं करीत ?

**लीला**—नाहीं कसा ? प्रथम प्रवेशानंतर आतां तोच—

( तोंच एक नोकर व्हिजिटकार्ड आणून धुरंधरास देतो. )

**धुरं०**—(वाचून) " माझी गोष्ट-विनोद " वाः हा खरोखरीच विनोद तयार

**सगुणा**—ही एक ही, जादूच झाली म्हणायची !

**धुरं०**—(नोक०) एक तासानें त्याला ऑफिसांत येण्यास सांग. (तो जातो.)

**लीला**—योग्य. यांतही विनोदास हेंच उत्तर देऊन सर्व मंडळी उठतात व प्रास्ताविक प्रवेशक येथेंच पुरा होतो. चला उठातर. ( सर्व उठतात. )

**धुरंधर व सगुणा**—लीले, तुझा विनोद तूंच समजावास ! ( जातात. )
**विलास**—(लीला जाते तिच्याकडे पहात ) मी समजतों पण उमजत नाहीं.
**कला**—( एकदम धांवून विलासाचा हात धरून )

[ **पद**–'प्यारा नित नित॰ " ही चाल. ]

**मी करीन सकल प्रियकाम ॥ समज उमज अवघी मजपाशीं ॥**
**मी ज्ञाना विश्राम सुखधाम ॥ मी॰ ॥ ध्रु॰ ॥**
**लीला प्रिय कां कला रुचेना ॥ ( विलास-) कला नसे सुखकाम ॥**
**( कला-) कले विलासाविना सुचेना ॥ ( विलास- ) लीला मम आराम ॥**
**( कला-) मी रामा तूं राम अभिराम ॥ मी ॰ ॥ १ ॥**

( तो हात हिसकून घेऊन जातो. ती पहात रहाते. पडदा.)

---

## प्रवेश २–मोतीबाजार.

**विनोद**—( फिरत फिरत प्र॰ क॰ ) मुंबई पण मुंबई ! अनंत लीलावतारी लीलाधरांच्या लीलांचें विसाव्या शतकांतील संग्रहस्थान, मला वाटतें हेंच ! पूर्वीच्या सर्व मोठमोठ्या शहरांनीं आपापल्या सर्वस्वाचे अलंकार जणूं या मुंबापुरीलाच आणून घातले आहेत ! पुण्यानें आपलें सर्व पुण्य जणूं मुंबईसच अर्पण केलें आहे. साताऱ्यानें आपली सतार जणूं येथल्या मुंबादेवीच्याच हातांत दिली ! खानदेशाची खानदानी, हैद्राबादची आबादानी, दौलताबादची दौलत, वऱ्हाडचें वऱ्हाड, मध्यदेशाची मध्यस्थी, लंकेंतली माया, ब्रह्मदेशचें ब्रह्म, बंगालचें गौडबंगाल, आसामची आसामी, बहारची बहार, पंजाबांतली पंजाबी, सिंदांतली सिंदी--किती किती बोलावें ! सर्व कांहीं जणूं मुंबईतच येऊन राहिलीं आहेत ! दिल्लीची किल्ली, आग्ऱ्याचा अग्र, कानपूरचे कान, सर्वांचा मुंबादेवीच्या विराट देहांत समावेश ! उत्तरेच्या लाटा, दक्षिणेचा दक्षिणानिल, पूर्वेचा पूर्वरंग, प्रतीचीची प्रचीति--जें पाहिजे तें येथें आहे ! किती मोजूं ? किती वाचूं? किती फिरूं ? किती गंमती पाहूं ?

[ **पद**–" जागोरे॰ " ही चाल. " ]

**हें नवजीवनमय स्वर्गद्वार ॥ सुधारणेचा सुखसहकार ॥ ध्रु॰ ॥**
**विविध विविध क्रयम व्यापार ॥ कारभार व्यवहार फार ॥**
**गजबजले पथ ॥ जन उद्यमिं रत ॥ फिरति अश्वरथ वारंवार ॥ १ ॥**

मला कांहीं असा एकादा उद्योग करतां येईल का? मी दोन तीन वर्षांपूर्वीचा असतों तर मलाच खूप हंसलों असतों, पण शरीराबरोबर आज माझें मनही मोठें होत आल्यानें केव्हांना केव्हां मी जगांत वर डोकें काढीनच काढीन असें मला आतां फार फार वाटतें. आज ही माझी उमेद मनोराज्यांतच विहार करीत आहे; पण मनांत गर्भ धारण करते तीच गोष्ट पुढें प्रत्यक्ष जन्मास येते! अहाहा! थोडेसें कोठें लिहितां, वाचतां, कविता करतां व गातां येऊं लागलें तोंच जर माझ्या उमेदीच्या भरारीचा एवढा वेग, तर मग मी मुळींच जंगली नसतों व बाळपणापासून माझें सर्व आयुष्य शहरांतच रंगलें असतें, तर माझ्या उमेदीचें प्रस्थ आज किती तरी माजलें असतें! मग माझा हा असला भिकार अवतार का असता? छत्—

[ पद–" पियु मेरा० " ही चाल. )

**मग रेषा भाग्याची खुलती ॥ येती लक्ष्मी विकास द्याया**
**आनंदें पुढती ॥ रेषा--मग रेषा--अहा रेषा भाग्याची खुलती ॥ध्रु०॥**
**सौंदर्यश्री होती दासी ॥ उपचारांच्या पडत्या राशी ॥**
**नवे चोजले नित्य जिवासी ॥ होतें प्रस्थ अति ॥ रेषा० ॥१॥**
**निशिदिनिं सुख मग पडतें पायां ॥ मानसान्यता होती जाया ॥**
**देवहि येते मज भेटाया ॥ करते सर्व स्तुति ॥ रेषा० ॥ २ ॥**

पण अजून काय गेलें आहे? काळानें आपला ओघ थोडाच बंद ठेवला आहे? सुधारणा देवीनें आपलें द्वारकपाट थोडेंच लावून घेतलें आहे? चंद्र-सूर्यांचें शीतोष्ण सर्वस्व संपुष्टांत थोडेंच आलें आहे? सागर नद्यांनीं आपली माया थोडीच आटवून टाकिली आहे? अरण्यें भिकेस थोडींच लागलीं आहेत? डोंगरपर्वत भुईसपाटीस थोडेच मिळाले आहेत? पृथ्वीनें आपले सर्वरस पोटां-तल्या पोटांत थोडेच ओढले आहेत? नाहीं, नाहीं. वनस्पति वाढताहेत, धान्यें पिकताहेत, खनिज द्रव्यें निघताहेत, अरण्यें आहेत, डोंगर आहेत, शहरें आहेत, कारखाने निघताहेत, शोध लागताहेत, नवीं नवीं भोगसाधनें निर्माण होताहेत, व्यापार थाटताहेत, व्यवहार होताहेत,–सृष्टीची सर्व कांहीं घडामोड सारखी जारीनें चालून राहिली आहे. मग? मग काय? स्वस्थ काय तो मीच! मीं उद्योग केला, नेटानें मेहनत केली, हिंमत धरली तर माझी ही भिकार स्थिति पालटण्यास काय उशीर आहे? ओहो! उच्च विचारांचें जीवन मिळतांच माझा उत्साह कितीतरी वाढला! अहाहा!

[ **साकी**-खमाच रागांत. ]

**आकाशीं जणु मस्तक भिडकें पद घुसले पाताळीं ॥**
**सव्य वाम कर दक्षिण उत्तर वक्ष गिरी सांभाळी ॥**
**पूर्वरंग खुलला ॥ पाठिस पश्चिम देइ बळा ॥ १ ॥**

( आपल्याशींच विचारांत गुंग होतो. तोंच विलास प्र० क० )

**विलास**—कुठें गेली वरं इतक्यांत? इकडेच वळलेली दिसली. ( मागें पाहून ) ती कलेची पिडा चुकली हें बरं झालं. या भिकाऱ्याला विचारूं का? ए ( त्याच्यापुढें पैसा धरून ) अरे हा पैसा घे, विनोद शुद्धीवर येऊन हात पुढें करितो.) इकडून कोणी तरुणी जातांना तूं पाहिलीस का?

**विनोद**—मी इथें आल्यापासून तर कोणी गेली नाहीं.

**विलास**—( एकीकडे ) ट्राममध्यें गेली वाटतें.

**विनोद**—हा पैसा महाराज, मला देऊन टाकला का?

**विलास**—हो दिला मी-- तूं आतां टाक कीं खा, पी, कीं, मौज कर.

**विनोद**—अन् कांहीं उद्योगधंदा केला तर?

**विलास**—एक पैशावर व्यापार! हा अडाणीच दिसतो! **( उघड )** काय पाहिजे तें कर.

**विनोद**—मग आतां महाराज, तुमच्याशींच सौदा. या.

**विलास**—माझ्याशींरे कसला सौदा करायचा आहे तुला?

**विनोद**—आपल्या अकलेचा, महाराज!

**विलास**—हा मोठा खमंग गडीच दिसतो! (उघड) काय पाहिजे तुला?

**विनोद**—आपल्या अकलेपैकीं थोडी अक्कल!

**विलास**—छेः बुवा! माझी आहे हीच अक्कल मला पुरत नाहीं; तर तुला आणखी कुठून देऊं? तुझीच असली तर मला दे. आणखी कोणाच्या मिळतील तरीही मला हव्यात. तरुण मुलींचें प्रेम संपादतांना केवळ एकअकली होऊन भागत नाहीं. तर बेअकली, चौअकली, इत्यादि पुष्कळ अकली व्हावें लागतें.

**विनोद**—मला एकाद्या उद्योगधंद्यापुरतीच अक्कल पाहिजे आहे.

**विलास**—तर मग दुसरी कोणी उद्यमी मंडळी भेटली म्हणजे त्यांना विचार. माझ्या बापजाद्यांनीं कधीं धंदा केला नाहीं व मलाही तो स्वप्नांत ठाऊक नाहीं. ( तोंच निरनिराळ्या धंद्याचे कांहीं लोक प्र० क० )

**कांहीं**—ओहो विलास, आज तुह्मी इकडे कुणीकडे ? नमस्कार.

**विलास**----मी असाच कांहीं नादांत फिरत आहें. बरें झालें तुह्मी भेटलांत मी तुह्मांला बोलावणारच होतों. बरें पण आपलें गोष्टीचें थालीपीठ व नमस्कार चमत्कार वगैरे मग. आधीं या अक्कलवाजाला आपल्या अकलेचा कांहीं चमत्कार दाखवा. त्यालाही तुह्मी आयतेच उपयोगी पडाल !

**मंडळी**--( विनोदास ) काय पाहिजे आहेरे तुला ?

**विनोद**—मला चांगली अक्कल पाहिजे आहे; ती कोठें मिळेल ? ठिकठिकाणच्या या सर्व पाट्यांनाच मी विचारणार होतों पण त्या माझ्याशी बोलतील कीं नाहीं ही मला शंका वाटली ! कारण त्या जाणून बुजून स्त्रीलिंगी व स्त्रिया स्वभावतः लाजाळू व मौनी ! तेव्हां त्या काय बोलणार ?

**कित्येक**—( हंसून ) कशालारे पाहिजे आहे अक्कल तुला? उगाच आमचा वेळ घेऊं नकोस, काय विचारायचें तें लवकर विचार ! आह्मी धंदेवाले लोक !

**विनोद**–वाहवा ! मग तर बरेंच झालें. हें पहा, माझ्या मनांतूनही कांहीं उद्योग करावा असें आहे. एकादा फायदेशीर धंदा सांगता ? हा पैसा मी देईन त्याबद्दल पाहिजे तर तुह्माला ! (मंडळी हंस.) धंदा असातसा नको; तर महाराज,

**अनुष्टुप.**

**खर्च थोडा नका फार ऐसा उद्योग दाखवा॥**
**दूध पात्रीं जरीं थोडें न्हाया पुष्कळसा खवा ॥१॥**

**विलास**–( हंसत ) कां ? आहे कीं हा बिलंदर प्राणी ?

**विनोद**–सांगा महाराज. मीं ह्या पुष्कळ पाट्या पाहिल्यानें माझें मन भांबावून गेलें आहे. एकादें दैनिकपत्र काढून रोज माझी दैना प्रसिद्ध करूं? का 'सोड सोड सोड आतां' असें उच्चस्वरानें गात सोडावॉटर विकूं ? का हॉटेल मास्तरचा फाटेल धंदा करूं ? का जिन्द होऊन जिन बांधू? का गिरगांवच्या गिराची गिरणी काढूं ? का कारागारींची कारागिरी करूं ? का पाजी अर्धोजी करीत भाजी विकूं ? का इराणी होऊन किराणी जिन्नस विकूं ? का गोणीवाला होऊन लोणी विकूं ? का वैद्यशास्त्र्याचें दुकान घालून शस्त्रें विकूं ? का फिटरकटर होऊन हेअर कटिंग सलून घालूं ? का सट्टे करून वट्टयाचे गठ्ठे चढवूं ? का पट्टेगोळा करून लठ्ठ नाटकमंडळी काढूं? का पुजाऱ्याचें दुकान काढून विजारी विकूं? का–

**कित्येक**--हं हं हं ! बाबा, तुझी विद्वत्ता फार वाहवूं देऊं नकोस !

**कांहीं**--(हंसत ) हा 'विश्वावसूची भगिनी सुभद्रा मारुतिनें नेली जशी

समुद्रा ’ ह्मणणाऱ्या शकाराचाच कोणी वंशज दिसतो. ( विलासास ) महाराज, याच्या नादीं लागण्यांत अर्थ नाहीं. आह्माला जाऊं द्या. ( जाऊं लागतात. )

**विनोद**—हें काय ? सांगितल्यावांचूनच यांना जाऊं देतां ? मग हा पैसा कशाला दिलात ?

**विलास**--तो तुला मी खायप्यायला दिला.

**विनोद**-मग हा मला नको. मला उद्योग सांगाल तर घेतों.

**कांहीं**--अरे वेड्या ! कसला उद्योग घेऊन बसलास ? ही मुंबई पाहिलीस ह्मणून हुरळलास; पण आह्मी सांगतों कीं, आह्मीं फसलों आहों तसा तूंही फसशील.

**विनोद**-असें कसें ह्मणतां ? हे सारे लोक फसवे का आहेत ?

**विलास**-तसें नाहीं रे. पण उद्योग करायचा ह्मणजे हंशी खेळ नव्हत.

[ पद -“ निग्रहानुग्रही० ” ही चाल. ]

उद्यमा पाहिजे शक्ति शारीरिकी ॥ शक्तिसार्थकिं पुढें युक्ति लागे ॥
साह्य युक्तीप्रती बुद्धिचें अंत कीं ॥ बाह्यजीवन तिसी द्रव्य लागे ॥
जया संपदा साध्यही साधनांची ॥
तया उद्यमीं प्राप्ति लौकिक धनांची ॥ १ ॥

**कांहीं मंडळी**-यांतलें एक नसलें कीं सर्व फुकट !

**विनोद**-मग या जगांत माझा कांहीं उपयोग नाहीं तर ?

**विलास**-तूंच पहा. तूं कायाहीन, शक्तिहीन, बलहीन, धनहीन-

**कित्येक**-तसें कशाला ? मी ह्मणतों या गोष्टी जरी असल्या तरी काय ?

**कांहीं**-आज उद्योगधंदेवाल्यांचे असे काय मोठे दिवे लागताहेत ?

**विलास**-सगळी झांकली मूठ सव्वा लक्षाची.

**विनोद**-मग मी सांप्रतच पुष्कळ सुखी आहे तर ?

**मंडळी**-हो, हो. यापेक्षां तुझा आहे हा पेषा फार चांगला आहे.

**विनोद**-मग असें करितां ? मी आहे परोपकारी मनुष्य. मला दुसऱ्यांचें वाईट पहावत व ऐकवत नाहीं. माझा हा बरा पेषा तुह्मी घेतां ? मी तुमचा कष्टी पेषा घेतों. अगदीं मनापासून सांगतों मी.

**मंडळी**-हं. हं. हं: असें कांहीं कुठें देतां घेतां येतें थोडेंच !

**विलास**-( स्वगत ) बेटा वस्ताद गडी दिसतो हो. ( विनोदास ) कायरे, आपल्याशींच काय पुटपुटतो आहेस ! (विनोद जाऊं लागतो.) कां चाललास ?

**विनोद**-मला प्रेमसंसार ऑफिसांत गोष्ट घेऊन जायचें आहे. संपादकांनीं

सांगितलेला टाईम होण्याची वाट पहात येथें उभा होतों. तेवढ्यांत जगाची गंमतही पहायला मिळाली. आतां जातों. देव आपलें भलें करो.

**मंडळी**—ह्मणजे तूं भिकारी नाहींसच तर ?

**विनोद**–आतां भिकारीच आहें. उद्योग मिळाल्यावर उद्योगी होईन.

**विलास**-बरें जगाची गंमत पाहिली ह्मणालास तें काय ?

**विनोद**–जगाला कोंपरापासून हात जोडून नमस्कार करावे.

[ **पद**–"भुली भुली में॰" ही चाल. ]

**हें कली कली जग महाकली ॥ दिसे कळवळी परी कळ वळी ॥ध्रु॰ ॥**
**महा विरोधी ब्रीद किं याचें ॥ सदैव उलटें वागायाचें ॥**
**स्वमत कधींहि न देई साचें ॥ वृथा जल्पनीं महाबळी ॥१॥** (जातो.)

**कांहींमंडळी**—हा मोठ्या आंतल्या गांठीचा आहे हो.

**कित्येक**--( विलासास ) बरं महाराज, आह्मांला कां बोलावणार होतां ?

**विलास**—तुमच्यापाशीं एक नाजुक काम आहे. कोणाला सांगतां कामा नये

**कांहीं**---नाहीं नाहीं सांगणार. असें सांगूं लागलों तर आमचे धंदे चालते का?

**विलास**—आज तुह्मी सारे एकसमयावच्छेदेंकरून भेटलांत हें माझें थोर नशीबच ह्मणावयाचें. ती धुरंधुर शहाणे यांची मुलगी सुप्रसिद्ध मिस लीला तिच्यावर माझं मन फार बसलं आहे. तिचं प्रेम संपादण्यासाठीं आजपर्यंत मीं फार खटपट केली व करीत आहें. माझी श्रीमंती टाकून तिचा मी हुजऱ्या-लाळघोट्या-थुंकीझेल्या झालों. पण व्यर्थ; प्रेमवस्तूची जितकी जास्त सेवा करावी तितकी तिची लवकर कृपा होते ह्मणतात; पण मला अगदीं उलट अनुभव येत आहे. दिवसेंदिवस ती माझा जास्तीच तिरस्कार करूं लागली आहे व लीलेच्या या तिरस्काराबरोबर तिची धाकटी बहीण कला, तिचा माझ्यां विषयींचा सोपस्कार वाढत चालला आहे. तेव्हां लीलेचें मन मजकडे वळण्यास व कलेची पीडा टाळण्यास आपापल्या विद्येनुरूप तुह्मीं कांहीं शास्त्रीय किंवा कृत्रिम उपाय दाखवाल ?

**मंडळी**–हात्तिच्या आह्मांला वाटलें होतें कीं, तुह्मी कांहीं मोठा उद्योगधंदा–

**विलास**—छेः छेः तूर्त मला हाच धंदा करायचा आहे. पैशाची वाण नाहीं. लागेल तेवढा खर्चीन पण—

**कांहीं**—ठीक आहे. विचार करून सांगूं. येतों तर. ( जाऊं लागतात. )

**विलास**–तुह्मी सांगेपर्यंत माझा जीव टांगणीवर आहे असें समजा.

**कित्येक**—हरकत नाहीं. सर्व व्यवस्थित होईल. नमस्कार. ( जातात. )

**विलास**—हें एक अनायासेंच काम झालें. अरे अय्यो! पण मघां थोडें चुकलें. तो विनोदी भिकारी अनायासें प्रेमसंसार ऑफिसांत गेला. त्याच्याकडून लीलेची खबर काढतां आली असती. जेथें तेथें माझी अक्कल अशी शेण खाते. वास्तविक या अक्कलेचेच उपाय मीं विचारायला पाहिजे होते. हें पहा ही अक्कलही मला मागून सुचते आहे! कांहीं नाहीं. नशीब किती आडवें जाईल व माझी अक्कल मारील? एक यत्न फसेल,—केव्हां तरी साधेलच साधेल. आतां ती बहुतकरून ऑफिसांतच गेली असेल. तेथून परत निघतांना ती ब्याकबेवर रोजच्याप्रमाणें फिरावयास आली ह्मणजे पुन्हां तिला गांठतों दुरदुरून सेवा झाली, प्रेमपत्रें झालीं, फयाशनचें प्रदर्शनही झालें. यश आलें नाहीं. चिंता नाहीं. मी गर्भश्रीमंत तेव्हां या थाटानेंच मला हें लव्ह अफेअर करायला पाहिजे होतें, पण अजून काय गेलें आहे! आतां त्याचाच प्रयोग!—

[**पद**—राग हमीर.]

**मी विलास रसिक विलासी ॥ सरदार दिलदार**
**गुलजार साचार ॥ नटनटनकला वश मज खाशी ॥ ध्रु० ॥**
**नटुनि थटुनि श्रीमंती शृंगार ॥ नवरदेव सम करीन संचार ॥**
**बघतां लीला होइल मनिं गार ॥ देइल मज प्रणयाचा राशी ॥१॥**

(जातो)

---

## प्रवेश ३–गिरगांव, प्रेम–संसार ऑफिस.

( सर्व मंडळी आपापल्या कामांत गढलीं आहेत. मध्यभागीं खुर्चीवर धुरंधर व त्याच्या पुढच्या टेबलाजवळ पुढच्या बाजूस एकीकडे लीला व कला बसलेल्या आणि एकीकडे विनोद उभा )

**विनोद**—संपादक, तुह्मी लीलाताई, कलाबाई व सर्व मंडळींनो,

( **साकी**-देसझिंझोटी रागांत. )

**अभिनव श्रीयुत अभिनव विलसत अभिनव जीवनदायी ॥**
**अभिनव काया अभिनव माया अभिनव सकल नवाई ॥**
**अभिनव तो देवो ॥ सकळां अभिनव सुख देवो ॥ १ ॥**

**धुरंधर**--तुह्माला मी बोलावलं खरं विनोद, पण आज वेळ नाहीं.

**विनोद**--नशीब माझं. माझीच वेळ भरली तेथें तुह्मी काय करणार?

**धुरंधर**--ह्मणजे? वेळ कसली भरली?

**विनोद**---एक तासानं जगांतून मी कायमचं काळं करणार ?

**धुरंधर**---( थक्क होऊन ) काय काय म्हणतां ? बसा जाऊं नका.

**विनोद**--- या दयेबद्दल एडिटरसाहेबांचा मी आभारी आहें.

**धुरंधर**---मला पुष्कळ काम आहे. लवकरच काय तें बोला.

**विनोद**--मीही कुठें रिकामा आहे ? लवकरच काय तें विचारा !

**कांहीं मंडळी**--( आपसांत ) हा एक विचित्र मनुष्य दिसतो !

**कला**--( स्वगत ) याचा पोषाख विचित्र तसा बोलतोही विचित्र !

**धुरंधर**--तुमचा हा विचित्र पोषाख तुम्हीं लेखक असें सांगत नाहीं.

**विनोद**---मला काय ठाऊक कीं, आपल्याला माझी पोषाखी परीक्षाच घ्यायची आहे, नाहींतर आपल्या भय्याला जसें या कोटपाटलुणांनीं मीं चकविलें तसें आपल्यालाही चकविलें असतें ! परंतु आपण सुशिक्षित म्हणून मीं ही सर्व पोषाखी लबाडी गळ्यांत बांधून घेतली. व खरा पोषाख आपल्या पुढें व्यक्त केला. एडिटरसाहेब माझा हा हजारों ठिगळांचा झगा, ही लक्तरी कफणी, बायकी पोलकें, जुनी बाराबंदी, पारसी कोट, विलायती जाकीट, काठ्यावाडी झोळणा, तुर्की टोपी, कर्नाटकी फेटा, वगैरे सर्व आभरणें मी लेखक हें सुचविण्याकरितां नव्हेत, तर माझी सर्वमान्य सार्वदेशी योग्यता सुचविण्याकरितांच एडिटरसाहेब,

[**पद**– " हें मागें० " ही चाल.]

**मी विश्वविहारी ॥ प्रिय देश वेष भवबे, प्रिय नरनारी ॥ ध्रु० ॥**
**बहुरूपी मी बहुधर्मांचा ॥ बहूवेषधर बहुकर्मांचा ॥**
**बहुभाषी अखिलां वर्मांचा ॥ म्हणुनि मज प्रिय जगतीं सारीं ॥**
**मी अविकारी परी विचारी सुजनाचारीं ॥ १ ॥**

**धुरंधर**--याला वेडा ह्मणावें तर मार्मिक विनोद करतो.

**विनोद**—हं एडिटरसाहेब, मग उगीच का वेळ घालवितां ?

**लीला**--( हंसत धुरंधरास ) पहा, पुन्हां आपल्यावरच शेर !

**कला**—मेला भिकारीतर भिकारी, आणि वात्रटपणा किती करतो !

**धुरंधर**--- कुठें आहे तुमची ती गोष्ट ? आणा पाहूं ? ( हात पुढें करतो. )

**विनोद**—माझी गोष्ट माझ्याजवळच तयार आहे.

**लीला**—मग द्या ती. यांना वाचून तर पाहिली पाहिजे ?

**विनोद**---अजून लिहिली नाहीं. घेणार असाल तर लिहीन.

**मंडळी**—( हंसत ) काय लहरी मनुष्य दिसतो हो हा !

**धुरंधर**---मग तुमच्याजवळ आहे असें कसें म्हणालांत ?

**विनोद**—लिहिली नसली तरी ती मजजवळ असू शकणार नाहीं का ?

**कला**—( आश्चर्यानें) ती कशी बाई !

**विनोद**—कशी म्हणजे ? माझ्या तोंडांत आहे ती !

**लीला**----( स्वगत ) तरुणांना त्यांचा छूडपणा एकेप्रकारें भूषणप्रदच होतो यांत शंका नाहीं. याचें एकंदर वर्तन पाहिलें म्हणजे असें वाटतें कीं,

[ **पद**---" समज पिया मान मोरी० " ही चाल. ]

**हा खचित वीरं गंभीर॥ किति झोंकनोक तरतरीत वीर गंभीर ॥ध्रु०॥**
**स्वैर वाढ जशि नववृक्षाची ॥ मलिनोदकगति जशी पूराची ॥**
**छूड वृत्ति तशि या तरुणाची ॥ अंतरिचा बहु धीर ॥ हा ॥ ० ॥ १ ॥**

**विनोद**---लिहिण्यापूर्वी माझी गोष्ट मी आपणांस तोंडानेंच सांगेन म्हणतों. काय सांगूं? पसंत पडली तर पुढें—

**कला**—(एकीकडे) आमची लीलाताई लागली डोलायला. ( धुरंधरास ) बाबा, आज एका सुरेख वेड्याशींच तुमची गांठ पडली आहे !

**धुरंधर**—( त्रासानें ) सांग, बाबा लवकर सांग. आजचा एकेक क्षण--

**विनोद**--सोन्याचा आहे. खरेंच, माझ्या आयुष्याचीही मला आतां अशीच किंमत आहे. अशा वेळा नेहमीं येत नसतात. चला तर ऐका माझ्या गोष्टींत एक मोठी मौजेची खुबी आहे कीं, ती मी आपणास एका वाक्यांत सांगूं शकेन. हं, चला तर सावधान. माझ्या पोटांतली ती गोष्ट—तें वाक्य बाहेर पडण्यासाठीं ओठांत येऊन दाखल झालें. एडीटरसाहेब, शुभमंगल सावधान ! मी आत्महत्या करणार-- ! !

**मंडळी**—( चकीत होऊन ) काय ? आत्महत्या करणार ?

**धुरंधर**-- अन् हीच का तुमची सुंदर गोष्ट ?

**विनोद**--होय. प्रत्यक्ष गोष्ट चांगली कां काल्पनिक चांगली? इच्या मोबदल्यांत जर आपण माझी प्रेतक्रिया व उत्तरक्रिया यांचा खर्च आंगावर घेत असाल तर ह्या माझ्या आत्महत्येचा इतिहास मी आपणास अथपासून इतिपर्यंत लिहून देईन.

**धुरंधर**-(उठून त्याच्यावर धांवून) मूर्खा! थट्टा करायला आला आहेस, नाहीं

**लीला**-हं हं बाबा, हें काय? त्याला जिवावर उदार होण्याचें कारण विचारा, कांहीं मार्गास लावा, मदत करा. हें असं काय ?

**कला**—असल्या भिकाऱ्याला अन् त्यांतून वात्रट भिकाऱ्याला मदत ?

**विनोद**–( एकदम धांवून लीलेपुढें गुडघे टेंकून ) लीलाताई ! मी पुष्कळ देश फिरलों व अशा अनेक विटंबना करून घेतल्या, पण त्या सर्व तपश्चर्येचं आज तुमच्या दर्शनानं सार्थक झालं. या सगळ्यांत–नव्हे सगळ्यां जगांत दयेचं खरं भांडार एक तुमच्या जवळच आहे. लीला ताई, काय या जगाची स्थिति सांगू?

[ **पद**–"अय मेरे सरदार०" ही चाल. ]

**दीनांची दरकार॥ दिसेना ॥ गुणिजनगुणसहकार ॥ दिसेना ॥**
**कूपमंडूकी ढौल चहुंकडे, प्रेमाचे शेजार ॥ दिसेना ॥ १ ॥**
**मानवहृदयाची ॥ परीक्षा ॥ प्रेममार्दवांची ॥ परीक्षा ॥**
**करील ऐसा जगतीं विरळा, जगताचा आधार॥ दिसेना ॥२॥**

**कला**–ताई याच्या काय नादीं लागतेस ? अरे ए भिकाऱ्या–!

**विनोद**–( उठून मंडळीकडे वळून ) काय भिकारी ! ( धुरंधरास ) एडिटर साहेब, माझी परीक्षा आपण सगळेजण माझ्या पोटाकडे पाहून करतां काय ? तसें असेल तर सांगा-म्हणजे ज्याच्यामुळें माझ्या अमोल हृदयाची किंमत आपणास कवडीची वाटते, त्या या पोटाचाच अंत करून टाकतो.

( टेबलावरील चाकू व कातर दोन्ही हातांत घेऊन स्वतःवर उगारतो.)

**मंडळी**—हां, हां, हां, बराच वैतागी दिसतोस तूं !

**लीला**—( आपल्याशीं ) याला एकंदर पारखून पाहतां याचें कुलशीलही फार उच्च असावेंसें वाटतें. कारण,

[कामदाच्या चालीवर.]

**मधुनि मधुनि मी यांशीं बोलतें ॥ हास्य लास्यही युक्त योजितें ॥**
**शुद्धबुद्धि हा किमपि ना चळे ॥ सुजनशीलता क्षणहि ना ढाळे ॥ १ ॥**

**विनोद**—एडीटरसाहेब, आपण बोलत कां नाहीं ?मी आपल्याकडे आलेला आहे. 'माझी सुंदर गोष्ट' येथेंच संपली असें आपण मानतां काय ?

**लीला**--बाबा, कांहीं बोला त्याच्याशीं. गरीब आहे.

**कला**--गरीब ! असले दोन चार गरीब एकत्र झाले तर लवकरच--

**धुरंधर**----खालींतर बसा. मी एकदम तुमच्यावर उसळलों खरा; पण तुमच्या पहिल्या बोलण्यानं कोणालाही सहज राग येतो कीं नाहीं हें तुम्हीच सांगा.

**विनोद**·--मला सांगावें कसें व ऐकावें कसें हीं दोन्हीं समजत नाहींत !

**लीला**—बरं तें जाऊं द्याना ? तुमची सुंदर गोष्ट पुढें सांगा.

**विनोद**–माफ करा ताईसाहेब. माझ्या मानी गोष्टीला योग्य मान लागतो.

**धुरंधर**–(हंसून) बरं बुवा; मी विचारतों. आपण आत्महत्या कां करितां?

**विनोद**–आत्महत्या एवढीच कांहीं माझी गोष्ट नव्हे. हा तर तिचा एक लहानसा पहिला भाग आहे. दुसरे दोन भाग–

**लीला**–तेच, तेच, आह्माला ऐकण्याची इच्छा आहे.

**कला**–ताई, तुझा हा लुबलुबपणा केव्हां तरी तुला चांगलाच नडेल बरं. चांगले राजे–

**लीला**–जाऊं देग ते राजे? या राजापुढें त्यांची किंमत नाहीं.

**कला**–( स्वगत ) अस्सं अस्सं कां?

**विनोद**–( चमत्कारिक रीतीनें हंसून ) माझी सुंदर गोष्ट इतकी मनोवेधक व चटकदार होत चालली हें पाहून मला धन्यता वाटते. एडिटर साहेब,

[ पद–राग केदार. ]

**जाँग मी हतदैव ॥ हतबुद्धि सिद्धिहत ॥ वश न विभव ॥**
**दुखद होइ भव ॥ परिभव करित निदैव ॥ ध्रु० ॥**
**वाली नसे कुणी जनीं ॥ न यत्न साधन ॥**
**नच उत्तेजन ॥ उलटचि काळ सदैव ॥ १ ॥**

**धुरंधर**—एकूण आजचा कांहीं तुमचा हा नवाच उद्योग नाहीं.

**विनोद**–नाहीं महाराज, मी सर्व उद्योग करून भागलों आहें, अनेक गांवचें पाणी प्यालों आहे व आतां शेंवटीं जिवावर उदार झालों आहे!

**धुरंधर**–तुह्माला खरोखर आयुष्याचा कंटाळा आला आहे?

**कला**– (उपहासपूर्वक ) हो हो तर? सगळीं ब्रह्मांडं मावतील एवढी ही टोपी, हा चारी खंडांतल्या गोळा केलेल्या चिंध्यांचा बोंगा, ही कथा, हा सर्व जोजार, आयुष्याचा कंटाळा आला आहे ह्मणूनच! ( मंडळी हंसतात. )

**लीला**–ऐक, ऐक कले; सभ्यपणाला हें शोभत नाहीं वरं.

**विनोद**–एडिटर साहेब, विचार कसला करितां? मी आपल्या सर्वस्वावर आतां उदार झालेलों आहे. पाहिजे तर माझी परीक्षा घ्या, हें माझं लाजीरवाणं पोट फाडून यांतलं शुद्ध काळीज तुमच्यापुढं काढून ठेवूं? हें माझं भणाणलेलं दुर्दैवी मस्तक फोडून त्यांतला अनंत ज्ञानांनीं व अनुभवांनीं झाळलेला माझा मेंदू आपल्या तळहातावर देऊं? का अनेक पर्यालोचनांनीं दिव्य झालेल्या या माझ्या डोळयांतल्या बाहुल्या आपल्या लीलाताईना खेळायला देऊं?

**कला**—( विनोदानें ) त्यांच्याशींतर ही केव्हांपासूनच खेळते आहे !

**लीले**—( लटका राग दाखवून ) कले, तूं वाहवूं नकोस हो फार.

**विनोद**—एडिटर साहेब, लीलाताई, तुम्ही सर्व मंडळी, कोणी बोलत कां नाहीं ? सांगा.काय पाहिजे ? माझ्या मनांतलें मनन, श्रवणांतलें श्रवण, हातांतली हतोटी, का पायांतला पायगुण पाहिजे ? बोला बोला, मी कसला त्याग करूं ? तोंडांतले दांत, घशांतली जीभ, कपाळांतली कवटी, डोळ्यांतलं बुबूळ, कानांतला पडदा, नाकाचा शेंडा, पाठीचा कणा,--बोला, बोला, महाराज,

[ **साकी**--जोगी रागांत. ]

**विनोद आतां क्षणिक सोबती उरली एकचि घटिका ॥**
**बहु मोलाचा विनोद त्याचा नंतर होईल कटिका ॥**
**काळ पुढें धांवे ॥ झडकरिं इच्छित साधावें ॥ १ ॥**

**धुरंधर**—काय बोलावें आतां याच्यापुढें ? आपण तर थक्क झालों !

**मंडळी**—आमच्या अंगावरही कांटा उभा राहिला आहे.

**लीला**-( स्वगत ) अरेरे !

[ **पद** — " कुरबान किया० " ही चाल. ]

**जड जीव होइ गुणि बाळा कलिकाळाचे घरीं ॥ ध्रु० ॥**
**छंदि फंदी बैलनंदी सदानंदी सुखमरंदीं ॥**
**धिक् देवा धिक्क दैवा धिक् न्यायाची परी ॥ हो ॥ जडजीव०॥१॥**

**विनोद**-एडिटर साहेब, हा नुसता थक्क होऊन बसण्याचा विषय नाहीं. काय तो विचार करा व करवत नसेल तर स्वच्छ ' नाहीं ' ह्मणून सांगा.

**कला**-तुझी चालते व्हा कसे ?

**धुरंधर**-नको; तुह्माला लिहितां वाचतां कितपत येतं आहे ?

**लीला**-( स्वगत ) वाहवा ! वाहवा ! माझ्या मनांत आलेली गोष्टच जुळून येते आहे !

**विनोद**--बेतापुरतें—अजून कलमेच्या कवाइतीचा अभ्यासच चालला आहे. तोंडाच्या तोफेची डागदारी मात्र उत्कृष्ट साधली आहे.

**मंडळी**--( हंसत ) साधली आहे खरीच बाबा !

**धुरंधर**--शरीरसंपत्ति तर सुदृढ आहेना ?

**विनोद**--त्यांत कांहीं कमी नाहीं. चांगला धष्टपुष्ट—

**धुरंधर**—तर मग कांहीं हरकत नाहीं.

**विनोद**–ह्मणजे ? मी खुशाल आत्महत्या करूं ?

**कला**–मग दुसरें काय समजतां तर ?

**धुरंधर**–छेः छेः भलतेंच ? मीं ह्मटलें, येथें तुमच्या चरितार्थाची सोय—

**विनोद**–हं, एडिटर साहेब ! पुन्हां जर आपण माझ्या चरितार्थाची गोष्ट काढाल तर मी इथल्या इथेंच जीव देईन ! अहो,

[ **दिंडी**–हमीर रागांत. ]

**उदर भरणाची काळजी न मातें ॥ तिचें आशाळू जनांशींच नातें ॥**
**अन्नपूर्णा ही सृष्टि आह्मां खाशी ॥ जगीं आधाशीं ते सदा उपाशी ॥१॥**

**कला**–ओहोहो ! केवढा साधूपणा हो हा !!

**मंडळी**—इतके तृप्त आहां तर येथें भीक मागायला कशाला आलांत ?

**विनोद**–( मंडळीस ) तुमच्यासारख्यांसाठीं बाबांनो. ( ते ओशाळतात ) एडिटर साहेब, या पोटाच्या पलीकडे जी कांहीं माझ्यांत खोट आहे ती मला भरून काढायची आहे.

**धुरंधर**–हो; पण त्यासाठींही पोटाची सोय पाहिजेच. आधीं पोटोबा मग विठोबा.

**विनोद**–हो; पण विठोबा ओळखणाराला पोटाची खोट वाटत नाहीं.

**धुरंधर**–( लीलेस ) याला आपल्या इथें ठेवूं ह्मणतों.

**कला**–कशाला ? एकाद्या दिवशीं धावं मारायला ?

**विनोद**–( तोंच ) मला कांहीं उद्योग हुन्नर शिकायचा आहे !

**लीला**–इथें राहत असल्यास तो शिकण्याची सोय होऊं शकेल.

**विनोद**––मग मी आत्महत्या करीत नाहीं; झालें माझी सुंदर गोष्ट–

**मंडळी**—( हंसत ) किती वस्ताद आहे पहा हो ! !

**धुरंधर**—तुम्हांस काय शिकण्याची इच्छा आहे ?

**विनोद**––तें माझें मी शिकेन. मात्र आपण शिकूं द्या ह्मणजे झालें.

**धुरंधर**—ठीक आहे तर; या मग उद्यांपासून.

**विनोद**––पण माझी एक अट आहे. ती कबूल होईल तर--

**कला**—पहा, आहे कीं नाहीं ? अन्नछत्रीं जेवायचं आणि मिरपूड मागायची

**लीला**—ऐक ऐक ग कले; ( विनोदास ) तुमची काय अट आहे ?

**विनोद**—नोकरीच्या वेळेखेरीज इतर वेळीं मी कोणाचा बांधलेला नाहीं.

**धुरंधर**––कबूल. एवढेंच ना ? आणखी तर कांहीं तक्रार नाहीं ?

लीला--( स्वगत )

[ पद्-" रुमझुम ठुमठुम० " ही चाल. ]

रमणी चिमणी मम मनीं मूर्ति ही ठसली ॥ मम प्रीति विनोदाकार पूर्ण नटली॥
भवभविष्यसूचक सुखदचित्रपट बघुनि मती रमली ॥ ध्रु० ॥
गुण-निधान हें या वाण पुरस्काराची ॥ पुरुषार्थयंत्र कीं गरज सुगतिदात्याची ॥
सुखयशोभानु हा वाट बघे उदयाची ॥
हा उद्यम मी होऊं का साह्यता सगळी ॥ भवभविष्य० ॥ १ ॥

विनोद-पगार काय मिळेल तेंही सांगून टाकावें. रोख पाहिजे.

धुरंधर-तो तुमच्या योग्यतेप्रमाणेंच मिळेल; रोख मिळेल.

विनोद-अन् वढती बिडती ?

धुरंधर—ती पण या सर्व मंडळीप्रमाणें तुह्मांलाही मिळेल.

विनोद-या सर्व मंडळीपेक्षां मीं हुषारी दाखविली तर ?

धुरंधर—मग यांच्यावरची जागा तुम्हांला देईन व माझ्या जोडीस घेईन.

विनोद—अन् पुढें आपल्यावरोवरीनें मीं काम केलें तर ?

धुरंधर—( रागावून ) हें काय ? मला खेळवितोस वाटतें ?

कला-नोकरीवर राहिला नाहीं तोंच हीं लक्षणं ! बाबा, विचार करा बरं.

विनोद-रागावूं नका साहेब. मनुष्य आहे, तो काय करील व काय नाहीं याचा काय नियम आहे? ह्मणून विचारतों. आधीं करार केलेला बरा.

मंडळी-( आपसांत ) कां आहे कीं नाहीं वस्ताद !

धुरंधर—तसें झालें तर माझी जागा तुला देईन.

विनोद-अन् पुढेंमागें आपल्यापेक्षांही हुषार झालों तर ?

धुरंधर-( हंसत. ) मग तुह्माला माझ्या मालकीचा मालक करीन. पुढें ?

विनोद-पुढें काय ? पुढें फिरतां कामा नये.

लीला—फिरायचें काय त्यांत ? तें तुमच्या कर्तबगारीवर आहे.

विनोद--माझी कर्तबगारी मी वाढल्या कलांनीं दाखवीन.

लीला--(स्वगत ) आमची तीच पाहण्याची इच्छा आहे.

धुरंधर-तर मग या उद्यांपासून. ( सर्व उठतात. )

विनोद--ठीक आहे. मग मी रजा घेतों. हें नक्की झालेंना? ( धुरंधर मान डोलवून हुंकार देतो, ) बरें आहे तर जयजय. ( जातांना ) एडिटरसाहेब, तुह्मी लीलाताई आणि ( कलेस ) तुह्मीही अन् तुह्मी सर्व मंडळीनो,

[ पद--"जलद-नलद०" ही चाल. ]

**सुखद होऊ निसर्गाची प्रगतिपर ती प्रकृति ॥ ध्रु० ॥**
**अभयवर मिळो सुधारणेचा ॥ प्रसाद लाधो सु धारणेचा ॥**
**छंद निपजवो सुधारणेंचा ॥ देवो श्री ही घी धृति ॥ १ ॥** (जातो.)

**धुरंधर**—(तो गेल्यावर पुढें येऊ०) मनुष्य मोठा उमेदी व होतकरू दिसतो.

**कला**—आमच्या ताईला त्याचं कौतुक फार वाटलं.

**मंडळी**—ताईचं पुरें. त्यांच्या भोळ्या स्वभावाला असले भोंदू-

**लीला**--उगीच टवाळी करूं नका. त्याला योग्य उत्तेजन मिळालं तर तो संपूर्ण मानवजातीचं एकादं उपयोगी कार्य करील असा तो मोठ्या मनाचा, मोठ्या प्रयत्नाचा व मोठ्या महत्वाकांक्षेचा कार्यकारी पुरुष होईल असं वाटतं.

**मंडळी**–काय ह्मणाल तें खरं. ( धुरंधरास ) ठीक आहे जयजय. (जातात.)

**धुरंधर**--हो या. ( ते गेल्यावर ) चला. कोणीकडून जायचें ?

**लीला**–तुम्हीं जा. आह्मी थोड्या फिरून मग येतों. (तो बरं ह्मणून जातो.)

---

## प्रवेश ४–व्याकवे.

**लीला**–(कलेशीं वो०) कां कले, पाहिलेंस ? जगांत किती तरी रत्नं अशीं–

**कला**–पुरे ताई ! तुला त्या भिकाऱ्याचं एवढं काय महत्व वाटतं कोण जाणें. अग, नाटकांतले विदूषक देखील अशीं सोंगं करतात !

**लीला**—कले, हीच का तुला माणसाची परीक्षा ? अग,

[ पद--" पिअरवा ते हारी० ही चाल. ]

**हा वहनि भिकारी वेषधर, तरुण दीन पोर, दिसतो लघु मूर्ती**
**तरि खचित मन थोर थोर ॥ हा० ॥ ध्रु० ॥ नयन ते तेजालंकार,**
**होई मन गार, शब्द मधुर वर्ण सुंदर गौर ॥हा०॥१॥ वदतसे विनोदी**
**बोल, अर्थ बहु खोल, या न मोल, डौलदार किशोर ॥ हा० ॥ २ ॥**

**कला**---पण मग मी असं विचारतें कीं मग हा असा भिकारी कां राहिला?

**लीला**–कले ! ही भाग्यरेषा बाई ! कांहीं हिरे उकिरड्यांत मातीखात पडलेले असतात, कांहीं सुंदर फुलें रानांतल्यारानांत सुकून जातात, कांहीं ठेवी जमीनीच्या पोटांतच पुरलेल्या राहून मातीस मिळतात, कांहीं साधू हिमालयांतल्या हिमालयांतच पडलेले असतात, तशींच कांहीं नररत्नें आजन्म भिकार स्थितींतच आयुष्य घालवून काळाच्या दाढेंत गडप होतात !



**कला**—ते अलंकार नकोत मला, हे नकोत अशीं तुझीं प्रेमपत्रं —

पृ. १९.

The "Lakshmi Art"—Bombay.

**कला**-झालें तर. हा तरी त्यांतलाच किनई! शेवटीं असाच गडप होणार!

**लीला**—नाहीं. हा प्राणी त्यांतला नाहीं. त्याचं नशीव जर असं फुटकं असतं तर तो आज असा प्रगटच झाला नसता. आपल्या बाबांकडे त्याचं येणं झालं यांत खरोखर कांहीं ईश्वरी इच्छा आहे असंच मी समजतें.

**कला**-मग झालं; बाबांनीं त्याला नोकरी दिली. आतां पुढें हा काय करणार?

**लीला**-त्याच्या उमेदी भाषणावरून त्याची धांव एवढीच का तूं समजतेस?

**कला**-मग काय? अग, सरडा धांवून धांवून किती धांवणार?

**लीला**-कले, जगाच्या सुधारणेची धांव सरड्यासारखीच का कुंपणाशीं येऊन थांबली आहे? वेळ आली ह्मणजे मोठे उत्क्रांतीचे वाद करतेस, पण आज पाहतें तों सरडयाच्या पुढची उत्क्रांतीही तुला दिसत नाहीं!

**कला**—नाहीं कां? मला सगळी दिसते आहे!

**लीला**—मग सरड्याच्या प्रमाणांत असलेल्या विनोदाच्या स्थितीची योग्य मार्गानें चालन दिल्यास उत्क्रांति होणें अशक्य आहे का?

**कला**-मग तिला तूं काय चालन देणार?

**लीला**-माझ्या मनांतून विद्यार्जनाच्या कामीं त्यास पूर्ण मदत—

**कला**-हं: हं: ताई! ही भिकेची हांडी शिक्याला लागणें—

**लीला**—भीक असेल तर भिकेच्या हांडीची काळजी! तो श्रीमंतच आहे!

**कला**—एकूण लीलेच्या प्रेमानं विनोदावर झडप घातली वाटतं?

**लीला**—विनोद लीलांचं आकर्षण अपरिहार्यच असतं!

**कला**-अन् मग विलास...ताई, त्याला तूं तसाच का झुलत ठेवणार?

**लीला**-तो माझ्या कलाबाईसाठीं; माझ्यासाठीं नाहीं.

**कला**-ताई, पुरेहो ही लपवालपवी! तूं विलासाशीं करीत असलेला विरोध मला दाखविण्यापुरताच असतो हें मी समजतें.

**लीला**-नाहीं बरं कले, ही तुझी समजूत चुकीची आहे.

[ **पद** " देवे उसीका भला०" ही चाल. ]

**लीला विनोदीं रमे ॥ तिजला विलासीं सुख ना गमे ॥ ध्रु० ॥**

**कला विलासास्तव निर्मियली ॥ विलासही तिजसाठीं श्रमे ॥ १ ॥**

**कला**—ते अलंकार नकोत मला, हे नकोत अशीं तुझीं प्रेमपत्रं--

**लीला**—हो चालतात. हीं पहा तीं. बरंच झालं घे खात्री करून. (पत्रें दा०)

( वाचीत वाचीत पलीकडे जातात विनोद व विलास प्र० क० )

**विलास**—तर मग आजपासून पुढें तुह्मीं भिकारी नाहीं. नोकर झालांत.

**विनोद**-नोकर काय, देव करील तर लौकर मालकही होईन.

**विलास**-बरं पण कायरे. लीला-संपादकांची मुलगी-अजून उठली नाहीं का·

**विनोद**-हो, हो! ती व एक दुसरी केंव्हांच माझ्यापुढेंच बाहेर पडल्या.

**विलास**-मी त्यांचीच वाट पहात आहें.

**विनोद**-त्या इकडेच वळल्या होत्या.

**विलास** – इथेंही मी मघांचा चोहींकडे पहात फिरतों आहें.

**विनोद**—अहो! त्या एडिटरच्या मुली; कुठें एकीकडेच कुठें बसल्या असतील. या बागांतून तुह्मीं पाहिलें का?

**विलास**—छेः बुवा, तीच पहायची राहिली आहे!

**विनोद**—चला तर आपण बोलत बोलत तिकडेच जाऊं. ह्मणजे तुमचेंही काम तुह्मांला अनायासें करतां येईल. पण काहो, मोतीबाजारांत तुमची भेट झाली होती तेव्हांही तुह्मीं अशाच कुणांचा शोध करीत होतां.

**विलास**—हो आतांही तिचाच शोध करीत आहें.

**विनोद**—कां बरं, तिचा इतका शोध करण्याचं कारण? तिचा तुमचा संबंध?

**विलास**—तो कांहीं प्रेमसंबंध आहे. तें तुला काय करायचं?

**विनोद**—नकोच. मला उद्योग्याला तें प्रेमाचं झोटिंग नकोच!

**विलास**-ओहो! केवढा मोठा उद्योगी! मग ब्याकबेवर कशाला आलास?

**विनोद**—उगीच गंमत पहायला. लोक परीक्षणांत मोठी गमतीची–

**विलास**-पुरे, पुरेकर आतां तुझी ती गंमत. (लीला दिसतांच) माझी गंमत मला सांपडली!

**विनोद**—कुठें आहे? (पाहून) खरंच--काहो महाराज,

[ **पद**--" मै अल्ला॰ " ही चाल. ]

**नवरसमय नवरसिका कोण ही बरें॥ अहा कोणही बरें॥**
**मोहाची मोहिनीच काय अवतरे॥ ध्रु॰॥**
**अंतरंग-रंगाची रंग साउली॥ अहा रंगसाउली॥**
**ललितांची ललितकला सगुण जाहली॥ अहा सगुण जाहली॥**
**सुखविनोद-हास्य-अलंकार माउली॥ अहा खचित माउली॥**
**विषयांची विषया कीं नाकळे खरें॥ १॥**

**विलास**—अरे, हीं मी मघां तुला विचारीत होतों तीच! पण कायरे, तूं प्रेमसंसारांत जाऊन आलास अन् ह्मणतोस ही कोण?

**विनोद**—अहो,तेथें माझी गोष्ट मी रंगवू का तेथल्या माणसांकडे पहात बसूं?

**विलास**–पण तूं तर मोठा रंगेल गडी दिसतोस! आतांच तुझं हें कवित्व व मघांचं तें 'खर्च थोडा, नफा फार' हें कवित्व या दोहोंत केवढा फरक!

**विनोद**–हं, हं, हं. माझं काय? पुढें रंग दिसेल तसा मी रंगून जातों.

**विलास**–(स्वगत) अहाहा! मला जर असं कवित्व येत असतं तर मी लीलेला सहज वश केलं असतं. अरे हो! पण आतां ती याला तर नाहींना भाळणार? नाहींतर हा रंगेल भिकारी तिची शिकार साधायचा!

**विनोद**-महाराज, ही दुसरी कोण आहे तिच्याबरोबर?

**विलास**–ही तिची धाकटी बहीण. ती अवकळा तिच्या बरोबरच आहेच!

**विनोद**–छेः छेः आपली उतरती कळा असेल ह्मणून ती आपल्याला अवकळा वाटते; बाकी,

[**दिंडी**–राग लीलांबरी.]

**राजभोगांची मूर्ति राजसा ही ॥ रजोगुणमय लक्षणीं पूर्ण पाहीं ॥**
**रोमरोमीं श्रृंगार करी चाळा ॥ जगीं सुविलासी त्यांस योग्य बाळा ॥१॥**

**विलास**–अस्सं, अस्सं! एकून ही मला सोंपून तिच्या बहिणीवर झडप--

**विनोद**–छेः छेः महाराज, भलतेंच! केवळ या पायीं आपली शक्ति व बुद्धि खर्चणारा मी नंव्हे समजलांत? ही काय अन् ती काय! यायच्या असल्या तर दोघी पायां पडत येतील.

**विलास**–बरं आतां चूप. चल तिकडे जाऊं. (लीलेस) या विलासाचा गुड् डे.

**लीला**–तुह्मी आहांतच का पुन्हां इथं?

**विलास**–हो हो तर; तुह्माला सोडून मी कुठं जाणार?

**कला**–आठवण करतांच पुढें उभे. यांना शंभर वर्षें आयुष्य असो!

**लीला**–विनोद तुमची भरभराट होवो.

**विनोद**–थोरांचीं मनं अशींच थोर असतात.

**विलास**–(स्वगत) कला आयुरारोग्य देते व लीला विचारीतही नाहीं!

**विनोद**-(स्वगत) अहाहा, सुधारलेल्या शृंगारांनीं सजलेल्या असल्या या मुली कितीपण फॅशनेबल दिसताहेत? खरोखर,

[**पद**–"माधव मोहनाम०" ही चाल.]

**या युवति नसति फुलबाग गमती ॥ प्रति अवयविं सुमनें फुकलीं अति ॥**
**सुमनांसचि जीं जगिं गंधवितीं ॥ ध्रु० ॥**
**हृदयें नच परि ह्हृदची सारे ॥ स्मितहास्याचा वायु भरारे ॥**
**मुख कारंजें, बोल फुवारे ॥ सौंदर्यश्री सुप्रसन्न किति ॥ १ ॥**

**विलास**-( लीलेस ) संध्याकाळीं छत्री कशाला ? आणा, ती मी मिटून घेतों.

**लीला**-( रागानें ) नको. मला मिटतां येते आहे बरं.

**कला**-( ठुमकत ) ही घ्या माझी छत्री मिटा. ( छत्री पुढें करते. )

**विलास**-( फेंकून देऊन ) ही छत्री नाहीं मला लावतां येत.

**विनोद**-(लीलेस) वाः ही प्रेमाची भातुकली खूप आहे !

**लीला**—मला मोठा त्रास झाला आहे हा. काय करावं ?

**विलास**—कले, तुझं पुढें पुढें करणं मला मुळींच नको. साफ सांगतों.

**लीला**—तुम्हीही माझ्या पुढें पुढें अगदीं करूं नये.

**विलास**—कबूल; तूं सांगशील तर तुझ्यापासून दहा हात दूर राहीन, पण,

[ **पद**-"है गझल तेरा०" ही चाल. ]

**मी करित प्रेमयाचना ॥ येउं दे दया मना ॥ ध्रु०॥**
**नांवानें मी सुंदर ॥ रूपहि बघ हें सुरुचिर ॥**
**वाणीही मृदुल मधुर ॥ बहुसुलक्षणी न उणा ॥ १ ॥**
**भाग्यानें भरलें घर ॥ विद्येनें विद्यावर ॥**
**लौकिकांत पदवीधर ॥ आश्रय मी सर्व गुणां ॥ २ ॥**

आतां इथें घर नाहीं, कॉलेज नाहीं, लायब्ररी नाहीं, ऑफीस नाहीं, दुकान नाहीं, कारखाना नाहीं. या बागेंतही अजून कोणी नाहीं. तेव्हां काय तें सांग. तुझं स्पष्ट मत ऐकण्यासाठींच मी तुला इथें गांठलं.

**लीला**-माझं मत मीं यापूर्वीं पुष्कळदां प्रदर्शित केलं आहे.

**विलास**—तें सारं मुग्ध मुग्ध ! माझी सेवा मुग्ध, तुझी संभावनाही मुग्ध. त्यांत लटका विनोद, लटका राग, अनेक भानगडी !–

**लीला**—विलास, प्रेमासारखी नाजूक व अमूल्य वस्तु योग्य पात्र व योग्य अधिकार पाहून द्यावयाची असते—नाहीं का ?

**विलास**-मग माझी योग्यता व अधिकार–

**विनोद**-तें ज्याचं त्यानं आतां समजावं.

**विलास**-तूं कशालारे मध्यें तोंड घालतोस भिकारड्या !

**कला**-मला पटलीं आहेत सारीं तीं. (विलास रागावतो) आपल्याला माझं पुढें पुढें रुचत नसेल तर मी आपल्यामागेंच नेहमीं राहीन पण, (गुडघे टेंकून)

[ **पद**-" सुजे जबरजबर०" ही चाल. ]

**दे प्रेम प्रेम-सुखठेवा, कर करिं दे, करीं किंकरी, घे सेवा,**
**विलास विलासी कला उदासी ही प्रेम ॥ ध्रु० ॥**

तवप्राप्तीस्तव सद्गुणशीला ॥ सोडिन मी जगिं निज गुणशीला ॥
लौकिकही मिळवीन धुळीला॥ पापपुण्यभय मज नच तिळभर ॥ दे० ॥१॥
कांस धरूं का मी मरणाची ॥ योनी घेऊं का भूताची ॥
मम जीवाशा तुजवर साची॥ जन्म जन्म मी विलाससहचर ॥ दे ० ॥२॥

**विलास**—( मध्येंच स्वगत ) ही मनुष्य आहे का राक्षसीण ?

**विनोद**-( लीलेस ) हा प्रेमसंचार का भूतसंचार ?

**लीला**-चांगलं. जशास तसं भेटलं आहे.

**विलास**—( स्वगत ) ही जन्मोजन्म भूत होऊन माझ्या बोकांडीं बसूं पाहणारी अवकळेची कला मला प्रेमसंसाराचं सुख देणार ! ( तोंड फिरवतो. )

**कला**—महाराज, प्रेमभिक्षा तर दूरच राहिली. पण गोड नेत्रकटाक्ष व प्रेमळ शब्द एवढ्यापुरतं औदार्यही आपण कलेच्या पायीं खर्चीत नाहीं ?

**विलास**—या भिकाऱ्याकडे जा. यांनीं तुझे पाय धरावे.

**विनोद**-महाराज, कलेच्या भिकारी पुरस्कर्त्याला कला व लीला दोन्ही मिळतात. श्रीमंतांना एकटी लीलाही शेवटपर्यंत मिळत नाहीं.

**लीला**—( विनोदास) योग्य योग्य बोललांत.

**विलास**-( एकीकडे ) अरे याला पुढें होऊं देतां उपयोगी नाहीं. (उघड) हा भिकारडा आहे, व मी मनुष्यांत झांकलं माणिक व देवांत हरीचा लाल आहें. परीक्षा घेतल्याशिवाय एकाद्याशीं बोलतां?

**एक भिकारी**—(प्र० क० ) अरे कोणी खरा मनुष्य आहे ? हरीचा लाल आहे ? ( जरा थांबून ) अरेरे ! कोणी बोलत नाहीं ! !

**विनोद**-( पुढें होऊन ) नाहीं कां ? मी आहे ना ? अरे,

[ साकी " सोरठ रागांत. ]

मनुष्यदेही मनुष्यवृत्ति, मनुष्यलोकीं वसतों ॥ अरे मी ॥
ईश्वरदृष्टीं अवघी सृष्टी ईश्वरमय ही बघतों ॥ अरे मी ॥
तूंही ईश्वरची ॥ अवघें जो हें विश्व रची ॥१॥

**लीला**—( स्वगत ) अगबाई ! ही कांहीं निराळीच व्यक्ति दिसते !

**भिकारी**—( स्वगत ) अशीं माणसं आहेत ह्मणूनच जग चालतं.

**विनोद**—बोल तुला काय पाहिजे ?

**भिकारी**—उघडा फिरतों. एकादा कपडा--वस्त्र—

**विनोद**—हा घे. (आंगांतला वरचा कोट वगैरे काढूं लागतो. )

**लीला**—कां ? विलास, आणखी निराळी परीक्षा घ्यायला हवी का ?

**विलास**-यांत कसली परीक्षा? यापेक्षां कितीतरी भारी किंमतीच्या वस्त्रांच्या प्रेमभेटी मीं तुला पाठविलेल्या आहेत !

**लीला**—समजत नाहीं म्हणतात तें यालाच.

**कला**-विलास, मला तुह्मीं कांहीं दिलं नाहींत, तरी मी तुमच्यावर प्रेम-

**विलास**-( तोंड वेंगाडून ) पुरे पुरे, ह्मणे तुमच्यावर प्रेम—!

**भिकारी**—( विनोदास. ) भल्या गृहस्था, तुझ्या या पोषाखावरून तूंही--

**विनोद**-हो भिकारीच--मात्र तात्पुरता; पिढीजाद नव्हे.

**भिकारी**-कां बरं? कुठं उद्योग वियोग पाहतां आहां वाटतं.

**विनोद**-हो; पाहिला आहे, पहातों आहे, चाललें आहे.

**भिकारी**-मग तुह्मालाच ठेवा हे कपडे. तुह्मी उद्योगी झालांत ह्मणजे आह्माला पुढें पुष्कळ मिळतील. आज आह्मी तुह्माला मदत करायची का उलट नागवायचें; कांहीं नाहीं तुह्मी गोड बोललांत हेच मला कपडे मिळाले. आह्माला दुसरीं गिऱ्हाइकं पुष्कळ आहेत! मी जातों. तुमचा जय असो.(विलासाकडे वळ.)

**विलास**-अरे अरे. ज्याला मी भीत होतों तेंच शेंवटीं -विनोदाशीं मेथकूट करूं लागली. मला काय ठाऊक भिकाऱ्यास असे कपडे दिलेले हिला आवडतात ते! नाहींतर मी मघांच भिकाऱ्यापुढें सपशेल नागवा झालों असतों. अहो भिकारीबुवा! या घ्या; माझें सर्वस्व तुह्माला देतों.

**भिकारी**-मीं आपला ऋणी आहे महाराज.(विलास कपडे दागिने काढतो)

**विनोद**-(लीलेशीं) माझी एकंदर अशी हकीकत आहे. आई, बाप, आप्त इष्ट मित्र कोणी नाहीं. हीं चारं अक्षरें भीक मागतां मागतां भल्या लोकांच्या कृपेनें विचारून विचारून शिकलों.

**लीला**-आपल्या गोष्टीचा पहिला भाग तुह्मी छान रंगविलांत. पुढचे भाग--

**विनोद**-तें तुमच्यासारख्या सुशिक्षितांच्या मदतीवर—

**लीला**-माझी पूर्ण मदत तुह्मास मिळेल, माझी लायब्ररी मोठी आहे. व प्रयोगशाळाही चांगली आहे. मी सर्व साधनें तुह्मास पुरवीन. मला येत आहे तें तुह्माला शिकवीन व नवें तुह्माला लागेल तें मी कुठून शिकून येऊन तुह्माला शिकवीन. फार काय सांगू, विनोद,

[ पद-" सुख एक अवनिमां० " ही चाल. ]

**उद्योग तुह्मी मी साधनता॥ कार्य तुह्मी मी क्षमता॥**
**जीवभाव तुह्मि मी ममता॥ ध्रु०॥**
**परब्रह्म तुह्मि जगीं सुखमूर्ती॥ मी माया द्यावयास स्फूर्ती॥**

तुद्धि युक्ति मी शक्ति विषमां विषम समां समता ॥१॥

**विनोद**–माझं भाग्य थोर ह्मणून तुमचा लाभ झाला.

**लीला**–बरं आतां जेवाल कुठं? पैसे आहेत का? कुठून असणार! संकोचतां कां? हा घ्या रुपाया. शिवाय आतां जातांना भवानी हॉटेलांतही तुमची ओळख करून देतें. तेथेंच रोज जेवीत जा. बिल मग मी पाहीन. खायचे हाल अगदीं करूं नका. कारण आतां आपल्याला पुढें अनेक अभ्यास करायचे आहेत.

**विनोद** तुह्मी दाखविलेल्या सहानुभूतीबद्दल मी तुमचा आभारी आहें. पण तुह्माला सांगायचं एवढंच कीं, नेहमीं मला माझ्या पायांवर उभं करून चालवा. कारण तुह्मी आज आहां व तुमचं मनही थोर आहे; तेव्हां मला तूर्त कसली ददात पडणार नाहींच. पण तुह्मी उपवर, आतां दोन दिवसांच्या सोबती; उद्यां तुमचं लग्न झालं ह्मणजे–

**लीला**–लग्न! आतां तुमच्यावांचून माझं–( लाजून खालीं पहाते. )

**विनोद**–अहाहा! हें मी काय पाहतों व ऐकतों आहें!

[ पद–" दिल किसिकू० " ही चाल. ]

**जगिं नवक नवल लोलुपता तरुणतरुणींची ॥**
**प्रथमदर्शनींच सहज लुब्ध उभयची ॥ ध्रु० ॥**
**प्रकटविती आत्मभाव उभयही कसे ॥ प्रेमाची जन्मगांठ सिद्ध होतसे ॥**
**कुणिकोणा दृष्ट न श्रुत परि महा पिसें ॥ पूर्व जन्म स्मृतिच गमे स्फुरवि अभिरुचि**

**लीली**–( विनययुक्त ) चला, आपण तिकडे फिरूं?

**वि०**-कलाबाईना हांक मारूं का? ओहो, ते उदारकर्ण पहा त्या भिकाऱ्याला-

**लीला**–ते तसेच आहेत. चला ती लीलाही नाहीं यायची. ( जातात. )

**विलास**–कां? भिकारी बुवा! आतां मी आहें कीं नाहीं उदाराचा उदार?

**भिकारी**–हंः हंः हंः हंः! हें काय विचारायचं. दुसरे कर्णाचे अवतार!

**कला**–एकादा शेला प्रेमाच्या खुणेदाखल मला का द्याना?

**विलास**–होहो तर? चल शेला कशाला? तुलाच भिकाऱ्याला देऊन टाकतों. ( वेडावून ) म्हणे मला शेला द्याना का?

**कला**–( आपल्याशीं खजील होऊन )

[पद–" देवा मज तारीं०" ही चाल.]

**अहा प्रीतिच्या लहरी ॥ मूढ गूढ गोड, विषारी ॥ ध्रु०॥**
**कोणि ईस लत्ता मारी ॥ त्यास अर्पि मत्ता सारी ॥**
**पाय धरी गोंजारी ॥ त्यास मदें दूरी सारी ॥ १॥**

**पडद्यांत**—अहो तिकडे चला, तो पहा कुणी भिकाऱ्यास भुरळला आहे.

**कला**–( पडद्यांत पाहून स्वगत ) अग बाई, आतां मात्र इथें राहण्यांत अर्थ नाहीं. याच्यावरोबर माझीही शोभा व्हायची! ताई! थांब मी आलें.

**विलास**--( ती गेल्यावर ) कां? आतां मी उदार आहें कीं नाहीं?

**भिकारी**—हो, हो; तें काय विचारावं? आपलं देव भलं करो. (जातो.)

**विलास**---हंः हंः हंः! मी उदारांचा राजा झाल्यानं एकादी मोठी बहादुरी केल्याप्रमाणें या वेळीं मला धन्यता वाटत आहे. आतां लीला मला पसंत न करून काय करील. (इकडे तिकडे पाहून) अरे कुठें गेली ही? लीले कुठें आहेस? नाहीं. इकडे कुठें दिसत नाहीं. मग मी इकडे उदार होण्याच्या नादांत असतांना ती विनोदावरोबर निघून गेली कीं काय! बरं कलाही दिसत नाहीं. कले, कुठें आहेस? हाय हाय! तो भिकारीही गेला. आतां कसं होईल. मला वाटत होतं कीं मी आतां उदाराचा राजा झालों कीं लीला माझ्यावर फिदा होऊन मला गाडींत बसवून आपल्या घरीं नेईल व आपल्या आवडीचा प्रेमपोषाख मला देईल; मग तो घालून मी थाटानें घरीं जाईन. पण आतां कोणत्या तोंडानें घरीं जाऊं? ती कला असती तर तिचं तरी पोलकं आंगांत घालायला व शाल डोकीस गुंडाळायला मागून घेतली असती!

**पडद्यांत**—चला चला, तो पहा आतां वेड्यासारखा करतो आहे!-

**विलास**–(पाहून ) अरे बापरे, घरची काळजी दूर राहिली. आधीं इथेंच फजीती होण्याची वेळ आली. हे लोक इकडे लोटताहेत. आतां इथून पळ काढला पाहिजे. काय फजीती पहा!

[ **पद**–" मनुष्य धारूं०" ही चाल. ]

**लीला गेली कलाहि गेली आली हीन स्थिति॥ मला ही आली हीन स्थिति ॥**
**बंदुक गेली शिकार गेली कोल्हे कुइ करिती ॥ तैसे जन हंसती ॥ ध्रु०॥**
**अप्सराहि ना कुब्जाही ना कामक्रोध छळिती ॥ मनाला गुद्दमार देती ॥**
**अत्र नाहीं परत्र नाहीं भूताचीच गति ॥ मला ये भूताचीच गति ॥ १ ॥**

( कपाळ बडवीत धांवत धांवत जातो )

**पडद्यांत**—ओहो तो पहा धांवला. तिकडेच चला. तिकडेच चला. (पडदा)

## [अंक पहिला समाप्त.]

# अंक दुसरा.

—:०:—

## प्रवेश १—चर्नीरोड.

( विनोद   कौतुक समोरासमोरून प्र. क. )

**कौतुक**–ओहोहो, विनोद, अगदीं अचानक भेटलांत ? इकडे  कुणीकडे ? तुमच्याकडेच मी निघालों आहें.

**विनोद**–धुरंधरांना माझे शोध दाखवायला मी निघालों आहें.

**कौतुक**–शोध! विनोद, तुह्मीं शोध लावले  आहेत? आणखी असें कां पहातां ? ओळखलें नाहीं का मला ? मी कौतुक—

**विनोद**–आठवत नाहीं. पण पाहिल्यासारखं वाटतं.

**कौतुक**–सहा महिन्यांपूर्वी आपण ज्याला मनुष्यपणाची परीक्षा--

**विनोद**–अस्सं अस्सं ! ते भिकारी ? आपलं नांव कौतुक ?

**कौतुक**–( मुद्दाम टोंचून ) जी होय श्रीमंत. तोच मी भिकारी.

**विनोद**–( त्याच्या खांद्यावर हात ठेवून ) छेः छेः मी अजून श्रीमंत झालों नाहीं व तुह्मीही आतां भिकारी नाहीं. दोघे सारखेच आहों. ( भेटतात. ) हल्लीं कुठं असतां ?

**कौतुक**–मी विलासांच्या घरीं असतों. विलास तुह्मी ओळखतांच.

**विनोद**–होय. पण त्यांचे धनी कीं नोकर ? त्यांचे कपडेलत्ते तुह्मीं–

**कौतुक**–नेले होते; पण हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागतात त्याच-प्रमाणें लीला कला गेल्यावर ते माझ्याचमागें लागले. तेव्हां मला ते द्यावे लागले. त्याचे उपकार म्हणून मला त्यांनीं आपल्या घरीं ठेवून घेतलं.

**विनोद**–उपकारस्मरण कशाला ! लालुच म्हणाना ? बरं पण आज सहा महिने कुठं कधीं भेटलां नाहीं ते ?

**कौतुक**–बाहेर गांवच्या कामावर त्यांनीं मला पाठविलं होतं.

**विनोद**–बरोबर ! तुम्ही फजीती बाहेर सांगाल म्हणूनच; जुळलं.

**कौतुक**–आपणांस धुरंधराचा छान आश्रय मिळाला.

**विनोद**—धुरंधराचा–ठीक आहे. झाडाखालचा देव पावला म्हणजे झाडाचीही पूजा करतात, तसे धुरंधरांचेही आभार मानले पाहिजेत हें खरं; बाकी दीनोद्धाराची खरी कळकळ धुरंधराच्या सगळ्या कुळांत एकट्या-

लीलादेवीलाच; या सहा महिन्यांत तिनें माझ्या शिक्षणाची, खाण्या-पिण्याची, कपड्यालत्याची व शरीरस्वास्थाची जी आस्थापूर्वक व्यवस्था लाविली ती सांगतां पुरवत नाहीं. आज अवघ्या सहामाहिन्यांत माझी जी प्रतिष्ठा वाढली आहे ती तिच्यामुळेंच !

**कौतुक**-( स्वगत ) उगीच नाहीं कुणी कोणाला मानीत. कांहीं सैल व्हावं लागतं. ( उघड ) पूर्वजन्मींची आपली देणेंदारीणच ती ! वरं ती कला?

**विनोद**-ती लीलेचीच वहीण. ती तरी कमी कशी असेल? अन् आतांशा ती माझ्यावर फारच प्रेम करते.

**कौतुक**-मजा आहे बुवा तुमची. लीला, कला—

**विनोद**-अन् तुमची काय नाहीं ? तुह्मांला विलासाचं घबाड—वरं मी जातों; मला जरा घाई आहे. मग पुन्हां भेटूं. आतां येथेंच आहों. नमस्कार.

**कौतुक**-नमस्कार—( तो गेलासें पाहून ) या विनोदाला पाहून व त्याची वाढती प्रतिष्ठा ऐकून माझ्याही मनांत एक महत्वाकांक्षा आली आहे. हा उद्योगानं प्रतिष्ठा मिळवील तशी विलासाच्या पैशानं मलाही वडेजावकी मिळवितां येणार नाहीं का ? पण माझ्या या विचारांत कांहीं चूक तर नाहीं ना होत? कारण तो भिकारी व मीही भिकारी. मग विचारांत फरक कां ? उंः ! एकाच पावसानें, एकाच जमीनींत, एकाच हवेंत, भिन्न भिन्न वनस्पती वाढत नाहींत का?आतां विनोदाचा मार्ग न्याय्य का माझा? विनोदाचा. माझ्यांत दोष आहे. मग ? मग काय ? तद्दोष परिहारार्थ 'उंः'!! अनायासें श्रीमंताची संगत मिळाली आहे. तेव्हां हा प्रयोग करून पाहूं. शिवाय सगळेच विनोदा-सारखे प्रयोग करूं लागले तर हे प्रयोग तरी कुणीं करावे ? बस्स ठरलं.

**विलास**-(प्र. क.) कायरे, कसल्या नादांत आहेस ?

**कौतुक**-कांहीं नाहीं महाराज, देवाची उभ्या उभ्या प्रार्थना करतों कीं, आज सहासात महिने माझ्या धन्यानं मला बाहेर हिंडविलं, पण आतां तरी मला कुठें दूर करूं नये. मला त्याच्या पायाचा अखंड सहवास फार आवडतो.

**विलास**-अगदीं मनापासून बोलतोस कां हें पण ?

**कौतुक**-इतकी परीक्षा घेऊनही अजून असं विचारतां ?

**विलास**-मग चल, मझ्या एका महत्वाच्या कामांत मला साथीदार हो. घरीं कोणास कळूं नये ह्मणून तुला इथं येऊन उभा राहण्यास सांगितलं होतं.

**कौतुक**-सांगा; एका पायावर माझी तयारी आहे.

**विलास**–मिस लीला व तीजवरचं माझं प्रेम—

**कौतुक**–ह्मणेज ? ती प्रेमाची रडकथा अजून चाललीच आहे का ?

**विलास**–होय; अजून ती मला वश होत नाहीं.

**कौतुक**–कां वरं; एकाद्या राजाबिजावर तिचं प्रेम बसलं आहे ?

**विलास**–छेः रे, ती राजालाही दाद देत नाहीं.

**कौतुक**–मग महाराज, ती आपल्याला कशी वश होणार ?

**विलास**– ( वेडावून ) 'क्यशी व्यश होन्यार.' यःकश्चित् विनोद भिकाऱ्याला ती वश होते अन् आपल्याला ह्मणे 'क्यशी व्यश होन्यार' !

**कौतुक**–तिला भिकारीच आवडत असतील तर प्रेमी उमेदवार होऊन तिला वश करण्याचा प्रयत्न मी करूं ? मी भिकारीच आहें.

**विलास**–( रागावून ) काय काय ह्मणतोस ?

[ **पद**– राग सोरठ. ]

**दिसशी शिकारी ॥ जरि तूं भिकारी ॥**
**मधुर बोल ॥ अर्थ खोल ॥ ध्रु० ॥**
**अतिवंचक कुटिल काग ॥ तुज कैचा प्रेमभाग ॥**
**जगिं विलास पुण्यभाग ॥ लीलाविहारी ॥ १ ॥**

**कौतुक**–तसें नव्हे महाराज. तिला वश करून मग आपल्याच स्वाधीन करीन ह्मटलं. चाकर आपली लूट धन्यालाच देणार !

**विलास**–हुं, तें कबूल. तुझी युक्ति मला पसंत आहे.

**कौतुक**—पण महाराज समजा कीं, तिला वश करून मीं आपल्यापुढें नजराण्यादाखल रुजू केली पण तिनें मग आपल्या गळ्यांत मिठी मारिली नाहीं तर ? कारण ती कांहीं दगडी अंतःकरणाच्या हिरेमाणकांचा नजराणा नव्हे, कीं ते ज्याच्याजवळ द्यावे त्याच्या गळ्यांत पडतील !

**विलास**–तेंही खरंच; मग कसं करणार ?

**कौतुक**–या विचारालाच मनांतून हांकलून द्या.

**विलास**—( रागानें ) तूंच जा कसा; पावला तुझा नजराणा.

**कौतुक**—( निराळाच अर्थ घेऊन ) ठीक आहे. आज्ञाप्रमाण. मी या घटकेस जातों व लीलेस वश करून घेऊन जोड्यानें आपल्या दर्शनास येतों.

**विलास**—( त्यालाजातांना पाहून ) अरे, यानं भलताच अर्थ घेतला. (त्याला परत बोलावतो.) अरेए कौतुका, चाललास कुठं? मी तसं नाहीं ह्मणालों.

**कौतुक**—मग आपण चलतांका तिला वश करायला.

**विलास**-कौतुका, आतां थट्टा थट्टातरी किती करशील ?

[ **पद**-" अवनी नही०" ही चाल. ]

**विनती तुला या काळीं ॥ शरणांगत मित्रा सांभाळी ॥**
**हो मज वाली ॥ मित्रारे ॥ हो मज वाली ॥ ध्रु० ॥**
**तुज ठाउक मम लज्जा सारी ॥ अससी विचारी ॥**
**सद्गुणशाली ॥ हो मज वाली॥ मित्रारे ॥ हो मज० ॥ १ ॥**

**कौतुक**--महाराज, आपल्यासारखे हताश होऊं लागले तर मग आह्मी काय करावं ? आपल्याला द्रव्य अनुकूल, माणसं अनुकूल,-

**विलास**-अरे मी तुला द्रव्य देतों, माणसं देतों. तूं करतोस फत्ते ? कसेंही करून विनोदाचा पाडाव केला पाहिजे; मग लीला आपलीच समज.

**कौतुक**-मग घ्या एक बातमी. विनोदानं कांहीं शोध लावले असून तो आतां धुरंधरांच्या घरीं ते दाखविण्यास गेला आहे, जातां तेथें ?

**विलास**-छेः मी आज सहामहिने झाले तेथें जात नाहीं. बाहेरच्याबाहेर त्यांना-तेंही एकट्या पाहून भेटतों.

**कौतुक**-मग हा बाहेरून मोर्चा तरी भक्कम ठेवाल ? आंतून तटाचा पाया पोखरण्याचं काम मी करतों. चला या घटकेलाच सुरुवात. मुजरा.

**विलास**--मुजरा-मलाही हेंच साहाय्य हवं होतं; आणखी एक गोष्ट सांगून ठेवतों. कलेचं माझ्यावर मन बसलं आहे. व लीलेच्या नादीं लागून मी तिला सारखा झिडकारीतच आहें. व अजूनही लीलेबद्दलची साफ निराशा होईपर्यंत झिडकारीतच राहीन; पण तूं सिद्धसाधकी पद्धतीनं तेंही संधान साधून ठेवायच, होता होईतों आधीं लीला. नाहींतर मग कला-

**कौतुक**-कशाला ? लीला कला दोन्ही घ्या-मुजरा. (जातो.)

**विलास**-' युद्धस्य कथा रम्या' ह्मणतात; पण अनुभव पाहिला तर युद्धस्य पेक्षां प्रेमस्य कथाच रम्या! युद्धकलेवर पद्धतशीर ग्रंथ झाले आहेत, नियमित नियम ठरले आहेत, बरीच बांधली गेलेली व्यवस्था आहे. पण या प्रेमकलेच्या कलाकुसरीला पारावारच नाहीं. कादंबऱ्या, नाटकें, काव्यें वाचाच वाचा--प्रेम-संसार अफाट पसरलेला दिसतो. रोज अनेक नवरंग व अनेक नवीन युक्ति या सारख्या निघताहेत! लीलेचा हृदयदुर्ग सर करण्याकरितां आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सर्व युक्त्यांच्या पलीकडच्या प्रयुक्त्या मीं योजल्या. आज आणखी ही

एक नवीन कौतुकी युक्ति योजीत आहें. ही यशस्वी झाली तर काय बहार होईल !

[ पद--" मारा घेर काम०" ही चाल. ]

लीला कला ॥ लोकीं मिळतील दोन्हीं मजला ॥ ध्रु० ॥॥

लीलाकलामय जगिं प्रेमसंसार ॥ जरि लाभला ॥

लोकीं ॥ बहु चांगला॥ लोकीं ॥ मिळतील दोन्ही०॥ १ ॥ ( जातो. )

---

## प्रवेश २--धुरंधरांचा लव्हली लॉज.

( धुरंधर, सगुणा, लीला, कला व विनोद बोलत आहेत. )

**धुरंधर**-कां विनोद, आज मुद्दाम इकडेसे !

**विनोद**-माझ्या सुंदर गोष्टीचा आतां दुसरा भाग सुरू करायचा !

**सगुणा**-आतां सुरू करायचा ? मग या सहा महिन्याभर—

**विनोद**-सहा महिने तयारी चालली होती.

**धुरंधर**—मग आतां झाली का तयारी ?

**विनोद**—तयारी झाली ह्मणून तर आलों साहेब !

**कला**-मागचे वेळीं आत्महत्येच्या प्रकरणापासून सुरवात केली होती तसा या वेळीं कोणत्या प्रकरणापासून प्रारंभ आहे ?

**विनोद**-या दुसऱ्या भागाचं नांव शोधकांड असं आहे !

**सगुणा**-शोधाकांड ह्मणजे ? कांहीं शोधबोध-

**विनोद**-जी होय. मीं बरेचसे शोध लावले आहेत-ते

**धुरंधर**-तूं शोध लावले आहेत ? पहिल्यासारखा विनोद नाहींना यांत?

**विनोद**-छत् विनोदाचं पहिलं स्वरूप पूर्ण पालटलं आहे. साहेब,

[ पद--" धिमि धिमतक० " ही चाल. ]

पळपळपळ पळत काळ काळ ॥ चलविचलत जगतजाल ॥

अभिनव अवतारमाळ ॥ ध्रु० ॥

पूर्वकाळचा विनोद ॥ वर्तमानीं हो प्रबोध ॥

तोचि करित पुढिल शोध ॥ साह्य विश्वपाळ ॥ सर्वकाळ ॥ १ ॥

**सगुणा**-कला सांगत होती तें खरंच तर मग ?

**धुरंधर**-काय सांगत होती ?

**कला**-हा नेहमीं कांहींना कांहीं करीत असतो. कोणाच्या टेबलाजवळ कामास आला तर तेथलीं बुक्स, वह्या हींच चाळून पाहील, प्रेसपाशीं गेला

तर त्यालाच हालवील, आमच्या मागें लागून लागून लायब्ररींतलीं बहुतेक पुस्तकं चाळून टाकलीं. लीलाताईला रोज विचारून विचारून दोन तीन भाषा यानं क्याचप केल्या. मला शिकवाल का ह्मणून माझ्या पाठीस लागलाच आहे!

**धुरंधर**–खरं काहो विनोद ?

**लीला**–आतांच पहाना ? घटकेंत येथल्या नकशीकामाकडे व पिक्चर्सकडे न्याहाळून पहात आहे तर घटकेंत बसलेल्या खुर्चीचा आर्मच मोजीत आहे. घटकेंत बुटाच्या ठोकरीनं जमीन अजमावून पहात आहे तर घटकेंत जवळचा कोचच किती भक्कम आहे हें हालवून पहात आहे. नेहमीं असं चालतं. केव्हां सूर्याकडे किलकिल्या दृष्टीनं पाहील तर केव्हां गरगर फिरून पक्ष्याच्या धांवीच पाहील. कोठली माती उकरील तर कोठल्या पाण्यांत उतरून तळांतले दगडच पाहील, कधीं आकाशांतले ढग मोजील तर कधीं तारेच मोजील, आतां या झाडाचीं फुलं हुंगील तर उद्यां त्याचं पानच चावील!–( विनोदाकडे पाहून) तें पहा, आहेच एक पान हातांत.

**धुरंधर**—वा: बरेच उलाढाली आहांत तर?

**सगुणा**–तें हातांत काय आहे!

**विनोद**–ही एका दिवसाची डायरी आहे!

**धुरंधर**–एयढी सबंद चोपडी एका दिवसाच्या डायरीला?

**सगुणा**–मग आतांपर्यंतच्या रोजच्या डायऱ्यांची तर मोठी रास झाली असेल.

**विनोद**—असेल काय? आहेच. आणखी ती वाढतच आहे!

[पद–" जुमेरात आज० " ही चाल.]

**नयनांत ज्ञानसविता उगवला ॥ स्मरणास लेश तरही न उरला ॥**
**विज्ञानमार्ग झाला मज खुला ॥ ध्रु० ॥**
**दिवस पुरेना रात्र पुरेना ॥ विचार-अनुभव कधीं सुटेना ॥**
**मग बोधांची कैंची दैना ॥ शिक्षाचा बाजार पसरला ॥ १ ॥**
**काय करूं मज दोनचि डोळे ॥ एकेकचि हीं करपदयुगलें ॥**
**श्रवणहि दोनची मनहि एकलें ॥ रोम रोम शक्तीनें स्फुरला ॥ २ ॥**

**कला**–(स्वगत) ही उमेद, हें तेज, विलासांत एक दिवसही दिसलीं नाहींत!

**सगुणा**–असं या डायऱ्यांत काय भरलं आहे ?

**धुरंधर**–अहो हा विनोद; याच्यावर काय विश्वास ठेवायचा?

**विनोद**-एडिटरसाहेब, विश्वासानेंच दुनया चालते व श्रद्धेनेंच ब्रह्म-प्राप्ति होते. जें जगांत भरलं आहे तें सर्व या माझ्या डायऱ्यांतून आहे गूढशक्ति, अचाट युक्ति, अगम्य अनुभव, प्रचंड व्यापार, विलक्षण उलाढाल, गुप्त शोध, महान् तत्वें—किती किती सांगू?

**धुरंधर**-पाहिलेंत? मी ह्मणत नव्हतों कीं हा विनोदी विनोद आहे!

**कला**-एकदां पहा तर खरं. मग बोला.

**लीला**-इतके इतके वाजतां जेवलों, निजलों, उठलों, असल्या पांचट हकीकतीचं इतरांसारखं हें बाड नव्हे. यांत सृष्टीचा जमाखर्च आहे.

**सगुणा**-काय काय व किती शोध लावले आहेत तुह्मी!

**विनोद**-काळ अनंत, जग अफाट, यांतील शोधांची संख्या मी काय सांगूं शकणार? व तुह्मी काय मोजूं शकणार? पावलों पावलीं, निमिषानिमिषास पंचभूतांच्या घडामोडी चालून राहिल्या आहेत जितक्या घडामोडी तितकेच शोध.

**कला**-तुह्मी सगळ्या घडामोडी पाहतां काय?

**विनोद**—होय. काळ माझ्यापाशीं पोट उकलतो.

**धुरंधर**—आणा पाहूं ती चोपडी. यांतले सर्व शोध तुह्मीं लावले?

**विनोद**—जी होय; ही एकच दिवसाची चोपडी आहे. इतर सर्व दिवसांच्या चोपड्यांचा भारा बाहेर आहे. पाहीजेतर आणतों.

**सगुणा**-कांहीं नको. एकूण सहासात महिन्यांत पुष्कळच काम केलंत तुह्मी?

**विनोद**-आणखी कांहीं वर्षं जर माझं आयुष्य निर्विघ्न चाललं व शरिर बळकट राहिलं तर जगाचा अणू अणूच काय पण परमाणून् परमाणू शोधून काढीन. (चोपडी देतो ती धुरंधर चाळूं लागतो.)

**लीला**-(स्वगत) विनोदा, तुला कुठें कुठें ठेवूं रे!

[ पद--"महाराज खबर०" ही चाल. ]

**मंगल आयुष्य देवो प्रभु तुज मंगल आयुष्य देवो ॥**
**शरीर मानस आरोग्यानें तेजोबल-धी-वर्धक ठेवो ॥**
**सुखभेट तुझी सदा घडावी ॥ अमृतवाक्यें कानिं पडावीं ॥**
**रोमरोमिं तव प्रीति जडावी ॥ मम कार्यीं या यश मज येवो ॥१॥**

**कला**-आतां याचे पुढं काय करणार?

**विनोद**-(हंसत) माझ्या गोष्टीचा दुसरा भाग सुरू करणार!

**सगुणा**-(हंसून) तो कसा काय?

**विनोद**—तो ओघाओघानं कळेलच. आधीं सांगितल्यानं किंमत...

**धुरंधर**--अरे पण वाचायचं कुणी हें ? हें अक्षर कीं रेघोट्या !

**विनोद**-तें वांचतां यावं म्हणून लिहलंच नाहीं !

**सगुणा**—शाबास ! मग कशाला खरडलंत ?

**धुरंधर**-( चोपडी फेंकून ) मला यांत सगळी लवाडी दिसते आहे.

**विनोद**--एडिटर साहेब, रागावतां काय असे ? वाटेल त्याला वाचतां येण्यासारखं लिहिलं तर हे विकले जातील का ? कोणी गिऱ्हाईक खरोखर उभं राहिलं तर बयाणा घेऊन वाचून दाखवीन. आपण घेतां ?

**कला**—(स्वग.) एकादा कन्व्हासिंग एजंट तरी अशी अक्कल लढवील का ?

**सगुणा**-तुमच्या त्या दुसऱ्या चोपड्या आणा पाहूं ? ( विनोद जातो. )

**धुरं०**—त्यांत तरी असंच असेल. ( विनोद आणतो नवराबायको चाळ० )

**कला**—( स्वगत ) माझी अंतःकरणनौका अफाट विचारसागरांत आज पुन्हां कुंठित झाली. एकीकडे विलास व दुसरीकडे विनोद असे दोन्हीं किनारे स्पष्ट दिसताहेत. अनेक आशानिराशांचे बुरूज व विकारांच्या दिवादांड्या खुणा दाखवून राहिल्या आहेत. प्रेमाचं वल्हं मी कोणाकडे वल्हवूं ? कांहींच उमज पडत नाहीं !

[ **पद** " अल्ला रखेगा० " ही चाल ]

**सुखकर कोण मला ॥ जगीं माझ्या प्रेमाला ॥ ध्रु० ॥**

**विनोद-विद्वान्, विलास श्रीमान् ॥ घालूं कुणा मी वरमाला ॥ १ ॥**

**सगुणा**-या सगळ्यांतून शोधांचंच टांचण आहे ?

**विनोद**-जी होय. एकही फाजील ओळ नाहीं.

**धुरंधर**-आमच्या मुद्रणकलेसंबंधानं कांहीं शोध आहेत का यांत ?

**विनोद**-हो. पुष्कळ. ( एक चोपडी घेऊन ) हे यांत आहेत ते ?

**धुरंधर**-वाचून दाखीव पाहूं एक दोन ?

**विनोद**-दाखवितों. मोबदल्याचं बोला.

**सगुणा**-लागली मोबदल्याची मागणी.

**विनोद**-हो. धंद्याच्या बाबतींत भीड कशाला ?

**लीला**-( हंसत ) बरोबर. बिझिनेस आहे. (स्वगत) किती युक्तिबाज बाई ?

**कला**-कांहीं देऊं कराना ? त्यांत काय ? सगळंच असं कसं चालेल.

**विनोद**—मी आपणांपासून कांहीं जास्त मागत नाहीं. माझ्या शोधाच्या जाहीराती आपल्या प्रेमसंसारांत त्याबद्दल वर्षभर फुकट घ्याव्या.

**धुरंधर**—कबूल, मंजूर. मग कांहीं आहे ?

**सगुणा**—आतां तर सांगाल ? का लेखी करार पाहिजे.

**विनोद**—नको. तितका आपल्यावर माझा विश्वास आहे. ऐकावं तर. ( चोपडींत पाहून ) आपल्या येथें हल्लीं जीं छापखान्यांचीं यंत्रं आहेत तीं थोड्या प्रती काढण्यास पुष्कळ गैरसोईचीं आहेत. त्यासाठीं कांहीं हातयंत्रांचा मीं शोध लावला आहे. हा पहा त्यांचा नकाशा. ( बोटांनीं दाखवून ) हें हातांनीं चालवायचं, हें पायांनीं चालवायचं, हें सहज टेबलावर ठेवून बसल्या-बसल्या ऑफिसांत लोकांशीं गप्पा मारतां मारतां व्हिजिट्कार्ड छापायचं. साहेब, नकाशाकडे पहाल कीं नाहीं ?

**धुरंधर**—(नकाशा फेंकून देऊन) आग लाव तुझ्या त्या यंत्रांना.

**विनोद**—आगीचीं यंत्रं दुसरीं आहेत!

**धुरंधर**-त्यांनाही आग लाव जा.

**विनोद**-यंत्र केल्यावर आग लावून पेटवून दाखवीन साहेब!

**सगुणा**-उगीच कां रागावतां? आपण ह्मणतां एक व तो समजतो एक.

**धुरंधर**-अहो, तो महा बेरड आहे. मुद्दाम वेड घेऊन पेडगांवास जातो.

[ **पद** –" विकराल कर०" ही चाल. ]

**मज बाळसम खेळवी ॥ धरि वेड लटिकेंचि हा बहुत खेळवी ॥ ध्रु०॥**

**अज्ञान दावी ज्ञाना सदा वी भलत्याचि भावीं जगतास झुलवी ॥ १ ॥**

**प्रति शब्दिं शरमार कोड्या अलंकार योजीतसे फार हा मानभावी ॥२॥**

नेहमीं चेष्टान् चेष्टा! मोठमोठ्या गप्पा—

**विनोद**—गप्पा कां ह्मणाना? पण खऱ्या गप्पा आहेत.

**धुरंधर**-ठीक आहे. हे घे त्याचं इनाम. (मारण्यास उठतो.)

**सगुणा**-(तोंच धरून) हं हं हें काय? तो जाणून बुजून विनोद आहे.

**विनोद**-पण विनोदाचं चुकलं काय तें तर सांगाल?

**धुरंधर**--चुकलं कसचं? मुद्दाम चावटपणा करीत आहेस तूं?

**लीला व कला**-चावटपणा? तो काय बाई!

**धुरंधर**-हीं सगळींच यंत्रं पूर्वीच निघालेलीं आहेत.

**विनोद**—हात्तिच्या असतील. पण मग त्यांत काय झालं ?

**धुरंधर**-पहा आणखी काय झालं ह्मणून बेधडक विचारतो.

**सगुणा**—हे तुझे इतर सारे शोधही मग असेच आहेत कीं काय ?

**विनोद**–नाहीं; यापेक्षां तर ते पुष्कळच महत्वाचे आहेत.

**सगुणा**–तें कसे काय, कांहीं सांगूं शकाल?

**विनोद**–हो मासल्यादाखल अगदीं पहिल्या दिवसाच्या डायरींतील कांहीं ओळी फुकट वाचून दाखवीन. ऐका. पहिला दिवस--भवानी हॉटेल--आंघोळ घरांत चुलीवर पाण्याच्या भांड्याचं झाकण उडतांना दिसलं. तपास करतांना वाफेमुळं हें कळलं--ह्या शक्तीनें मोठालीं कामें करतां येतील.आज मारुतीच्या शेंपटाच्या आगगाड्या आहेत त्यापेक्षां वाफेच्या गाड्या होतील. घंगाळांत लोटी बुडवूं लागलों, पाणी वर चढूं लागलं, तोलाचं तत्व कळलं. वरून आंगावर कारंजं सुटलं, धबधब्याच्या शक्तीची कल्पना झाली. संध्यागृहांत जातांना हातांतला पेला खालीं पडला, तो उचलून वर फेंकला तरी पुन्हां खालीं पडला. पृथ्वी ओढते हें कळलं--

**सगुणा**–पुरे, समजली. तुझी एकंदर दिशा समजली.

**विनोद**—कां एडिटरसाहेब, तुम्ही हंसतासे?

**धुरंधर**–हंसूं नको तर काय रडूं? हे शोध कधींच लागून गेलेले आहेत. त्यांत आज कितीतरी सुधारणा होऊन त्यांवर केवढाले ग्रंथही तयार झाले आहेत.

**विनोद**–शोध जुने असतील पण म्हणून त्यामुळें शोधकाच्या शोधक बुद्धीची किंमत कमी होते काय?

**धुरं०**-नसेल होत. पण या शोधांच्या जाहिराती निदान प्रेमसंसारांत तरी घेतां येणार नाहींत. यापेक्षां कांहीं नवे शोध लावशील तर पाहूं ( उठून जा. )

**वि०**--(तो गे.) हंहंहं! लावलेल्या शोधांना उत्तेजन मिळेना अन् म्हणे नवे शोध.

[**पद**--"धुंद मला चढली" ही चाल.]

**जगत कसें मनुजा लावी पिसें ॥ ध्रु० ॥सूर्य दावितां चंद्राचि मागे ॥**
**चंद्र आणितां तिजेंच सांगे ॥ सर्व पुरवितां फुगे विरागें ॥**
**उलट्या मिषें बोलतसे निशिदिनिं फसवीत असें ॥ १ ॥**(जातो)

**लीला व कला**–आई, बाबासाहेबांनीं आज हें चांगलं केलं का?

**सगुणा**--मला देखील यांत उतावळेपणा झाला असंच वाटतं.

**लीला**–नोकरीस लागून पुरते सहासात महिने झाले नाहींत तोंच सुमारें हजार दीडहजार वर्षांचा जुना काळ ज्यानें आक्रमून टाकला त्याला राहिलेला काळ आक्रमण्यास असे किती दिवस लागते आणखी?

**सगुणा**--त्याला डिस्क्रीज्ड न करतां एन्करेज्ड करायला हवं होतं.

**लीला**–मागें मागें तरी किती? फार फार तर दोनतिनशें वर्षेच. आणखी सहा महिन्यांत तेवढा टप्पा ओलांडून चालू काळाबरोबर येईल. व आपल्या पुढें पाऊल टाकील आणि मग आपल्यालाच त्याच्या मागून जावें लागेल.

**सगुणा** – तें खोटं नाहीं. तो मनुष्यच तसा दिसतो. थांब, मी पुन्हां सांगून कांहीं झाल्यास पाहतें. (जाते.)

**कला**–विनोद तडक निघून गेला का बाहेर बसला आहे?

**लीला**–तो गेला असेल. ठरल्याप्रमाणें मग व्हिक्टोरियागार्डनमध्यें भेटेल.

**कला**–मग आतां विनोदाच्या शोधांचं पुढें काय?

**लीला**— पुढें काय? मीं आधींच ओळखून त्याची पुढची व्यवस्था केली आहे.

**कला**–ती काय ताई!

**लीला**–ती आजच व्हिक्टोरियागार्डनमध्यें गेल्यावर तेथें कळेल!

**कला**–तूं त्याला बाबाकडे येण्याची उगीच सल्ला दिलीस!

**लीला**–काहीं नाहीं. मीं केलें तें बरोबर केलें.

[ **पद**–" दरुशन विन आखिया० " ही चाल. ]

**अनुभव उभयांला दिधला ॥ अभिनव हा ॥ ध्रु० ॥**
**प्रयोग सुंदर माझा वठला ॥ पिता तुमचा विनोद शिकला ॥**
**शिकला तो नर पुढें चालला ॥ पिता यशाला मुकला ॥१॥** (जातात.)

---

## प्रवेश ३––गिरगांव ट्रामटर्मिनस.

**कौतुक—**(विलासाशीं बोलत प्र०) आनंदाची बातमी महाराज. पेढे आणा. विनोदाची डाळ धुरंधराकडे शिजली नाहीं. तो त्यांची नोकरी सोडणार!

**विलास**–काय काय ह्मणतोस? मग मोठी मौज झाली.

**कौतुक**--तो आतांच येथून गेला तेव्हां मला भेटला.

**विलास**--आपला बराच मार्ग मोकळा झाला तर.

**कौतुक**--हो; पण मोकळा ठेऊन उपयोग नाहीं. कोणी दुसराच घुसेल.

**विलास**--तें खरंच. मग तूं कां घुसेनास?

**कौतुक**—आतां तोच प्रयत्न करावयाचा.

**वि०**–तसं झालं तर लीलाकलांची सगळी बातमी सहज कळत जाईल.

**कौतुक**–त्यांना भेटण्याचीच खटपट प्रथम केली पाहिजे.

**विलास**–कशाला? धुरंधरावर पाहिजे तर एकादी नोट मिळवूं.

के. व. म. व. वा. पोतदार

**कौतुक**—नको. ते धुरंधर पडले हुषार, त्यांच्याशीं त्या विनोदानंच तोंड द्यावं. मी लीलाकलांकडूनच भोंक पाडणार.

**विलास**—वाः आपल्याला देव अनुकूल आहे. ती पहा कला येते आहे. पण मी कुठें छपूं ? ती पहा आलीच.

**कौतुक**—(पाहून) हिलाच चकवायचं ना ? ऊंः ! तुह्मी जरा पलीकडे निघून जा. चला निसटा. ती पहा आली. ( उलट दिशेनें दूर जातो. कला प्रवेश करिते. ) जयजय बाईसाहेब ; मला ओळखलं नाहींत का ?

**कला**—( चष्मा काढून डोळे पुशीत) आपण कोण ?

**कौतुक**-मी कौतुक; आपली माझी सहा महिन्यांपूर्वी ब्याकबेवर नजरानजर झाली होती. विलास मला कपडे देत होते.

**कला**—अस्सं ते लबाड भिकारी वाटतं आपण ?

**कौतुक**—बाईसाहेब, रागावतां काय ? मी विलासांचे कपडे पुन्हां त्यांना त्याचवेळीं परत दिले. मी आतां त्यांच्याकडेच असतों.

**कला**—असं का ? मग माझं एक काम कराल ?–पण नको, कांहीं नाहीं.

**कौतुक**-कां कां ? माझ्या विश्वासूपणाबद्दल-संशय–

**कला**--संशय असा नाहीं.मीं त्या दिवशींच तुह्मांला पारखलं आहे. पण--

**कौतुक**--पण काय ? त्यांनीं तुह्मांला वारंवार झिडकारलं ह्मणून...

**कला**--कां बरं ! ते कांहीं बोलत होते का माझ्याबद्दल ?

**कौतुक**- हो. नेहमीं. त्यांचं मन हल्लीं आपल्याकडे फारच वळलं आहे.

**कला**--असेल ; पण आतां काय उपयोग? माझं मन नाहीं आतां त्यांच्यावर.

**कौतुक**—कलाबाई, मी विलासाकडे आहे ह्मणून तुह्मीं संकोचतां हें ठीक आहे; पण खरं पुसाल तर मी देखील विलासांच्या संगतीला खुष नाहीं. कुठें दुसरी सोय मिळाल्यास पाहतों आहें. काल रात्रीं विचार झाला कीं, एकदां कलाताईंना भेटावं ; तपास केला तेव्हां कळलं कीं, आपण रोज याच रस्त्यानं ब्याकबेवर फिरावयास जातां. ह्मणून येथें उभा होतों तों आपणही भेटलांत.

**कला**--आज मी भेटलें नसतें तुह्मांला, कारण आजचा प्रोग्राम व्हिक्टोरिया गार्डनचा आहे. इकडे लीलाताईच्या कामाला मी चाललें आहे.

**कौतुक**-- लीलाताईच्या विनोदाप्रमाणें मी कलाताईचेंही कौतुक.

**कला**–विनोद कुठें राहतो आहे आतां ? मी त्याच कामाला चाललें आहे; लीलाताई त्याची गुणग्राही आफिसांत तजवीज लावून देत आहेत.

**कौतुक**-होय का ? (एकीकडे) हें एक बरं कळलं. (उघ०) पण माझी सोय.

**कला**--पाहीन आतां; आज आधीं व्हिक्टोरियागार्डनमध्यें गुणग्राही पत्राचे एडिटर भेटणार आहेत तेथें विनोदाचं काय होतं त्याप्रमाणं—

**कौतुक**—सावकाश; मात्र ध्यानांत असूं द्या म्हणजे झालं.

**काला**—वरं आहे; मला भेटत जा.

**कौतुक**--हो हो. आपलं विलासाजवळ कांहीं काम असल्यास सांगा; तें मी जुळवून देईन, आपल्याविषयीं दोन शब्द मी बोलूं का ?

**कला**—त्यांना मी आवडत नाहीं मग काय ?

**कौतुक**–तसं मला तर बुवा वाटत नाहीं. पाहिजे तर अंत काढून पाहीन.

**कला**–साधल्यास पहा. तसं कांहीं नसेल तर पुढचा विचार. नाहींतर नाहीं हें आहेच. आपला योगायोग—

**कौतुक**—छेः भलतंच ! असं कधींच--मी आहे तोंवर तरी--होणार नाहीं.

**कला**—बरं जाते मी. उशीर होतो. तें पहा तूं. ( जाऊं लागते. )

**कौतुक**—माझ्या नोकरीचं आपणही पहा.

**कला**—त्यांत काय मोठं ? तें झाल्यासारखंच समज. ( जाते. )

**कौतुक**—हें एक बरंच जुळलं. मात्र ही कला भोळी दिसते. ( इकडे तिकडे पाहून ) आमचे महाराज कोठें हॉटेलांत घुसले आहेत वाटतं. चला तर मग त्यांना राणीच्या बागेंत जायला सांगतों. ईश्वरकृपेनें हा पहिला बार छान उडाला. प्रेमसंसारांत कलेच्याद्वारें जर माझा प्रवेश झाला तर लीलाकलांच्या सर्व प्रेमसंसाराची खडान्‌खडा माहिती मिळण्याची सोय होईल. कलेचं मन विलासावरून उडत आहे हें मात्र चांगलं नाहीं. तरीपण तें फिरवितां येईल. बाकी या प्रेमसंसार-नाटकांत पाहुण्यासारखींच पात्रं जुळलीं आहेत. यांतून आतां कोण विजयी होणार याचा कांहींच अंदाच होत नाहीं. एक व्यवहार धीर देतो कीं, ' भिकेची हांडी शिक्याला लागत नाहीं. व पैशापाशीं पैसा जातो.' तोंच दुसरा व्यवहार असेंही ठोठावतो कीं, डोंगराच्या शिखरावरून नदी खालीं उड्या घेते आणि पायथ्याचा वेल शिखरापर्यंत पोहोंचतो–व्यवहार दुतोंडी व अनुभवही दुतोंडी. कोणावर विश्वास ठेवणार ! कांही नाहीं. मनः पूतं समाचरेत्‌!

( जातो. )

---

## प्रवेश ४—व्हिक्टोरिया गार्डन.

( लीला, कला व विनोद बोलत बोलत येतात. )

**लीला**—माझीच चूक झाली. मी तुह्माला बाबांकडे जा अशी सल्ला देण्यास नको होती. कारण या मधल्या पिढीनं नुसतं तत्वज्ञान लिहावं किंवा बोलावं;

कृतींत ती कसोटीला उतरणं म्हणजे हजारांत-कायपण लाखांत एकादा!

**कला**- पण मौज अशी कीं हल्लींच्या पिढीचा आधार राहिले ते!

**विनोद**—म्हणूनच त्यांना धरून पुढें जायचं व हळूं हळूं सुटायचं.

**कला**-तें कसं विनोद?

**विनोद**—अहा कलाताई, जसं कांहीं तुम्हाला ठाऊकच नाहीं आं! अहो,

[ **पद**–' जावा दोने० " ही चाल. ]

**बालांकुर तरुवर संगोपिति, पुढें वेगळाले ॥ रुजति पुढें० ॥**
**द्विजपशुशिशुगण वाढ वाढतां स्वैरपणें चाले ॥ पुढें मग स्वैर० ॥**
**बाळ बद्ध वडिलांचें जगिं जो निजबळ नच आलें ॥ जगीं जों० ॥**
**अन्योन्याश्रय परंपरा ही निर्मियली काळें ॥ अनादि ॥ १ ॥**

**लीला**—विनोद, आतां तुम्ही आमच्या प्रेसांत राहणं इष्ट नाहीं.

**कला**—गोष्ट खोटी नाहीं. पिकतं तिथं विकत नाहीं.

**विनोद**—पण अजून पिकूंच लागलं आहे कुठें?

**लीला**-पिकायला देखील दुसऱ्या कृषीवलाची मदत घ्यावी लागेल. मीं त्या 'गुणग्राही'च्या संपादकांकडे तुमची तजवीज केली आहे. ते आतां यायला झाले आहेत. (घड्याळ पाहून) दोन तीन मिनिटांत येतील.

**कला**-ते पहा आलेच. (पाहून) उंः; पण तें शुष्ककाष्ट उगीच आहे बरोबर!

**लीला**—असेना का? मी चांगलं भरवून ठेवलं आहे त्यांना.

**कला**-दुसरं कांहीं नाहीं. उगीच मध्यें वाचाळपणा करतील.

**विनोद**-पण मला तुमच्यापासून दूर व्हावंसं वाटत नाहीं.

**लीला**-नुसता शो. दूर नाहींन् लांब नाहीं. मी मग सगळं सांगेन. ते आले आतां त्यांच्याशीं नीट बोला. (गुणग्राही व विलास ये.) वेलकम् मि. गुणग्राही.

**गुणग्राही**-थँक् यू थँक् यू; मला थोडा लेट झाला.

**लीला**-कांहीं नाहीं. इन टाईम आलांत. हे पहा. हे ते गृहस्थ. (विनोदास दाखविते तो पुढें होतो) मीं जी शोधांची हकीकत सांगितली ती यांचीच.

**विलास**—हे मोठे उद्योगी व बुद्धिमान आहेत, पळीबिळीपासून सोडा-वॉटरच्या बाटलीपर्यंत सर्वांशीं यांचा खेळ चालतो.

**गुणग्राही**—तुम्ही यांची टवाळी करणारच. कारण तुम्ही श्रीमंत.

**कला**--(एकीकडे) बरं झालं. पहिल्याच खेपेस नाक ठेंचलं.

**लीला**—यांची कल्पकता अजून थोडी मागं आहे इतकंच-

म १५९८२

**कला**--बाकी ज्यांत पहावं त्यांत त्यांचं आपलं डोकं चालतं.

**विलास**—या बाबतींत कलाबाईच्या अभिप्रायास मी देखील आपला टेंकू देतों. कारण त्यांची डोक्याची दौलत खरोखरच मोठी आहे.

[ **पद**--" मेरी भिंगरी० " ही चाल. ]

**हा जगीं न दीन भिकारी ॥ महा शिकारी परम विचारी**
**डोक्याची श्रीमंती भारी ॥ ध्रु० ॥**
**गमनागमनीं तें नम्र नमे ॥ शरणाशरणीं तें महा श्रमे ॥**
**स्मरणास्मरणीं तें सदा भ्रमे ॥ महाविकारी विविधप्रकारीं ॥१॥**

**गुणग्राही**-अन् श्रीमंतांचं डोकं कसं असतं हो ?

**लीला**-जाऊं द्याना, त्यांच्याशीं काय बोलायचं ?

**गुणग्राही**—( विनोदास ) आपण कोण ? कुठले ?

**विनोद**-माझं नांव विनोद. मी मूळ जंगली. संध्याद्रीच्या एका खिंडींत राहणारा! माझे वडील लहानपणींच वारले व आई मला थोडा मोठा केल्यावर निघून गेली. जंगलच्या जंगली हवेंत मी मोठा जंगली झालों.

**विलास**--एकदां या जंगलीला मीं थप्पड दिली होती.

**विनोद**—व्याकबेवर एका जंगली मनुष्यानं यांचे कपडेलत्ते छिनावले होते.

**कला**-( स्वगत ) बरं झालं. विनोदानं कसा वर्मी घाय दिला !

**गुणग्राही**-जंगल ह्मणजे काय आपण थट्टेचा विषय समजतां ?

**विनोद**-नाहीं, पण जंगलीं लोकांचीं जंगलीं मतं शहरवासीयांना एकदम कशीं पटणार ! ह्मणून थोडं तोंडासारखं बोलावं लागतं.

**लीला**—यांचा स्वभाव अंमळ विनोदी आहे.

**विलास**-माझा स्वभाव कौतुकी आहे.

**कला**-श्रीमंतीच्या फाजील कौतुकापेक्षां गरीबीचा विनोद पुष्कळ बरा.

**विलास**—( स्वगत ) माझ्या एका शब्दालाही कोणी थारा देत नाहीं.

**गुणग्राही**-जंगल व शहरवस्ती यांत तुह्मांला काय फरक वाटतो.

**विनोद**—जंगलाची सर शहरांना थोडीच येणार आहे? जंगल ह्मणजे शुद्ध स्वर्ग, स्वच्छ हवा, शांत समय, प्रसन्न वनश्री--

**विलास**-मी उद्यां नामदार झालों तर जन्मांतून कांहीं वर्षं प्रत्येकानं जंगली झालं पाहिजे असं आधीं कौन्सिलांत बिल आणीन.

**गुणग्राही**—आपण कृपा करून मध्यें लुबलुब करण्याची तसदी घेऊं

नये.—( विनोदास ) तर मग आपण जंगल सोडून शहरवस्तींत कां आलांत?

**विनोद**—महाराज,

[ **पद**–" मराजि पुछो छो० " ही चाल. ]

**सुरगणही येथ ये ॥ आह्मी वनचर कां मग जनचर होऊं नये ॥ध्रु०॥**
**अति वनवासें जनांवनांचा ॥ स्फुरला भेद मदंतरिं साचा ॥**
**संबंधही कळला ईशाचा ॥ सोडियलें वन ॥ आदरिल जन ॥**
**फेडाया ऋण ॥ मजवरिचें मी स्वयें ॥ आलों भयें ॥ १ ॥**

**गुणग्राही**—शिक्षण न मिळालेल्या जंगली मनुष्याचे इतके उच्च विचार!

**लीला**—ह्मणूनच माझा जीव यांच्यावर विशेष लोभला.

**कला**-कां विलास, आतां नाहीं बोलत?

**विलास**-काय बोलूं? जंगली मनाच्या मनोऱ्यावर आह्मी भुलत नसतों.

**गुणग्राही**-पण कांहो, तुह्मांला जंगल योग्य का शहर योग्य?

**विनोद**-जंगलच योग्य, पण सगळे लोक-मनुष्यजाती- जंगलवासी होणें शक्य नाहीं आणि कदाचित् लोक जंगलांत आले-किंवा त्यांना ओढून आणलं तरी पुन्हां काय? तें जंगलच शहर व्हायचं. मग सर्व लोकांना तसदी देण्यापेक्षां आणि जंगलं नाहींशीं करण्यापेक्षां आपण एकट्यानंच शहरांत उठून गेलेलं काय वाईट? ह्मणून जंगल सोडलं. पुन्हां ह्मटलं, शहरांतच जायचं तर मग सगळ्या शहरांची आई जी मुंबई तींतच आलेलं काय वाईट ह्मणून मुंबईचाच आश्रय केला.

**विलास**-अन् पुन्हां ह्मटलं, मुंबईतच यायचं तर इधरतिधर भटकण्यापेक्षां लीला-कलांच्या प्रेमसंसारांत आलेलं काय वाईट?

**लीला**-लिहावाचायला हे रस्त्यांतल्या लोकांना विचारून शिकले.

**विनोद**-अन् पुढचं आतांपर्यंतचं सर्व शिक्षण ह्या देत आहेत.

**कला**-येथें राहिल्यापासून हे व यांचं काम- घरांतून बाहेर पडत नाहींत.

**विलास**-मी देखील मोठा होईपर्यंत घरकुल्याच होतों!

**गुणग्राही**-ज्या माउलीनं आपणास जन्म दिला तिची कुस धन्य होय.

**विलास**-माझी आई कोण हें मला ठाऊक नाहीं.

**लीला**—तुमच्याशीं बोलतं आहे कोण पण?

**कला**—हे विनोदाला व त्यांच्या मातेला धन्यवाद मिळताहेत.

**विनोद**—माझा धनिक धनगर बापही असाच धन्य होता महाराज.

**गुणग्राही—**( हंसत ) होय का?—यांच्या वाष्कळपणापेक्षां तुमचा मार्मिक विनोद मला फार आवडतो.

**लीला**—यांच्या विनोदी स्वभावांतही थोडी गोम आहेच.

[**पद**---" मोरी काहे न माने० " ही चाल.]

**अहो वरुनि दिसे हा बोलका ॥ परि सदा मुका वाचाळ ठकां ॥ ध्रु० ॥**
**पुरुष खरा हा जगिं पुरुषार्थी पुरुषगुणीं नेटका ॥**
**इतर पुरुष ते भाडनांवाचे डामडौल लटिका ॥ हा सदा मुका० ॥१॥**
**वरी विनोदी अंत प्रबोधी शोधी अर्थ निका ॥**
**महा निग्रही परि न विग्रही सम भासे सकळिका ॥ परि सदा मुका०॥२॥**

यांचं हें असं स्वावलंबी जीवन आहे बरं गुणग्राही, सहा महिन्यांपूर्वी सर्व बाबतींत हे जगाच्या अगदीं मागें होते, परंतु पुढें आपली स्वावलंबी वृत्ति व स्वाध्यायतत्परता यांच्या जोरावर एकावर एक उड्या घेत घेत आतांपर्यंत तीनशें वर्षांवर येऊन ठेपले आहेत.

**कला—**आपण यांच्या डायऱ्या पाहिल्यावर थक्कच व्हाल.

**गुणग्राही**---मी यांच्या तीव्र बुद्धीला स्तुत्यच समजतों. थोडक्याच अवधींत टेलिफोन, टेलिग्राफ, केबल, वायरलेस टेलिग्राफी, फोनोग्राफ, ग्रामोफोन वगैरेंचे शोध लावीत हे चालू स्थितीबरोबर येतील व मग नवीन नवीन शोध लावून जगाला ऋणी करितील याबद्दल मला मुळींच शंका वाटत नाहीं.

**लीला**—हेच विनोद जर न्यूटन, वॉट, वगैरे शोधकांच्या पूर्वी असते तर त्यांच्या अगोदरच यांचं नांव आज आपल्या वाचण्यांत आलं असतं. एकाद्या दुसऱ्या गोलावरील मनुष्य येथें यावा तसे हे आज आपल्या येथें आले आहेत; तरीपण यांची बुद्धी विलक्षण तीव्र आहे. विद्येची व उद्योगाची यांना आवड फार आहे आणि चांगल्याच्या शोधाबद्दल वेडीवांकडी पण उत्कट व स्वभावसिद्ध इच्छा आहे. यांना जें जें कांही नवं वाटेल त्यावर लहान लहान लेख लिहून जर यांनीं आजच्या उद्योगी स्त्रीपुरुषांपुढें ठेविले तर ते अत्यंत उपयुक्त होणार नाहींत का ?

**गुणग्राही—**कां होणार नाहींत. झालेच पाहिजेत. आणखी देखील अनेक प्रकारांनीं यांचा उपयोग होईल. माझ्या तें सर्व ध्यानांत आलं. चला विनोद, आजपासून तुह्मी आमचे झालांत. त्या तुमच्या डायऱ्या कोठें आहेत ?

**विनोद**—त्या भवानी हॉटेलमध्यें आहेत.

**गुणग्राही**—त्या डायऱ्या व आणखी इतर जें काय असेल तें सर्व आपल्या येथें घेऊन चला. लीलादेवी, ठरलं. मी यांना हातीं धरितों.

**लीला**—विनोद, आणा तुमचा हात—

**विलास**—त्याचा हात कशाला पाहिजे आहे. हा घ्या मी आपला देतों.

**कला**—तुमच्या हाताचं तें भाग्य नाहीं.

**विलास**-खरंच विसरलों. माझ्या हाताचं भाग्य कलेच्या हातांत आहे.

**लीला**—(विनोदाचा हात गुणग्राहीच्या हातांत देऊन) घ्या गुणग्राही,

[**पद**—" छवकडी खडी है०" ही चाल.]

**तुह्मी घ्या यांचा सांभाळ ॥ हिरा हा होऊं न द्यावी राळ ॥ ध्रु० ॥**
**हतबल हा उद्योगाचि साक्षात् भटके रानोमाळ ॥**
**गुणग्राही तुह्मी गुरू जगाचे तुम्हां अनुकुल काळ ॥ १ ॥**

**गुणग्राही**---विनोदाबद्दलची सर्व काळजी आतां मजकडे.

**विलास**---- (उपरोधिक )आह्मीं निर्धास्त झालों !!

**लीला**----विनोदावर माझं प्रेम आहे. तें निव्वळ माझ्या स्वतःच्या भावी सुखासाठीं नसून हल्लींच्या सुधारणेच्या काळांत लोकांस पावलोंपावलीं भासणाऱ्या गरजांपैकीं कांहींतरी भागविणारे नवीन नवीन शोध यांच्याकडून लागतील असं यांच्या बुद्धीचं धोरण मला दिसल्यावरूनच तें जडलं आहे. हें आपण समजलांच असाल. आपणही याच दृष्टीनं यांना वर आणावं.

**गुणग्राही**---कांहीं हरकत नाहीं. आपण यांत मजवर कोणत्याही प्रकारचा भार घातला असं मी समजत नाहीं, तर उलट असला बुद्धिमान मनुष्य आपण माझ्या हातीं दिलात याबद्दल मी आपले फार आभार मानतों.

**लीला**----चला तर आजचं योजलेलं काम झालं.

**कला**---आजच्या या आनंदाच्या गोष्टीबद्दल चला आपण सर्व आज जातांना भवानी हॉटेलमध्यें चहा घेऊन मग घरीं जाऊं.

**गुणग्राही**----चला; कांहीं हरकत नाहीं. ( जाऊं लागतात. )

**विलास**----मलाही माझी छत्री न्यायला तेथें यायचंच आहे.

**विनोद**---काळजी करूं नका. तुह्माला मी टिफिनचं आमंत्रण देतों. (जातात.)

**विलास**----काय टिफिनला ? लवकरच तुझ्या तेराव्यालाही येईन.-अरे-पण हें मी काय अभद्र बोलून गेलों ? तेराव्याला जायचं ह्मणजे मी आधीं भिकारी व्हायला पाहिजे. नको का ? मग मी भिकारी का झालों आहे? का होतों आहे? ( सर्वांगाकडे पाहून ) हो; आतां भिकारीपणांत तें काय बाकी आहे?

[ पद---" छलबल चलती है० " ही चाल. ]

**मम सकल धना वाट लागली ॥ ध्रु० ॥ मन हरिलें होतें कोलेनें ॥**
**ती या चोरासवें चालली ॥ तनुवरि लोभ कलेचा होता ॥**
**तीहि दुजावरि दिसे भाळली ॥ वाट लागली ॥ सकळ० ॥१॥**

**पड्यांत**-अगबाई कले, ते विलास मागच राहिले ; त्यांना बोलाव जा.

**विलास**-कोण, कला येते आहे ? मग मला माझी ही रकडी कला बदलली पाहिजे. लीलेचं माझ्यावर प्रेम नाहीं ह्मणावं तर ती असं अगत्य दाखविते आणि कलेचं मन माझ्यावरून उठलं ह्मणावं तर तीही मला बोलावयाला येते.

**कला**-( प्र० क० ) त्या गुणग्राहींच्या देखत बोलतां येईना म्हणून आलें; नाहींतर माझं वसलं आहे खेटर बोलवायला.

**विलास**-( धांवून हात धरून ) नको बोलावूंस, मींच येतों चल.

**कला**—(हात झिडकारून) हां खबरदार ; एकदम हात धरतां. वाटत नाहीं?

**विलास**-( गुडघे टेंकून ) बरोबर चुकलों घे. कलावती,

पद [ " राधे सखे हा० " ही चाल. ]

**शृंगार हा मजला न उमगे ॥ हा राग कीं अनुराग सुभगे ॥**
**घे आपुला मान, बघ नम्र ममप्रान, तुजला तुझी आण, जोडित कर गे ।५।**

**कला**—(स्वगत) हें रूप, हें ऐश्वर्य, हा भोळेपणा, हें सर्व पाहिलं ह्मणजे पूर्वीच्या सर्व विचारांवर पाणी फिरून मन पुन्हां घोंटाळूं लागतं.

**विलास**-कले, पूर्वी मला एक वांकडा शब्द चुकून सुद्धां तुझ्या तोंडून निघत नव्हता असं असतां आतां सारखे वाक्प्रहार कां करीत असतेस ?

**कला**-माझ्याशीं तुह्मीं एक अक्षरही बोलूं नका. मीं आपलं प्रेमसर्वस्व तुह्माला देण्याचा निश्चय मोडून टाकला आहे.

**विलास**-( स्वगत ) इचं हें सगळं ओढून ताणून आणलेलं चंद्रबळ दिसतं. ठीक आहे तर मग, आतां आपणही थोडं उसनं अवसान आणलं पाहिजे. (उघड) बरं आहे तर. कलाबाई, आपण आपला प्रेमळपणा विसरून जसा आज एकाच शब्दांत तटकन् संबंध तोडून टाकलात तसा मीही आतां एक घाव अन् दोन तुकडे करून मोकळा होतों. घरून कोणी इथें माझा तपास करण्यास आलं तर त्याला सांगा कीं मी रेल्वेच्या रुळावर डोकं ठेवून–

**कला**-(स्वगत) अगबाई ! हें काय ऐकतें मी ? (उघड) आपण प्रथम जेव्हां तेव्हां मला धुडकावून दिलं त्याचा सूड घेण्याच्या दुष्टबुद्धीनं मी असं उत्तर दिलं नाहीं

**विलास**–मग कां तें सांगा. (स्वगत) मात्रा लागू पडली.

**कला**–मला पुष्कळ आशा होती कीं, आपल्यास द्रव्याची अनुकूलता असल्यानं आपण मोठाले उद्योगधंदे काढाल, कारखाने उभाराल व नांवलौकिक कराल; पण पुढें माझी निराशा झाली आणि तेव्हांपासूनच मी आपलं प्रेम हळूंहळूं परत ओढीत गेलें.

**विलास**–कले, आपल्याला उद्योगधंदे करायचे आहेत काय ? सात पिढ्या पुरेल इतकी गजांत लक्ष्मी आहे माझ्यापाशीं.

**कला**–तरी काय झालं ? माझ्या संततीच्या आडव्या पिढीला तरी पंचाईत पडणारच कीं नाहीं ?

**विलास**–हें विनोदाचं पाहून तुझ्या डोक्यांत वेड भरलं आहे. नाहींतर इतके दिवस बोलली नसतीस का ?

**कला**–तें कांहीं नाहीं. विनोद होतकरू श्रीमंत होतो आणि आपण इकडे होतकरू भिकारी होतां हें चांगलं काय?

**विलास**–नद्या आटतात, समुद्र आटत नाहींत.

**कला**–तें शास्त्र मला नको. दृष्टांत तेवढे एकदेशी. माझं प्रेम हवं असलं तर–

**विलास**–कबूल, एवढंच ना ? विनोदाचे उद्योगधंदे सुरू होऊं लागल्याबरोबर तुझ्या हातांत माझ्या उद्योगधंद्याचीं हँडबिलं पडतील.

**कला**–काय काय ह्मणतां ?

**विलास**–खरंच सांगतों. मी माझ्या तयारींतच आहे.

**कला**–( आनंदानं ) तर मग हा हात आनंदानं शेक् हँड करील. घ्या. ( विलास पटकन हात धरून त्याचें चुंबन घेतो. ) इश्श:, हें काय ?

**विलास**–खरंच चुकलों; मला भान राहिलं नाहीं. मग चल राजरस्त्याला शोभेल त्याच थाटानं मी तुझ्या हाताचा गौरव करतों. आण हात.

( दोघें हातांत हात घालून जाऊं लागतात. )

[ **पद**–" मुलतानी नाच० " ही चाल. ]

(विलास-)**खेळ जुळे चांगला** ॥ (कला-) **प्रणय रंगला**॥(वि०-)**मज मिळे कला**॥
(क०-) **विलास रमला** ॥ **अतितर सुखकर** (वि०- ) **समय खरोखर** ॥ **ध्रु०** ॥
(वि०-) **विनोद ह्मणती मार्गी लागला** ॥ (क०-) **विलास मागें कुठें राहिला**॥
(वि०-)**लीलेपुढती चालली कला** ॥ (क०) **डाव तिनें जिंकिला** ॥ **प्रणय०**॥१॥

## [ अंक दुसरा समाप्त. ]

# अंक तिसरा.

—:o:—

## प्रवेश १—चर्नीरोड, ब्याकबे.

**कौतुक**-विनोदानें प्रेमसंसार उभा केला आहे आणि कौतुक तो खेळवून राहिला आहे. एकाद्या युद्धांत जनरल जसा एका टेंकडीवर एका हातांत बायोस्कोप घेऊन डोळ्यास लावीत व दुसऱ्या हातांत सिगारेट व बिस्किटें घेऊन तोंडाला चारीत सर्व सैन्याला हुकूम सोडीत असतो तसल्या शिताफीचें व मर्दानीपणाचें काम या प्रेमसंसारांत मी करून राहिलों आहें. सेनापति कुठें आणि मी कुठें? त्याच्याशीं माझी तुलना करणारा मी मूर्खच नव्हे का ? पण त्यांत काय? मूर्खांनीं मूर्खाईतलीच चतुराई गायची! लीला, कला, विलास सगळ्यांना एकमेकांच्या चाहाड्यांच्या तारा पुरविणारं सदर स्टेशनच सांप्रत मी. माझ्या तोंडच्या एका शब्दाचा अवकाश कीं, विलक्षण गोंधळ उडून जाईल. मला आपलं काम सारखं डोळ्यांत तेल घालून करावं लागत आहे! वाघ, बकऱ्या, गाई सर्वांची तहान भागविणारा मी आणि सर्वांचा दिमाख तर निर-निराळा! ही पहा एक मेंढी आली.(कला प्र० क०) कलावतीचा विजय असो.

**कला**-कसं काय? दुनिया काय करिते आहे?

**कौतुक**-दुनिया झुकती है. झुकविणारा पाहिजे.

**कला**-कौतुक, माझ्या मनांत कालपासून एक कल्पना आली आहे. थोडासा उशीर झाला आहे तरी मला वाटतं, साधण्यास हरकत नाहीं.

**कौतक**—हो हो. न साधायला काय झालं? सांगा.

**कला**-कौतुका,

[ **पद**–"भरदे कटोरा०" ही चाल. ]

**विनोद लीलाविनोद पसरी। कलाकौतुका तूं हातिं धरीं ॥**<br>
**सहाय्य देइन तुज परोपरी। लीलाकलांची कर बरोबरी ॥**<br>
**ही आस हृदयास मज खास कर पुरी ॥ १ ॥**

**कौतुक**-(स्वगत) मला अकरावा शनि बसला वाटतं.

**कला**-कां बोलत कां नाहीं?

**कौतुक**-उत्तर देऊं कीं नको, हेंच कोडं पडलं आहे. कारण, हो म्हणेन तर आशाळभूतपणाचा आरोप येणार व नाहीं म्हणेन तर दुर्बलतेचा आरोप येणार!

**कला**–तुह्मी माझं काम करायला तयार आहां का? तुमच्यानं होईल का? मग पहिल्या आरोपाची जबाबदारी मी मजवर घेईन.

**कौतुक**–मग दुसरा आरोप मी खरा करून दाखवीन.

**कला**–खरा करून दाखवीन ह्मणजे? आपली नालायकी दाखवाल ?

**कौतुक**–छेः छेः मी लायक नायक आहे असा.

**कला**–मग ठीक; नाहीं तर ह्मटलं...आतां थोडा उशीर झाला खरा.

**कौतुक**–उशीर कसचा? तुह्मीं जेथून उशीर मोजतां, त्या दिवशींच माझ्या मनांत ही कल्पना आली होती व मी विचारणार होतों; पण याच आरोपामुळं 'होल्ड माय टंग' केली. आपल्याला उशीर; बाकी मी तंग होऊन त्याच दिवशीं माझ्या उद्योगास सुरुवात केलेली असून नेहमीं त्यांत दंग असतों.

**कला**–खरंच कीं काय? वाः काय काय करितां तुह्मीं ?

**कौतुक**–पुष्कळ. तुह्मांला काय काय हवं? वाफेचे शोध हवेत, का विजेचे, का दारूचे, का हत्यारांचे–

**कला**–अरे, हे का ते, असं काय विचारतोस? सगळे विनोदानं लावले आहेत तेवढे पाहिजेत.

**कौतुक**–हात्तिच्या; तेवढेच काय? माझी आकांक्षा तर, कलाताई, विनोदाच्याही पुढं निघून जावं अशी आहे.

**कला**–वाहवा! इतकं असल्यावर आणखी काय हवं? कौतुका,

[ **पद**–" बाल आपका हुषार०"ही चाल.]

**स्वर्गी ओढुं चल खालीं॥ झोंकुं मही अंतराळीं॥ रुपवुं चरण पाताळीं ॥ध्रु०॥**

**हातीं रविशशिस धरूं ॥ दशदिशांत शोध करूं ॥**

**शोधूं नदनिधि गिरितरु ॥ कीर्ति वरूं अति विशाली ॥१॥**

**कौतुक**–ताईसाहेब, विनोदाबरोबर मी केव्हांच येऊन कलेचं नाक आपल्या हातांत घेऊन ठेवलं आहे. व तिला चालू काळाबरोबर आणतां आणतां तिचीं सगळीं मूल तत्वंही ग्रथित करून ठेविलीं आहेत. आतां भविष्यकाळाच्या पोटांतल्या गोष्टी तयार करूं लागण्याचाच अवकाश आहे. त्यासाठीं आपल्यासारख्यांची जोड पाहिजे होती.

**कला**—फार उत्तम; मला एकदां तुझं सर्व दाखीव.

**कौतुक**–मी आतां विलासांकडेच चाललों आहे. घेऊन येतों.

**कला**–ठीक आहे. मात्र आतां हें लीलाताईला सांगूं नकोस, आपली स्कीम चांगली रंगांत येईपर्यंत उगीच बभ्रा नको.

**कौतुक**—( स्वगत ) योग्य. ह्मणजे फजीती झाली तरी दोघांतच राहील. ( उघड ) माझंही असंच मत आहे.

**कला**—बरं तर जा. जाऊन या. मग विचार करूं. मी एकीकडे सांगण्यासाठींच तुह्मांला इथं उभं राहण्यास सांगितलं होतं. बरं जाते मी; ताई वाट पहात असेल. ती व मी विनोदाचा प्रोग्रेस पहायला जाणार आहों.

**कौतुक**—वरं या. (ती जाते.) ही एक बातमी कळली हें वरं झालं.(उघड) पण कलाबाई ! मी असं विचारतों;-रागावूं नकाहो. पण स्नेहाचं नातं जुळल्यावर मोकळ्या मनानं बोलायला काय हरकत आहे ? ह्मणून विचारतों. विनोद हुषार झाल्यावर त्यांना लीलाताई माळ घालणार ? अन् विलास कारखानदार झाल्यावर त्यांना आपण कलाबाई आश्रय देणार—

**कला**--हं बरं मग ?

**कौतुक**—मी रंगेल तयार झालों ह्मणजे मला कोण ?

**कला**--(इकडे तिकडे पाहून)तूं तयार तर हो, मग पाहूं. (लाजून निघून जाते)

**कौतुक**- हें मीं काय पाहिलं ? ( कान देऊन ) ही काय गुणगुणते आहे ?

**कला**--( पडद्यांतून स्वगत )

[ **पद**—"मां डारो भिक्षा०" ही चाल. ]

**वेड्या मना थांब न कुणाकडे जा ॥ येई पुन्हां रंग मम प्रेम काजा ॥**
**जगिं जो विलासी श्रृंगारराजा ॥ कला होय त्याचीच सुखप्रेमभाजा ॥**

**कौतुक**--( ती गेलीसें पाहून ) आणखी एक युक्ति ! ही कला मला मिळवितां येईल. त्या कामीं ही आतां प्रस्तावना झाली इतकीच पुरे. कलेचं मनोगत काय आहे तें कळलं. आतां त्या धोरणानं युक्ति आणि प्रयुक्ति. मी ह्मणत होतों कीं, उद्योगी डोक्यालाच युक्त्या सुचतात; पण छेः रिकाम्या डोक्यालाही युक्त्या सुचतात. बरं, पण मघां मारतांना ऐट मारून गेलों खरा; पण आतां तिची संपादणी कशी करतां येईल ? उंः विलासासारखं घबाड हातीं आल्यावर मग फिकिर कां ? पैशाच्या जोरावर वाटेल तें करतां येईल. ते विलास पैशाच्या जोरावर पगारी नोकर ठेवून कारखाने काढण्याची तयारी करीतच आहेत कीं नाहीं ? त्यांतच आणखी दोन नोकर विद्वान व कारागीर जास्त ठेववितों कीं फत्ते ! आज गल्लोगल्लीं असले लोक रखडताहेत. पैसा आहे कुठं ? पण खरंच ! अजून विलास कां आले नाहींत ? का येऊन मला कलेशीं बोलतांना पाहून तिकडेच कुठें बसले आहेत ? चला तपास तर करूं ! (जातो.)



---

## प्रवेश २–महालक्ष्मी हिल, गुणाग्रही बंगलो.

(गुणग्राही, विद्या, कला, लीला प्र० क०, विनोद वाचीत बसला आहे.)

**गुणग्राही**--तो आतां जगाच्या कितीतरी पुढें गेला आहे! आमच्या इथें आल्यावर आमच्या विद्यावाईंचंही त्यांच्याशीं अगदीं तुमच्यासारखंच मेथकूट जमलं आहे. दोघांचे अभ्यास, प्रयोग एकत्रच चालतात. तो हिला शिकवितो ही त्याला शिकवितें--सारखी गडबड चाललेली असते.

**लीला**–(हळूंच) विद्यादेवी, आपण या उद्योगाला साह्य दिलंत याबद्दल मी आपले फार आभार मानते.

**विद्या**--त्यांत आभार कसचे?

[ **पद**--"साखि झुले घुंगरुवा०" ही चाल. ]

**मी करीत सेवा हृदयाची ॥ हृदयाची निज, नच इतराची ॥ध्रु० ॥**
**जन्मतां जो सुगुण ठेवा हृदयिं वसे॥ तो विनोदचि सगुणरूपें**
**मजसि दिसे ॥ प्रेमभावें प्रेमपूजा त्याची रची ॥ मी करीत० ॥ १ ॥**

**कला**--हें अस्सं सारखं वाचनबिचन चालत असेल.

**गुणग्राही**--नाहीं. आपल्या तेथून इकडे आल्यावर कांहीं दिवसांनीं त्याच्या अभ्यासाची दिशा बदलली. लीलाताई म्हणत होत्या त्याप्रमाणें खरोखरच त्यानं पहिल्या महिन्यांतच मागचा राहिलेला काळ आक्रमून टाकला. पुढें वाङ्मय चाळूं लागला. असल्या लोकांची दृष्टि पुस्तकावरून जशी काय धांवतच असते.

**लीला**–आणि त्यांतून विद्यादेवीसारख्यांचा प्रसाद!

**गुणग्राही**—हो; त्यामुळें हं हं ह्मणतां पूर्वीचं सर्व ग्रंथभांडार उलथून टाकलं. पुढें रोजचं चालू वाङ्मय पहावयाचं. तें पाहून राहिलेल्या वेळांत ही स्वारी फिरावयास निघूं लागली. नोकरी होती तेव्हां तिच्या वेळेपुरतं ऑफिसांत व रात्रीं दोन घटका जगाचा व्यवहार बंद पडतो तेव्हां घरीं–त्यांतही, ठोकाठोकी तोडमोड, कापाकापी, जाळाजाळी, आणि धुवाधुवी चाललेलीच असायची–वाकी एरव्हीं गिरण्यांतून, कारखान्यांतून, दुकानांत, हॉटेलांत, लायब्ऱ्यांत, नाटकें खेळ होत असतील तेथें, सभागृहांतून–कोठेंना कोठें स्वारी फिरत असावयाची.–रस्त्यांत कोठली नक्षीच कागदावर रेखाटून येईल, तर कोणाचं गाणंच टिपून घेईल. एकाद्या इमारतीचं एलिव्हेशनच स्केच करून घेईल तर एकाद्या मशीनरीची आउटलाईनच करून घेईल–

**विद्या**—शिवाय आपोआप आठवतील त्या कल्पनांचीं टांचणं निराळींच.

**गुणग्राही**—पहा, आपल्याकडे त्याचं लक्ष तरी आहे!

**लीला**–अहो महाराज, जरा गरीबांकडे पहाल तर खरं.

**विनोद**--(उठून) ओहो लीलाताई, कलाबाई! या, या, या. केव्हां आलांत?

**लीला**--आतांच; म्हटलं चला फार दिवस झाले. प्रत्यक्ष प्रोग्रेस पाहून येऊं.

**विनोद**–प्रोग्रेस काय ? कधीं खुटायचा आहे थोडाच !

**कला**–पण कांहो विनोद, तुम्हांला कंटाळा कसा येत नाहीं ?

**विनोद**–कंटाळा येऊन काय करूं ? मी कुठें, आपण कुठें, आणि हें सगळं जग व त्याची सुधारणा कुठें ? माझ्या जगिक अनुभवाच्या आयुष्याला आतां कुठें प्रारंभ झाला आहे. आपण सगळे जन्मापासून शहरवस्तींत वाढल्या-मुळें अनुभवाच्या बाबतींत माझ्या फार पुढें आहां आणि सुधारणादेवीनं तर कोठच्या कोठेंच आपली मजल पोंहोंचविली आहे. आपल्याला तर गांठावयाचं व जगाच्या बरोबर यायचं म्हणजे मग कंटाळून किंवा स्वस्थ बसून कसं चालेल?

[ **पद**--राग **भीमपलास**, ताल झंपा. ]

**विगत कालाक्रमण अजुनि तें कितितरी ॥ प्रेमसुखअनुभव**
**वर्तमानावरी ॥ ध्रु० ॥ सरली न रजनी, नच सूर्य गगनीं ॥**
**शशिशीत किरणीं झळकलों मी जरी ॥ विगत० ॥१॥**

**लीला**—पण भूतकाळ तर तुम्हीं कधींच ओलांडला असं तुम्ही यापूर्वींच कौतुकाबरोबर निरोपानं कळविलं होतं.

**विनोद**–होय; भूतकाळ आक्रमून वर्तमानकाळाच्याही अगदीं विद्यमान अवस्थेच्या कांठावर मी येऊन उभा राहिलों आहें.

**गुणग्राही**–मग आतां काय राहिलं ?

**विनोद**–नदीच्या एका कांठावरील माणसांतही अंतर असतंच. तें पहायला सगळा कांठ फिरणं बाकी राहतंच.

**विद्या**–( स्वगत ) अहाहा ! किती मार्मिक दृष्टि !

**गुणग्राही**—मग हें झाल्यावर तर जगाला येऊन मिळाल ?

**विनोद**—जगाला येऊन मिळण्यानं मानवी कर्तव्यता पुरी होते काय ?

**लीला**–ऐकलंतना गुणग्राही !

**गुणग्राही**—मग पुढें काय ? सर्वांत श्रेष्ठता मिळवायची.

**विनोद**–विद्यमान व्यवहारांतलं उच्च नीचत्व फक्त लौकिकापुरतं. मला नुसतं लौकिकच होऊन राहावयाचं नाहीं.

**विद्या**--( स्वगत ) हो हो अलौकिक हो. मी तुझे पाय धुवून पिईन.

**कला**–मग काय करावयाचं आणखी ?

**विनोद**–अशीच सारखी मेहेनत करीत राहून भविष्यकाळ आटोक्यांत आणावयाचा व जगाला मार्गदर्शक होत रहावयाचं.

[ **पद**–राग भैरवी. ]

**करुं जागे आळशी ॥ आळशी नित्य पहुडे झोंप न उडे स्वप्नांतचि**
**रडे ह्मणे मी ठार ॥ आळशी० ॥ ध्रु० ॥ उद्योग वाढवुनि अनेक**
**रचवूं जगिं विधिविवेकयुतसंसार ॥ करुं रसिकारसिक एक**
**पूर्वविरागातिरेक छळित फार ॥ आळशी० ॥ १ ॥**

**लीला**–गुणग्राही, या टाळी. माझं भविष्य खरं झालं कीं नाहीं ?

**विद्या**--( स्वगत ) ईश्वरांत अन् यांच्यांत आतां काय फरक आहे ?

**विनोद**--आमचं काम आतां रेल्वे इंजिनियरिंग प्रमाणें. एक लाईन आंखून ध्यायची. तेवढी तयार होऊन तिच्यावर गाडी धांवूं लागली व तिजवरील सगळ्या स्टेशनांशीं लोकांची ओळख करून दिली कीं, लागलीच पुढें कुणीकडे दुसरा फांटा नेतां येईल याची विचारणा करायची. तसेंच आतां इकडे. गेल्यावर्षी जगाला आपण अमुक अमुक नवीन दिलं होतं, यावर्षी त्याच्याहून आणखी दुसरं नवीन काय देतां येईल व याच्या पुढच्या वर्षी काय काय नवीन शोधतां येईल अशी आतां निरंतर चिंतना करायची व आपल्या स्वतःच्या उदाहरणानं इतर उद्योगी बंधुभगिनींच्या मनांत तिची स्फूर्ति उत्पन्न करावयाची.

**कला**--असं झालं तर फारच चांगलं होईल !

**विद्या**--आपल्या ऐहिक जीवनोपयोगी वस्तूंची वाढ मंदावली आहे.

**गुणग्राही**--मंदावली काय ? कित्येक वर्षांपासून खुंटलीच आहे ह्मणाना !

**लीला**–पण ही नुसती थिअरी झाली. प्रॅक्टिकली फार अडचणी--

**विनोद**--गुणग्राहीसारख्यांनीं हातीं धरल्यावर आतां कसच्या अडचणी ? माझी बहुतेक तयारी होत चालली आहे. निरनिराळ्या कलांचीं अंगें व उपांगें यांचे अडताळे, रासायनिक मूलतत्वें, बहुतेक सर्व जुळलं आहे. गुणग्राहींनीं लॅबोरेटरी व इतर सर्व सोई करून दिल्यानं प्रयोगाची सोय होऊन आतांपर्यंत सुमारें हजार नवीन शोध लागले आहेत. व आणखीही लागतील. इतकंच काय ? पण आतां माझ्या कल्पनेची धांव इतकीही धांवते कीं, वाटेल त्या वस्तूंतून कांहीं दिवसांनीं सोनं काढण्याचीही युक्ति मी शोधून काढीन !

**कला**--परमेश्वर करो अन् ही युक्ति तुह्माला साधो ! कारण,

[ पद--राग रामकली. ]

**जगत जरि होय सुवर्णाचें ॥ पट्टणें पुरें नगरें शहरें**
**शालु नेसतिल सुखवसनाचे ॥ ध्रु० ॥ जनीं उपवनीं मग कल्पतरु ॥**
**रत्नांचे ते गिरिवर मेरू ॥ क्षारसागरीं निघेल क्षीरू ॥**
**अमृत दृष्टी अमृत वृष्टी कुणिहि न कष्टी राहिल साचें ॥ होय० १ ॥**

**लीला**–असं झालं तर सर्व जग तुमचं ऋणी होऊन राहील--

**विनोद**--अन् मी आपल्या सर्वांचा ऋणी होऊन राहीन.

**कला**--लॅबोरेटरी वगैरेबद्दल हे गुणग्राही मुळींच बोलले नाहींत.

**विद्या**–आह्मी बोलण्यापेक्षां तें यांनींच सांगितलेलं वरं.

**लीला** -पण मग आतां ते शोध पेटंट करवा ना?

**गुणग्राही**--कधींच केले-मुद्दाम बभ्रा केला नाहीं.

**कला**--मग आतां कारखान्यांची वगैरे तयारी असेल.

**वि०**--तें आतां ओघानं आलंच. विनोदगुणग्राहीकलामंदिराची योजना तयार झाली असून हँडविलं छापण्यास दिलीं आहेत; लवकरच तुमच्या हातांत पडतील.

**विद्या**–यांचे युरोपिअन व अमेरिकन म्यागेझाईनमधून प्रसिद्ध झालेले लेख व त्यांवरील अभिप्राय तुह्मीं वाचले असतीलच.

**गुणग्राही**–त्यापासून कीर्ति तर झालीच आहे पण पैशाची प्राप्तिही बरीच झाली. शिवाय अलीकडलि कित्येक प्रदर्शनांतून यांना मेडल्सही मिळालीं आहेत.

**लीला**–आतां हळूं हळूं बंगला, शेत, बाग, अशी यांची खासगी व्यवस्था-ही जुळवून देण्यास सुरुवात केली पाहिजे. चार चौघांत इम्पॉर्टन्स बसवायला चारी बाजूंनीं व्यवस्थितपणा असावा लागतो.

**कला**–हो; नाहींतर इकडे कारखानदार व रहायला घरही नाहीं!

**गुणग्राही**—तसं नाहीं व्हायचं. पहा तर खऱ्या. सगळी व्यवस्था होईल.

[ पद–" खुळखुळतें धन किती० " ही चाल. ]

**सुखभवनीं सुखचि तें निपजतें नियम हा जनीं ॥ धृ० ॥**
**गुणी गुणग्राही विद्या ही त्रिवेणी ॥ त्रिभुवनी सकलां सुखपावनी॥१॥**

बरं तर मग आम्ही रजा घेतों आतां. तुमचं चालूं द्या. (सर्व उठतात.)

**विनोद**—बरं आहे. चला. मलाही प्रेसमध्यें जायचं आहे.

**कला**--चला आपण बरोबरच जाऊं. बरं येतों गुणग्राही.

**गुणग्राही**—हो या. (सर्व जातात.)

**विद्या**-( लीलेला उठतानां हळूंच खुणवून ) लीलाताई, थांबा जरा. (लीला थांबून परत वळते) तुझाला एक गोष्ट विचारायची आहे.

**लीला**-हो हो विचारा. जें सांगाल तें काम करीन.

**विद्या**-मी तुमची धर्माची बहीण आहे असं समजा. तुमचं विनोदावर प्रेम बसलं आहे असं मी ऐकतें.

**लीला**—होय, मग? त्याचं काय?

**विद्या**--त्या प्रेमांत मला सहकारी घ्याल?

**लीला**--तें सगळं होईल मग. काळजी करूं नका. व्याकवेवर एखादे वेळीं भेटूं जाऊं आतां? बाहेर कला वाट पहात असेल. (स्वगत) मला हें स्वप्न पडलंच होतं.

**विद्या**--या. माझ्या शब्दाला पहिल्याचवेळीं मान दिलात हे माझ्यावर उपकार झाले. ( ती कांहीं नाहीं ह्मणून विनय करून जाते. )

[ **पद**–" मौलाहि देवे०" ही चाल. ]

**प्रणयविकारा जीवन मिळे ॥ स्मरंगमाया मज भाकळे ॥ ध्रु ० ॥**

**प्रेमी मनाचें प्रेममनोरे नच खचले, खुलती उंच कळे ॥ १ ॥**

**नच पितयाचें हृद्गत पुशिलें तो गुणग्राही हें मजसि कळे ॥ २ ॥** (जाते )

---

## प्रवेश ३.–चौपाटी, वुइलसन कॉलेजजवळ.

**विलास**--(कौतुकास)कांरे ? इथें कां उभा आहेस ?

**कौतुक**-कलाबाईची वाट पहात आहे. आपण आतां कोठें गेलां होतां ?

**विलास**-त्या कारखान्याच्या हँडबिलाच्या कामालाच. झालीं आहेत तयार-विनोदाचीं हँडबिलं वाटणारे आहेत त्यांनाच आपलीं हँडबिलं वांटण्याचं कॉंट्राक्ट दिलं आहे. आतां धुरंधराकडेच जाऊन बसतों.

**कौतुक**-मी सांगितले होते ते कागद झालेका तयार ?

**विलास**-नाहीं झाले बुवा ! ते तूं असल्यावांचून नाहीं व्हायचे. कला कोणकोणते प्रश्न विचारील त्यांची अटकळ काढून ये. मग पाहूं.

**कौतुक**-हं, हं, हं. आपण इतक्या परीक्षा दिल्यात त्या मला वाटतं, आधीं प्रश्न कोणते विचारणार हें परीक्षकाला पुसून घेऊन मग दिल्यात. काय बोलतां महाराज ! आतां मी कलेची कशी समजूत घालूं ? ती येतेच आहे पहा.

**विलास**-अरे कौतुकरत्नभांडार तूं ? तुला काय? बरं ती आली; मी जातो.

( जातो. दूसरीकडून कळा प्रवेश करिते. )

**कौतुक**-या, कलाबाई, जाऊन आलांत ? काय काय पाहिलंत?



विद्या—त्या प्रेमांत मला सहकारी घ्याल? पृ. ५४.

The .Lakshmi Art '-Bombay.

**कला**–विनोदाचा प्रोग्रेस वाखाणण्यासारखा आहे.

**कौतुक**--हरकत नाहीं. मी हजार विनोदांना भारी आहे.

**कला**--तूं आपलं दाखवायला आणणार होतासना ?

**कौतुक**--हो; पण विलास भेटले नाहींत. त्यामुळें आणलं नाहीं.

**कला**--ही अशी दिरंगाई काय कामाची ?

**कौतुक**--दिरंगाई दाखविण्यांत; बाकी अभ्यास जारीनं चालला आहे.

**कला**--पण कांहीं तोंडी माहिती असेलच कीं नाहीं ?

**कौतुक**--नसायला काय झालं ? एवढी पाठ तरी मग कशाला करायची ? स्वतःच्या मुलाची ओळख जशी विसरली जात नाहीं तशी स्वतः लावलेल्या व केलेल्या शोधांची, रचिलेल्या व लिहिलेल्या काव्यनाटकांची विस्मृति पडावयाचीच नाहीं.

**कला**--मग त्यांतलंच कांहीं सांगाना मासल्यादाखल. का मी विचारूं ?

**कौतुक**--विचारा, पण माझे कागद आल्यावर. माझ्यामागें अनेक उद्योग व व्यवधानं असल्यानं कागदाबाहेर मी कांहीं ध्यानांत ठेवीतच नाहीं.

**कला**--मग आपण गुरूच दिसतां मला.

**कौतुक**--' गुरु दिसतां ' काय ? मी आहेच गुरु. विलास मला गुरूसमानच मानतात. कारण मी नेहमीं धुंद. जेवून उठायचा अवकाश कीं काय खाल्लं हें विसरून जातों व पुन्हां कोणी जेवायचं विचारलं तर अगदीं न जेवलेल्या माणसाप्रमाणें हो म्हणून खुशाल जेवतों. हेंच काय पण जेवतां जेवतां देखील मी काय खाल्लं व किती घेतों हें माझ्या ध्यानांत नसतं. माझं मन इतकं तन्मय व शुद्ध आहे ! दुसऱ्या कोणाशीं वागतांना ही माझी उच्च वृत्ति मी मुद्दाम कोणाला दिसूं देत नाहीं; कारण हा व्यवहार आहे. बाकी ज्ञानाच्या बाबतींत मी अगदीं त्या वृत्तीनें पॅक असतों.

**कला**--तुम्हीं कोणकोणतीं शास्त्रं वाचलीं आतांपर्यंत ?

**कौतुक**--बहुतेक सगळीं एकदां वाचून झालीं आहेत. पण खरं पुसाल तर आचार्य, ऋषी वगैरे सर्वांप्रमाणेंच त्यांनीं माझं समाधान झालं नाहीं. मला व जगाला उपयोगी अशीं शास्त्रं माझी मींच रचिलीं आहेत. त्यांचीं नांवं मी पवित्र ठिकाणीं अवश्य सांगेन. कारण ते चव्हाट्यावरचे विषय नव्हेत.

**कला**--रेनाल्ड्, डिकन्स, ह्यूगो, वगैरेंच्या कादंबऱ्या, पोएटस् वगैरे.

**कौतुक**--हो हो. सर्व लिटरेचर चाळलं, पण समाधान नाहीं.

**कला**--काय, तुह्मांला इंग्लिश कुठें येतं आहे हो. तुह्मीही विनोदांच दिसतां.

**कौतुक**--इंग्लिश येत नसतं तर लिटरेचर, पोएटस् हे शब्द येते का? फ्ल्युएंटली बोलतां येत नाहीं ह्मणून उघड प्राक्टिस ठेवीत नाहीं एवढंच!

**कला**--मग तर तुह्मांला सर्व येऊन न येऊन सारखंच!

**कौतुक**--कां बरं? मला सर्व येतं आहे अन् सर्व येत नाहीं.

**कला**--विनोद किती कराल आतां. सांगाना सरळ काय तें.

**कौतुक**--विनोदांसारखा मीही विनोदी आहे. हें आपण पाहून घ्या. वाफेच्या, विजेच्या, पाण्याच्या, वायूच्या, प्रकाशाच्या, खगोलाच्या व पृथ्वीच्या सर्व गुणधर्मांचाही मी चांगलाच स्टडी केलेला आहे. पण त्याला आतां फार दिवस झाले. थोडं कॉन्सेंट्रेशन केलं कीं पुन्हां ताजं. माझीं काव्यं नाटकं, कादंबऱ्या, चित्रं, वाद्यं व इतर सर्व गोष्टी मी मागून खचित दाखवीन. तोंपर्यंत तुह्मांला लेसन द्यायला हरकत नाहीं.

**कला**--मी बोललें होतें तुह्मांला; पण विनोदाचं तें सर्व पाहिलं तेव्हां वाटलं कीं, आतां विनोदासारखा तूं तयार होणार केव्हां अन् हें जुळणार केव्हां?

**कौतुक**--कां? असं काय मोठं विनोदानं केलं आहे तें तर सांगा.

**कला**--अहो त्यानं वाफेचे--विजेचे खोदीव, घडीव ओंतीव कामाचे असे मोठमोठाले कारखाने काढण्याचा घाट घातला आहे.

**कौतुक**-- (मोठ्यानें चमत्कारिक हंसून) हात्तिच्या, एवढेंच ना. मग त्यांत काय? आमचे विलास देखील तसलेच कारखाने काढताहेत.

**कला**--काय काय ह्मणतोस? मला बोललेलं ते खरं करणार?

**कौतुक**-- तर मग? तुह्माला काय वाटतं आह्मीं स्वस्थ बसलों आहोंत? विनोदासारख्या भिकाऱ्यांना कारखाने काढतां येतात तर विलासासारख्या श्रीमंतांना येणार नाहींत? कलाताई, पहातां काय अशा? तुह्मी घरीं जाऊन पोहोंचाल तोंच तुमच्या हातांत आमचीं हॉडबिलं पडतील!

**कला**--खरंच काय? वा:, चल तुला चहा पाजतें.

**कौतुक**--माझे विलास बहुतेक आपल्या इथेंच जाऊन बसले असतील.

**कला**--खरंच कीं काय? चल मग. आपणही जाऊं. आणखी काय काम?

**कौतुक**--चला, सारं रस्त्यानं सांगतों. जातांना (स्वगत) आजचं मोठं संकट टळलंहो; नाहींतर ह्मटलं फजीती होते कीं काय? (जातात.)

---

## प्रवेश ३—लव्हली लॉज.

**धुरंधर**—( सगुणेशीं बोलत बस० ) 'मला आणखी एक दोन वर्षं शिकूं देतील तर वरं' असं काल लीला आपल्या प्रेसम्यानेजरपाशीं म्हणत होती.

**सगुणा**—मला त्यांत कांहीं तथ्य वाटत नाहीं. अन् शिकायचंच झालं तर लग्न झाल्यावर नाहीं का शिकतां येणार? आपली बेटरहाफ् विद्याभिलाषी असतांना 'शिकूं नकोस' असं तिला सांगणारा मूर्ख नवरदेव, मला वाटतं-हल्लींच्या सुधारणेच्या काळांत क्वचितच सांपडेल!

**धुरं०**-हो हो. शिक्षण आज कोणाला नको आहे? अगदीं जुन्याचालीच्या गृहस्थांच्या मुलीदेखील सासरीं गेल्यावर नवऱ्यापासून लिहावाचायलाशिकून घेतात.

**सगुणा**—मुलीच काय? म्हाताऱ्याही श्री श्री करीत आहेत हल्लीं.

**धुरंधर**-हो ; आहे खरी आजची अशी स्थिति.

**सगुणा**-मग आलेल्या मागणीपत्रांपैकीं तिला कोण प्रिय असेल तो विचारून घेऊन याना लग्न करून; पुन्हां तिच्या मागोमाग कलाही वाढत चालली.

**धुरंधर**-ती कांहीं तसा जबाब देत नाहीं. तूर्त पुढें ढकला ह्मणते.

**सगुणा**-यांत खचित कांहींतरी गोम आहे.

**धुरंधर**—असं कशावरून ह्मणतां ?

**सगुणा**-प्रेमाच्या जननीच आम्ही स्त्रिया ! परवांच नाहीं का वाचलं कीं,

[**पद** -" दाता है देनेवाला० " ही चाल. ]

**ललना मदनाची माया ॥ प्रेमा प्रेमाची काया ॥**
**प्रेमरंग तिज अवगत अवघा, पुरुषवलगना वायां ॥ १ ॥**

**धुरंधर**-हा थाट वाचला होता खरा.

**सगुणा**-आम्हीं स्वत:तरी या प्रेमाच्याच चळवळी करून मोठ्या झालों ना?

**धुरंधर**-( हंसत ) हो तें खरंच, पण मग काय, लीलेनं प्रेमाची निवड निराळ्याच प्रकारची केली आहे असं तुमचं म्हणणं.

**सगुणा**-हो मला तरी खास असं वाटतं.

**धुरंधर**-पण तसं असतं तर ती स्पष्ट सांगती.

**सगुणा**—स्पष्ट ? हंः हंः हंः माय डियर. सुधारणा आणखी किती जरी पुढें गेली, शिक्षणानं अंगीं कितीही सरळता व धिटाई आली, तरी हल्लीं कांहीं ठिकाणीं पाहण्यांत येतं त्याप्रमाणें पुरूष एकवेळ आपला प्रकृतिधर्म सोडतील, पण स्त्रिया आपल्या प्रकृतीचा धर्म कधींही सोडणार नाहींत. त्या पूर्वीं होत्या तशाच आज मर्यादशील आहेत व आज आहेत तशाच पुढें राहतील.

**धुरंधर**--लीलेच्या स्वभावाला हें तत्व लागू पडेलसं वाटत नाहीं.

**सगुणा**--इथेंच आपला एकमेकांचा मतभेद आहे. आपण लीलेच्या मनाची उन्नति होत आहे असं समजतां व मी तें अवनतीकडे चाललं आहे असं ह्मणते. माझं हें मत कदाचित चुकीचं असेल; कारण तिची प्रेमव्यक्ति अजून बिनचूक अटकळींत आली नाहीं. तथापि मला वाटतं, विषाची प्रचीति पहाण्यांत अर्थ नाहीं. खालीं घसरणाऱ्या वस्तूचा वेग प्रतिक्षणीं वाढतच असतो. म्हणून तोलांत असेल तोंवरच तिला झेलून ओढून घेणं बरं. लवकर निवड कर म्हणून लीलेला थोडं प्रेस करावं ह्मणजे ती--

**धुरंधर**--छेः छेः हें सक्तीचं तत्व सुखपरिणामी होत नाहीं. कारण,

[**पद**--"प्यार चालो॰ " ही चाल.]

**प्रीतिदेवी बद्ध नच या जगतीं ॥ ऐसें कवि गाती ॥ धृ॰ ॥**
**मृदुला ती तनुमनें छळतां बळानें नच सुखदाती ॥ १ ॥**
**खवळे ती परबळें सुख घेउनि पळे मग प्रबला ती ॥ २ ॥**
**तिजला सूज्ञ जन ते तीच्या कलानें वश करिताती ॥ ३ ॥**

**सगुणा**--सक्तीचं तत्व मलाही आवडत नाहीं. पण,

**धुरंधर**--पण काय? मला तें मुळींच पसंत नाहीं. कांहीं विचार केला पाहिजे.

**स॰**--(पडद्यांत पा॰) त्या पहा त्या आल्याच; दोघींची तऱ्हा अगदींच निराळी!

**धुरंधर**--यांचं प्रेम तरी कुणावर आहे हें खात्रीलायक कळलं?

**सगुणा**--तें सगळं आहे तें ठीक आहे. आह्मी तरी सुधारकांच्याच मुली ना. पण आह्मीं लहानपणीं अशा नव्हतों. आमचं प्रेम ह्मणजे रामाचा बाण होतं.

**धुरंधर**--काळ प्रतिक्षणीं पालटत चालला आहे. तेव्हां असा फरक दिसायचा व व्हायचाच! रामाचे बाण पूर्वीप्रमाणेंच आतांपर्यंत तेजस्वी राहत आले असते तर काळमुखी शस्त्रांचा अट्टाहास आज करावा लागता का?

**सगुणा**--आमच्यावेळीं प्रेम किती तेजस्वी. जलाल मात्रेचा वळसाच! आतांचा प्रणय ह्मणजे काय पुसतां, करनकऱ्याचा वसा!

**धुरंधर**--शिक्षणाची वाढ होत जाईल तसतसं पुन्हां पूर्वस्वरूप येईल.

**सगुणा**--पाहूं आतां. तें यावं ह्मणून तर आपण झटतों आहों ना?

**धुरंधर**--त्या आल्या, पहा. त्यांना हळूच विचारून तर पहा.

**स॰**--हो पहाते. पहा युक्तीनं पोटांतलं कसं--(विलास, लीलाकला प्र॰ क॰)

**धुरंधर**--ओहोहो! विलास, तुह्मी आज किती दिवसांनीं इकडे?

**विलास**--मध्यंतरीं परीक्षा वगैरे झाल्या--

**लीला**–तेंव्हां कांहीं दिवस लोकांतून उठून जावं लागलं होतं.

**विलास**–( स्वगत ) कसा मेणा मारलान् पहा. (उघड) आज अगदीं यांनीं ओढून आणिलं तेंव्हां यावं लागलं!

**कला**.-काय ? आह्मी ओढून आणलं ?

**विलास**—तुमच्या स्नेहानं ह्मणजे तुह्मीच नाहीं का ?

**सगुणा**.·( हंसत ) अस्सं अस्सं; बरं.

**धुरंधर**--पण इतक्या स्नेहानं यांना गौरवतांना मीं तुम्हाला आज पाहिलं. नाहींतर तुमचा स्नेह म्हणजे विरोधी कलहाचा फार शोकी.

**विलास**—काय करावं ? यांच्याशीं खरा स्नेह बांधायचा म्हणजे समुद्रावर पूल बांधण्याइतकं विकट काम !

[**पद**–" दादा दिडदा० " ही चाल.]

**लीला विद्याभिलाषी ॥ रमते कला विलासीं ॥ ध्रु० ॥**
**विलास होतां रुसते लीला ॥** उदास **बनतां कला कुलीला ॥**
ऐशी **ही स्नेहाची** लीला ॥ **मनोरंजना** खाशी ॥ **१** ॥

**सगुणा**—पण दोघींच्या दोन तऱ्हा ह्मणतां तर दोघींचं जमतं कसं ?

**विलास**—या सुशिक्षित आहेत. सहकारित्वानं चालतात.

**धुरंधर**—मग तुह्मीं नाहीं का सुशिक्षित?

**विलास**—आहेच. मीही आतां यांच्याकरितां अर्धनारीनटेश्वराप्रमाणें अर्धा भिकारी व अर्धा श्रीमंत असा होणार आहें !

**लीला**—पण उद्यां तुमचं लग्न झालं ह्मणजे मग ?

**कला**--मग आणखी तिसरी तऱ्हा धरतील.

**विलास**--नको बुवा. मी तिसरीची इच्छाच करीत नाहीं.

**सगुणा**--कायहो विलास, तुम्हीं तिघं आज अनायासं आहांत म्हणून विचारतें. शरमण्याचं कारण नाहीं. यावेळीं आपण सर्व फ्रेंडस आहों असं समजा.

**वि**०--यांत आणखी विनोद पाहिजे होता. म्हणजे स्त्रीपुरुषांची बाजू सारखी होती. आज मी एकटा एकीकडे व या दोघी एकीकडे; बहुमत यांचंच होणार!

**लीला**--विनोद असता तर तो आमच्याच मताचा होता.

**कला**--मग कौतुकाला बोलवा पाहिजे तर.

**धुरंधर**--कशाला ? इथें कांहीं व्होट्स् घ्यायचे नाहींत.

**लीला**–(उठून) मी जाते. मला वेळ नाहीं असल्या गोष्टींना. मला अभ्यास–

**धुरंधर**–अभ्यास तर नेहमींचाच आहे. जरा बैस–

**लीला**–माझं मन यांत नाहीं लागत.

**स०**–मग तुझं मन कशांत लागलं आहे हेंच तर मी विचारणार आहें.

**लीला व कला**–आमचं लक्ष अभ्यासाकडे लागलं आहे.

**विलास**–या प्रेमविषयाच्या अभ्यासाबद्दलच विचारणार आहेत.

**लीला व कला**--(नाकमुरडून) वरं, समजलं हो. (धुरंधर हंसतो.)

**स०**--मुलींनो, मी कांहीं हेतूनें विचारतें आहे. उगीच उडवाउडवी करूं नका.

[**पद**–" बोलो मुबारक० " ही चाल.]

**हृदयिं पूजिता कवण शुभंगा, सत्य सांगा, साह्य मागा, निज अनुरागा ॥धृ०॥**
**ओळखले तुमचे प्रणयविकार, प्रणयतेज तुह्मांवरि साचार, ।**
**मनोवृत्ति तुमची प्रणयाकार, प्रेमदेवता आपुल्या सांगा ॥ १ ॥**
**होत चहूंकडे प्रेमपुरस्कार मूढ तोचि जो करी तिरस्कार ।**
**आह्मी कां करूं वायां प्रतिकार, प्रेमदेवता आपुल्या सांगा ॥ २ ॥**

**धुरंधर**–हं चला बोला विलास, तुमचंच मत सांगा आधीं.

**सगुणा**--त्यांचं मत मी सांगतें घ्या. त्यांना अगदीं मनापासून ह्मटलं तर आपल्या लीलेप्रमाणें लव्हेस पाहिजे. तशी नाहीं मिळाली तर मग कलेसारखी पाहिजे. तीही नाहीं मिळाली तर हे राख फांसतील.

**धुरंधर**--होय का? बरं लीले, तुझं?

**विलास**--त्यांचं पोट मला ठाऊक आहे. त्यांना विनोदासारखी जोड पाहिजे.

**सगुणा**--आपल्या इथें गेल्यावर्षी विनोद होता तो? अस्सं. अस्सं.

**धुरंधर**--मला तसा संशय आलाच होता.

**सगुणा**--हं, तुह्मी कलाबाई? तुमचं मत एकदां सांगून टाका.

**धुरंधर**--तिला होतां होईतों विलासाप्रमाणें--कां? खरंना कले?

**विलास**--त्या काय बोलणार? तिन्हीं मतं आपण ऐकलींत. यांतलं राईट रॉंग आतां आपणच सांगा.

**धुरंधर**--माझा निर्णय तुह्माला रुचला पाहिजेना. पण खरं पुसाल तर लीलेची निवड मात्र मला इतकी पसंत नाहीं.

**विलास**--हाच योग्य निर्णय मिळेल असं मला वाटतच होतं.

**सगुणा**--लीले, तुला आह्मीं फार शहाणी समजत होतों.

**लीला**--वाटेल त्यानं वाटेल त्याचं अमुक मत ह्मणून ठोकून द्यावं. बाबांनीं त्याचा निर्णय द्यावा व आईनं त्यावर चांगले वाईट रिमार्कस द्यावे. योग्य!

**वि०**—मग काय, माझी अटकळ चुकीची आहे? असेल तर पेढे वाटीन.

**धुरंधर-सगुणा**–मग एक्स्क्यूज. तूं खरं असेल तें सांग.

**कला**–हें काय ? ताई, इतके दिवस माझ्याजवळही तूं विनोदाचंच.

**लीला**–विनोद अपूर्ण आहे व त्यावरील माझं प्रेमही अपूर्ण आहे.

**सगुणा**–ह्मणजे काय बाई ! अपूर्णन् पूर्ण–

**धुरंधर**—मी समजलों; मग सांगेन. कले तुझं ?

**कला**–माझंही थोडें ऑडिट आहे. कारण,

[ **पद**--" घुंगरु वाजे " ही चाल. ]

**निश्चय न मदीय कांहीं । अजुनि पाहीं । माझें मज कळत नाहीं । ध्रु० ।**
**दृष्टिस अगिं विषय फार ॥ चपल मना बहु विचार ।।**
**प्रेमव्यक्ति ही अपार ॥ प्रेमळलें ॥ प्रेम फिरे ठायिंठायीं ॥अजु० ॥ १॥**

**विलास**--( मध्येंच स्वगत ) अरे अरे ! हें मी काय ऐकतों आहे.

**लीला**–विलास पेढे वाटतानाहो ?

**विलास**--( स्वगत ) काय वाटूं आतां कपाळ.

**धुरंधर व सगुणा**--मग आमचे सगळेच अंदाज चुकले ह्मणायचे.

**विलास**--नाहीं, माझ्याविषयींचा अंदाज बरोबर आहे. पण--

**धु०**–( नोकर प्र० क० त्यास ) कसलीं हँडाविलं आहेत पाहूं ?

**सगुणा**–( पाहून ) अगबाई ! हे विलास कोण ?

**विलास**--मीच; माझींच हँडबिलं आहेत तीं.

**कला**--( खोंचून ) होग ताई, काय आहे त्या हँडबिलांत ?

**सगुणा**—( वाचते ) कौतुकविलासीरत्नभांडागार. " प्रचंड कारखाने, उदंड उद्योग, अखंड चैन, संपूर्ण राजेरजवाड्यांचं साहाय्य, विलासांचं भांडवल, कौतुकाची मेहेनत, जगांतल्या नामांकित कारागिरांची करामत, शहरच्या प्रतिष्ठितांची देखरेख, आणि ऑनररी विद्वानांचं सल्लागार मंडळ. कारखान्याची सविस्तर यादी मागाहून लवकरच प्रसिद्ध होईल. नक्की दिवस आज कळवीत नाहीं, स्तोम माजवीत नाहीं,आणि जाहिरात वाढवीत नाहीं."

**कला**–( डोळे मिच. विलालास ) थँक् यू. इतकी तयारी केव्हां केलीत ?

**सगुणा**--पण आपल्याला कळूं देखील दिलं नाहीं !

**धुरंधर**--ही जाहिरात दुसरी आहे कीं काय ?

**लीला**--माझ्याजवळचं हँडबिल दुसरंच आहे. !

**धुरंधर**--( वाचतो ) विनोदगुणग्राहीकलामंदिर. " जारीनें तयारी चालू झाली. जानेवारीचे पहिले तारखेस कामकाज सुरू होईल. सुमारें हजार पेटंटें. रोज

नवीन शोध लागताहेत व नवीन पेटंटें मिळताहेत. प्रथम सुरू होणार, डेली युनिव्हर्स ऊर्फ दैनिकविश्ववर्तमानपत्र, हुन्नरकलाशिक्षणवर्ग, ग्याससप्लाय कारखाना, विजेच्या पुरवठ्याचा कारखाना, यांत्रिक सामानाचा कारखाना, ओतींव व घडीव कामाचा कारखाना, एक प्रचंड गिरणी, इतरांची योजना, इमारत, प्लान वगैरे होत आहे. कारागीर, लेखक, पारखी, कारकून, सराफ, नानाप्रकारचे लोक येतील तेवढे पाहिजेत. कारखान्यांना तूट नाहीं व कामाला खोट नाहीं. सर्वांस मोकळीक!"

**कला**--माझ्यापाशींही हेंच विनोदाचंच हँडबिल आहे.

**सगुणा**--आपल्या इथें गेल्यावर्षी होता त्या विनोदाचं ?

**धुरंधर**--होय, त्याचंच. चला पाहायला जाऊं. पण या पहिल्या हँडबिलांतला हा कौतुक कोण ?

**विलास**--आपल्या प्रेसांत आहे तोच.

**कला**--थ्यांक्यू मि. विलास. वास्केट फुल थ्यांक्स. खरं कीं नाहीं बाबा !

**धुरंधर**--थ्यांक्स् तर आहेतच. कारण उद्योगाची प्रशंसा केलीच पाहिजे. पण यांच्यापेक्षांहि विनोदाला जास्त थ्यांक्स दिल्या पाहिजेत. नुसत्या थ्यांक्सच नव्हेत तर त्याचं कॉन्ग्राज्युलेशनच केलं पाहिजे.

**सगुणा**--उगीच त्याला जाऊं दिलं आपल्या इथून.

**लीला**--अजूनही आणखी वाटेल. आज विनोदावरील माझ्या प्रेमाचा जो उपहास होत आहे तो पुढें आपण कसा कराल तें पाहीन मी. लहानपणीं माझ्या भातुकलीची तऱ्हा पाहून मला 'संसारी-सावित्री, संसारी-सावित्री' ह्मणून तुह्मी फार चिडवीत होतां त्याची आठवण देऊन आज मी पुन्हां बजावतें कीं, मी माझ्या कर्तबगारीवर खरोखरच संसारी-सावित्री होणार. विनोदाला उद्योगी-सत्यवान करून त्याच्याशीं लग्न लावणार आणि इतरही कित्येक रिद्धि-सिद्धींकडून विनोदाच्या घरीं पाणी भरविणार !

**कला**--काय काय? मी पाणी भरणार! बरं आहे दाखवीन!

**विलास**--अन् मी काय तोंडाकडे पाहणार? बरं आहे पाहीन !

**लीला**--बाबा, आई, या प्रेमसंसाराची मौज आतांच आहे.

[ **पद**—"वनिता आवेरण०" ही चाल. ]

**खरी नररत्नपरीक्षावेळचि या काळीं ॥ ध्रु० ॥**
**दोन दीप तेजाळ चमकले दाविती दीपवाळी ॥**
**अखंड नंदादीप कोणता, जाइल कोण सकाळीं ॥१॥** (पडदा.)

## [ अंक तिसरा समाप्त. ]

# अंक चवथा.

—:०:—

## प्रवेश १—लव्हली लॉज.

( धुरंधर सगुणा लीला व कला प्र० क० )

**सगुणा**–त्या विनोदाची खूपच भरभराट झाली बरं का ? कारखाने जोरानें चालले आहेत, शिलकेंत पैसाही पुष्कळ सांठला आहे आणि स्वतःचे बंगले, चाळी, बाग, शेतें वगैरे इस्टेटही त्यानं पुष्कळ केली आहे.

**कला**–विलासांच्या धंद्यालाही तेजी चांगलीच आहे.

**धुरंधर**–साधली खरी चांगली हतोटी त्यांना !

**लीला**—लोकांना देणग्या वगैरेही ते पुष्कळ देतात.

**धुरंधर**—ऐकली मीं सगळी त्यांची कीर्ति !

**सगुणा**—हल्लीं विनोदानं अगदीं अपूर्व असे कांहीं शोध लावून ते पेटंट घेण्यासाठीं पाठविले आहेत. मला गुणग्राहींची ' एकदां पहावयास या' ह्मणून नोट आली आहे.

**धुरंधर**—चला; आतां जातांना तिकडेच जाऊं. लीलाताई,

[ **पद**–" वाला प्रीत० " ही चाल. ]

**तूं निज प्रेमप्रवाहा मार्ग खरा काढिला ॥ ध्रु०॥ मोडुनी उलटी**
**मनाची खटपट । टाळुनि तीव्र विकारखडकपट ॥**
**चुकवोनि विविध तट। जगिं सुखपथ जोडिला ॥१॥**

**लीला**—आई, तुह्मीं कां बोलत नाहीं ?

**सगुणा**–काय बोलूं? दोघांच्या एकमतापुढं माझं एकटीचं मत--

**धुरंधर**–काय काय ? तुह्माला नाहीं इची निवड पसंत?

**सगुणा**–नाहीं. मुळींच नाहीं मला पसंत. चांगले राजेरजवाडे मागणी करीत असून लीले, हें ग काय तुला आठवलं ?

**लीला**–आई ! माझ्या मनांतली गोष्ट यापूर्वीच अनेक वेळां मीं तुह्मांला सांगितलेली आहे. तरीपण आज पुन्हां प्रेम आणि संसार या दृष्टीनं मी तुह्मांला असं विचारतें कीं, विवाह ही संस्था कशासाठीं निर्माण झाली आहे ? संसार ही काय नीति आहे ? प्रेमाचा आणि संसाराचा संबंध काय ? अशा पायऱ्या-पायऱ्यांनीं तुम्ही या गोष्टींचा विचार केलांत काय ?

**धुरंधर**–योग्य योग्य. मीं याच दृष्टीनं सर्व गोष्टींचा विचार केला.

**सगुणा**—लीले, या गोष्टी तूं मला शिकवायला नकोस ? तुझ्या या प्रश्नांवर मीही असा एक प्रश्न तुला विचारतें कीं, वंश ही ग काय चीज आहे ? आपण, आपला वंश आणि त्याची कीर्ति–उन्नति यांचा संबंध काय आहे ?

**लीला**–तें सांगतें, पण वंशाची उन्नति प्रेम–विवाहानं होईल-का जबरीच्या व आशांच्या विवाहानं होईल हें सांगा आई !

**सगुणा**—पण प्रेमविवाहांनीं प्रेमसंसार करीत जी गोष्ट वंशासाठीं करायची ती जर आजच घरीं चालून आली तर ?

**धुरंधर व लीला**—ती काय आली आई ?

**सगुणा**–आणखी आतां काय यायची राहिली आहे ?

[ **पद**–" गुलवास फुली० " ही चाल. ]

**राजवर्ग तो विनवणी करी ॥ माळ घेउनी उभा निज करीं ॥**
**स्वयें संपदा चालुनि ये घरीं॥ सुखविलासमय जी ओटी भरी ॥१॥**

**लीला**—हं: हं: हं. आईची दृष्टि ऐश्वर्यमय आहे. प्रेममय नाहीं.

**सगुणा**–मोठी प्रेम प्रेम करते. ते काय प्रेमाशिवाय मागणी करताहेत ?

**लीला**—आई, नुसत्या रूपावरची आवड हें प्रेम का ?

**सगुणा**–प्रेमाचं आकर्षणच रूपलावण्यावर.

**धुरंधर**–प्रेम-पवित्र प्रेम-हें नव्हे.

**लीला**–वंशाची उन्नति पवित्र प्रेमानं होते.

**धुरंधर**--आपली उन्नतिही आपल्या पावित्र प्रेमामुळंच झाली आहे.

**कला**–पण आपल्या आवडी नावडी टाकून दिल्या ह्मणजे प्रेमाला पवित्रपणा येत नाहीं का ?

**लीला**–ओहो ! तरी ह्मटलं, अजून कलाबाई कशा बोलल्या नाहींत ?

**सगुणा**–थट्टेवर नको उडवूंस; बरोबर आहे प्रश्न तिचा; दे उत्तर.

**लीला**–नुसती थिअरी काय कामाची ? प्राक्टिकल व्हूनें बोला.

**धुरंधर**-हो; आवडनावड एकीकडे ठेवा हें ह्मणणं सोपं आहे. पण करणं फारच कठिण आहे–नव्हे हल्लींच्या एकंदर स्थितीप्रमाणें पाहतां मनुष्यस्वभावाला अशक्यच आहे. मग असं जर आहे तर आवडीनावडीच्या कलाप्रमाणेंच वागून प्रेमसंसार गोड व उन्नतीप्रद करून घेणं काय वाईट ?

**सगुणा**–मीं ह्मटलंच होतं कीं, दोघं एकीकडे व मी एकटी एकीकडे !

**लीला**–तसं नाहीं आई ! जगांत जें आहे तेंच ठीक आहे.



**कला** (जातांना) अहाहा, ध्यानीं मनीं विलासच विलास.

पृ. ६५.

The Lakshmi Art Bombay.

[ पद--"हट छोड सखे० " ही चाल. ]

**जगताची सुखदाची सर्वरसासरची ॥ ध्रु० ॥**
**ही दे जगता रम्य रसिकता प्रणयरता दे गति साची॥**
**संसारकुळें जुळति इजमुळें लोकीं भिन्नविभिन्न गुणांची ॥ १ ॥**

**सगुणा**-बरं जाऊं देना. तुझी निवडणूक योग्य. मग कांहीं आहे ?

**धुं०**-( हंसत ) ती कला तोंडाकडे पाहूं लागली. तुझीही योग्य आहे हो.

**कला**—चला यायचं ना विनोदाचे कारखाने पाहायला ?

**धुरंधर**-हो चला. ना कुणाची आहे ?

**लीला**—परत येतांना विलासांचे कारखानेही पाहून येऊं.

**सगुणा**-हो येऊं. चला. (कलेशिवाय सर्व जातात. )

**कला**—( जातांना ) अहाहा, ध्यानीं मनीं विलासच विलास !

[ पद--"डोलो रंग० " ही चाल. ]

**मोदें मन उचंबळें ॥ होई बहु उतावळें ॥ ध्रु० ॥**
**दुस्तर हें प्रेमजाळ ॥ लावि ध्यास सर्व काळ ॥**
**कधिं गळां पडेल माळ ॥ मजसि नाकळे ॥ १ ॥**

**पडद्यांत**-कले, तिकडे काय करितेस. बाबा निघाले.

**कला**—हो आलें ताई, चल. (जाते.)

---

## प्रवेश २–एस्प्लेनेड रोड, मेडोस् स्ट्रीट् नाका.

(धुरंधर व सगुणा एकमेकांशीं बोलत प्रवेश करून निघून जातात. मागून लीला व कला प्र० क० )

**कला**-काय ताई बोल. मी आतां विनोदाच्या घरीं पाणी भरणार ?

**लीला**—कले, आज सहा महिने झाले, तूं असंच बोलत आहेस! पण कांहीं पाहिलंस, चौकशी केलीस, का आपलंच घाटीत आहेस ?

**कला**—कां बरं ? असं कां विचारतेस ?

**लीला**—इकडे विनोदांचा उद्योग जोरानं चालला तसा तिकडे विलासांचा उद्योगही चालला आहे ह्मणून तूं असं आपल्या ठिकाणीं ह्मणत असशील; पण–

[पद–राग बागेसरी, ताल झंपा.]

**प्रेमसंसार हा गहन अति रंग वी ॥ प्रणयिं सुखलालसा**
**बहु चकवि गुंगवी ॥ धृ० ॥ गुणपरीक्षा हरी ॥ दृष्टि भोळी करी ॥**
**दक्षता नच जरी ॥ भुल पडे नवी नवी ॥ १ ॥**

**कळा**–मग काय माझी समजूत चुकीची आहे?

**लीला**–चुकीची? अग एकदां नव्हे, पण हजारदां चुकीची.

**कला**—हजारदां चुकीची असं कशावरून ह्मणतेस?

**लीला**—कशावरून ह्मणजे? माझ्या अनुभवी अटकळीवरून. कले, भक्कम पायापासून शास्त्रीय पद्धतीनं बांधलेल्या इमारतीची शाश्वती जास्त, का वरच्यावर काड्या मोळ्यांनीं बांधलेल्या डोल्याची शाश्वती जास्त? भाडोत्री बायकांनीं किंवा नवऱ्यांनीं कुठें संसार होतात का? कले, विलासाचा हा सर्व भपका आहे. माझ्या माहितींत ज्या गोष्टी आल्या आहेत त्यावरून विलासाचं लवकरच दिवाळं निघणार हें मी तुला खास सांगतें.

**कला**–काय दिवाळं निघणार? तूं काय ऐकलं आहेस ताई?

**लीला**–अग, बुडत्याचा पाय खोलांत. पैशाच्या जोरावर पसारा मांडलान् बारभाईचा कारभार केला. चार चोहींकडचे हुरळफुंके लोक भोंवतीं जमले. पैशाचा खो झाला. घेणेंकरी वाढले. इमारत केव्हां ढांसळेल याचा नियम नाहीं. स्वतः कांहीं समजत नाहीं तसा उद्योगही करायचा नाहीं.

**कला**–समजत कां नाहीं? ते व कौतुक यांनीं स्टडी केला ह्मणतातना?

**लीला**—कोण सांगतं तुला हें? कौतुकच ना! (ती मान डोलावते) हंः हंः कले, तूं इतकी शिकलीस, पण तुला पोंच नाहीं कीं स्थिर दृष्टी नाहीं. मला सर्व कळली आहे कौतुकाची लबाडी. पहिल्यानदां तूं माझ्या विरुद्ध असतां मागून विनोदाच्या कार्यांत मला कां अनुकूळ झालीस हें सर्व मीं त्याच वेळीं ताडलं होतं. तुला वाटलं कीं, ताईचं मन पूर्णपणें विनोदांत गुंतलं कीं, विलास अनायासेंच आपल्याकडे वळतील. ह्मणून तूं विनोदाच्या बाबतींत मला उत्तेजन व साहाय्य देऊं लागलीस. विनोदाची प्रतिष्ठा व त्याबरोबरच माझी वाखाणणी होऊं लागली तेव्हां तुला वाटलं कीं, ताईनं एक भिकारी तयार केला तसा मी नाहीं का करूं शकणार? ह्मणून कौतुकाला तूं हातीं धरलंस. आतां खालीं का पहातेस? खोटं असेल तर बोल. मला आतांपर्यंत कळूं दिलं नाहींस पण तें कळल्यावांचून का राहतं! कौतुक तो कौतुक! त्यानं थापा दिल्या अन् तूं भुललीस!

**कला**—वाः त्यानं मला त्याच्या स्टडीचीं टांचणं देखील दाखविलीन्ना?

[ **पद**–"रामको आधार० " ही चाल. ]

**किति निबंध सुप्रबंध गद्यपद्य भाषणें ॥ किति विनोद, बोध, शोध**
**भोगयोग साधनें ॥ ध्रु० ॥ किति प्रतिमा सुलकामा कितितरी**
**नकाशे ॥ दाखविके समजविलें नको देउं दूषणें ॥ १ ॥**

**ली०**-हं:हं:हं: ! लग्नाकार्यांत सर्व बायकापुरुष नटतात ह्मणून सगळ्यांचेच दागदागिने व कपडेलत्ते घरचे असतात असं मानितां येईल का? आणि ते देखील आह्मी हें उसनं किंवा चोरीचं साहित्य आणलं आहे असं सांगतात का? शेतांतून मूठ मूठ दाणा आणला किंवा बागांतून दोन दोन फुलं चोरून आणलीं तर आपली चोरी फुटत नाहीं तसें भिकारीपणही उघडकीस येत नाहीं. ग्रंथांचं भांडार आज असंच अमूप भरलं आहे, वाटेल त्याला अठरा ठिकाणचीं अठरा धान्यं गोळा करून ऐट मारतां येते. तसं कौतुकानं केलं आहे. पाहिजे तर अजून परीक्षा घे, मूळांत कांहीं सांपडणार नाहीं !

**कला**-मग आतां तूं एकटीच जा विनोदाकडे. मी नाहीं येत. मी इथेंच उभी राहते. कौतुक आतां इथें भेटेल. त्याची परीक्षा घेते. तो विलासाकडे निरोप सांगायला गेला आहे. (पडद्यांत पाहून) तो पहा तो येतोच आहे.

**लीला**-या निरोपानिरोपींतही त्याची लबाडीच आहे. इकडे आपल्याला तो दाखवितो आपल्याकडचा; तिकडे विलासालाही तसंच भासवितो. पण तो कोणाशींच सच्चा नाहीं, हें मीं पहिल्या दिवशींच ओळखून घेतलं होतं. पण अनायासें गोड बोलण्यानं जर एकादा आपल्या आड येत नसला तर त्याला चिडविण्यांत काय शहाणपण? या समजुतीवर मी जशास तसं वागून ज्याला जसं हवं तसं चारीत झुलवून माझं कार्य साधीत नेलं. तुला देखील हें सांगितलं नसतं, पण कले,

[ **पद**—"मने सहाय करसे०" ही चाल. ]

**तूं माझी सहोदर भगिनी ॥ अतिजिवलग मज लागोनी ॥**
**मम जीव स्वस्थ राहीना मतिभूल तुझी पाहोनी ॥ ध्रु० ॥**
**आधींच जग हें अनुकरणी बरी प्रणयाचा सारा ॥**
**जाण तयाचा प्रताप सारा ॥ सारासार विचार घे मनीं ॥ १ ॥**

**कला**—ताई, तुझे खरोखर माझ्यावर हे अनंत उपकार आहेत.

**लीला**-कौतुकविलासावर हुरळलीस तशी माझ्यावर हुरळूं नकोस. प्रत्यक्ष अनुभव घे. ते पहा ते आलेच. तो विलासही आहेच बरोबर. मी जातें.

(लीला जाते आणि विलास व कौतुक प्र० क०)

**कौतुक**-कलाबाई, जगमान्य विलास आले. त्यांच्याशीं कांहीं बोला?

**विलास**-त्या मानी. आह्मी बोललं पाहिजे. आमचे दहा शब्द होतील तेव्हां त्यांचा एक शब्द निघाला तर निघायचा. गुडडे मिस् कलावतीबाई!

**कला**--गुडडे का ब्याडडे ? आपण सांगाल त्यावरच खरं मानायचं.

**कौतुक**-असेल तसंच तोंडांतून निघतं. पोट भरल्यावांचून ढेंकर येते का ?

**कला**-हो हो. अनुशपोटींही ढेंकर येतात. नाहीं असं नाहीं.

**विलास**-तें सुख विनोदाकडे सोपलं आहे. आमच्याकडे नाहीं.

**कला**-कित्येक माणसं आंत उपाशी असूनही जेवल्यासारखं दाखविण्यासाठीं बळेंच ढेंकर देतात. तसं तर नाहीं ना आपलं ?

**कौतुक**-(कलेस) आज तुह्मी असं आडवं तिडवं कां विचारतां?

**विलास**-कोणी कली भरला असेल. जगांत उपद्व्यापी थोडे कां आहेत?

**कला**-होय; पण मला एका खास माणसाकडून कळलं आहे कीं, आपला पाय हल्लीं खोलांत आहे.

**विलास**-(हळूंच) कौतुका, इला हें कसं रे कळलं ?

**कौतुक**-कोणी भेद्या भेटला. मी नव्हतों ह्मणत कीं, आपलं घर फुटलं आहे?

**कला**-(स्वगत) हे बोलत नाहींत तेव्हां लीलाताईचं म्हणणंच खरं वाटतं. अन् तसं असेल तर मग माझा प्रेममनारेथ मला पुन्हां परत फिरविला पाहिजे. हायहाय !

[**पद**--तोडी--त्रिवट.]

**किति गरगर फिरुं मन बावरलें ॥ बुद्धि यापुढें माझी नचले ॥ ध्रु० ॥**
**चोहिंकडे अनंत वाटा ॥ फुटति पदोपदिं मम धैर्य गळे ॥ १ ॥**
**मजसि नसे माझी दृष्टी ॥ नांव कळा परि विकळा बनलें ॥ २ ॥**

**विलास**-कां ? आणखी कांहीं विचारित नाहीं तुम्ही कलाताई ?

**कला**—विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर तर द्याल कीं नाहीं आधीं ?

**कौतुक**--कलाबाई, टीकाकारांच्या तोंडीं न लागण्यांतच भूषण आहे. त्यांतून जनांच्या तोंडाला हात कुणीं द्यावा ? आपोआप लवकरच दिसून येईल कीं, विनोदाचं दिवाळं निघालं कां विलासांचं निघालं ?

**विलास**--अन् मग आह्मी टीकाकारांना उत्तर देऊं. (स्वगत) आतां इथें जर का मागणेंकरी येऊन पोहोंचले तर मात्र फजीती होईल.

**कौतुक**-कलाबाई, आज आह्मी बोलूंच कशाला ? मेला मेला ह्मणून खोव्या कंज्या पिकतात तसंतसं त्याचं आयुष्य वाढत जातं.

**कला**-देव करो अन् तसंच होवो!

**कौतुक**-विनोदाच्या जागीं मी राहिलों अन् आपण लीलेप्रमाणें माझं कौतुक करतां हें पाहून माझ्याबद्दल बरी कुणीं अजून कुटाळी केली नाहीं. ?

**कला**–कुटाळी अशी नाहीं केली कुणीं; पण मला असं मात्र एका चांगल्यानं सांगितलं कीं, कौतुकाला मूळांत कांहीं येत नाहीं.

**कौतुक**–मूळांत व शेंवटीं कोणाला काय येतं ? मूल जन्मतं तेव्हां त्याला काय येत असतं ? अन् शेवटीं मेल्यावर तरी त्याला काय आठवतं ?

**विलास**–तें कांहीं नाहीं. शेवटीं खातं पोतं बरोबरच.

**कला**-तसं नाहीं. मी असं ऐकलं कीं, कौतुकानं मला ज्या ज्या कांहीं विद्वत्तेच्या व ज्ञानाच्या गोष्टी दाखविल्या त्या त्याच्या स्वतःच्या नाहींत.

**कौतुक**–स्वतःचं कोणी झाला तरी थोडंच निर्माण करतो ? सगळं कांहीं सृष्टीचंच आहे. आम्ही आमच्या नांवावर तें आमच्या बांधवांना द्यायचं.

**वि०**–'आम्ही स्वतःच्या डोक्यांतून काढतों' हें मायावीपणाचं बोलणं आहे.

**कला**–तसं नाहीं हो. त्याचं म्हणणं तें देखील तुम्ही स्वतः करीत नाहीं. दुसऱ्याचं उसनं व चोरून आणून आपल्या नांवावर विकतां.

**विलास**–मूर्ख आहेत ते ? कलाबाई, आम्हांला प्रत्यक्ष आमच्या बापाचं नांव आमच्या नांवापुढें लावून मिरवणं--त्यांच्या नांवावर स्वतःला विकून घेणं खपत नाहीं; ते आम्हा दुसऱ्याचं चोरून आणूं का ? असेल कोणी मायेचा पूत तर आडून कां बोलतो, समोर येना म्हणावं. कलाबाई,

[ पद--" बोलवाला हुई०" ही चाल.]

**सिद्ध द्याया सदा मी परीक्षा ॥ ध्रु० ॥ पूर्ण गति जाहली सर्व शास्त्रांतरीं ॥ आज सत्ता मला विविध भाषांवरीं ॥ मंत्र कीला कलातंत्र माझ्या करीं ॥ यंत्रशास्त्रांस मी देई शिक्षा ॥ १ ॥**

**कौतुक**–( स्वगत ) विलासांनीं यावेळीं खूप सोंग बजावलं. ( उघड ) कलाबाई पाहिजे तर तुम्ही अजून परीक्षा घ्या. घेतां ?

**कला**—परीक्षा काय आज नव्यानं घ्यायची आहे ? मी काय तुमची व यांची योग्यता ओळखत नाहीं ? एवढया कारखान्यांचे कारभार योग्यतेवाचून का चालतात. मला सांगणाराला असंच दुसऱ्या कोणीं भडकविलं असेल. पण जाऊं द्याना या गोष्टी आतां.

**कौतुक**--तुह्मीतर आज जाऊंद्या ह्मणतां; पण नवीन गोष्ट ग्रहण करितांच जुन्या आह्मीं नेहमींच मनांतून काढतों. आज पंधरा दिवसांचीच गोष्ट. अलीकडे जर्मन लिटरेचर व जर्मन मशिनरींचा स्टडी आम्हीं सुरू केला आहे. आतां मागचं इंग्लिश, संस्कृत, फ्रेंच इत्यादि लिटरेचरकडे ध्यान ठेवा कशाला ?

**कला**--उघडच आहे. जुनं घोळत बसण्यांत अर्थ काय ? एकाद्या वेळीं मला

दुसऱ्यानं सांगितलेलं खरं वाटतं व त्या भरांत मी तुह्माला बोलते तें मनावर घेत जाऊं नकाहो.

**विलास**--छेः छेः भलतंच ? तुमचा भोळा स्वभाव मला ठाऊक आहे.

**कौतुक**-( स्वगत ) तूं भोळी आहेस ह्मणून तर मला फावलं आहे.

**विलास**--हल्लीं जर्मनी, अमेरिका, फ्रान्स, या देशांशीं आमचा व्यवहार फार वाढला असून तिकडचीं नवीं नवीं यंत्रं आह्मीं मागविलीं आहेत.

**कौतुक**-आणखी कांहीं कारागिरांना स्वतंत्र धंदे काढतां यावे म्हणून शेअर होल्डिंगची स्कीम पण सुरू केली आहे. ( स्वगत ) सांगून ठेवलं म्हणजे बरं.

**विलास**--उद्योगधंद्याची तुम्हालाही हौस होती व मलाही एकदां आपण जगांत जायगँटिक औद्योगिक कारखाने काढून सर्वतोमुखीं व्हावं असं वाटलं. त्याप्रमाणं बहुतेक तडीस गेलं. आतां चांगलीं माणसं पाहून त्यांना सगळं देऊन टाकणार व मोकळा होणार. ( स्वगत ) कोणाला ठाऊक मोकळा होणार का काय होणार तें !

**कला**--हो हो. ही दगदग तुम्हांला कशाला पाहिजे ?

**कौतुक**--केव्हां केव्हां करावीही लागते. आतां पुढें तर आनंदीआनंद—

**कला**--त्या आनंदांत मग आतांच मी एका आनंदाच्या बातमीची भर टाकतें. माझ्या मनांत आतां विलासाबद्दल कांहीं नाहीं, आणि माझ्या मदरफादरनाही माझी प्रेमाची निवडणूक पसंत पडली आहे. बहुतेक बाबा आतां केव्हां-तरी तुमच्याजवळ यासंबंधानं गोष्ट काढतील. विलास,

[ **पद**--" आये बंदर " ही चाल. ]

**संदेह मम निरसला ॥ आनंद हृदयीं नटला ॥ जीव रमला ॥ ध्रु० ॥**
**वरो संपदा विजयही सदा, टळो आपदा, हौस बहुतची ही मला ॥ १ ॥**
**विलास मजह्मणें कला विकासिनी हीच विनवणी प्रियनाथचरणकमला॥२॥**

**कौतुक**--(कला जातांच त्याच्या हातावर टाळी देऊन ) कां महाराज !

**विलास**--महाराज काय ? " उपरसे तो खूप बनी है ओर अंदरतो आग लग रही है." सगळी दौलत खलास झाली, पूर्वींची सर्व इस्टेट गहाण पडली, धंद्यांत कर्जाचा बुजबुजाट झाला. घरांत माणसं कंकासू लागलीं,---

**कौतुक**--उंः, असे भितां काय ? धंद्यांत अडचणी ह्या यायच्याच, त्याचं काय? एवढी आपल्या हाताखालची सर्व मंडळी धीर देताहेत तें उगीच त्यांना कांहीं समजत नाहीं ह्मणून ? धंदा आहे. असंच चोहींकडून घेऊन येतं पण पैशाची वृष्टि एकदांका व्हायला लागली ह्मणजे किती घेऊं ह्मणून तुह्मांला होईल.

**विलास**-होईल तेव्हां होईल; पण आतां घेणेंदार आले म्हणजे काय जाब देऊं? बहुतेक घरीं जाऊन धरणें धरून बसले असतील. मी जायचा अवकाश कीं मला तोडतोडून घेतील. मला कांहीं आतां धडगत दिसत नाहीं.

**कौतुक**-आपण कुठें चुकलों असं मला तर वाटत नाहीं.

**विलास**-मला मोठी चूक वाटते ती हीच कीं, आपल्याला स्वतःला कांहीं येत नसतां दुसऱ्यावर भरंवसा ठेवून करायला गेलों मोठं ?

**कौतुक**—असं कांहीं म्हणतां येत नाहीं. एवढाले धंदे चालले आहेत त्यांचे सगळ्यांचे मालक का कुठें शिकलेले आहेत? कांहीं नाहीं. मालक तर कुठंच मौजा मारीत पडलेले असतात व इकडे धंदे असेच चाललेले असतात.

**वि०**-हो; पण उद्यां उठून नोकर गमजा करूं लागले तर स्वतः धंदा चालवूं अशी त्याच्यांत धमक असेल तेव्हां. नाहींतर एवढा व्यवहार दुसऱ्यावर टाकून आजच्या काळांत आपल्यासारख्या मूर्खांशिवाय कोणी गाफील राहील का ? छेः छेः तोंडावर 'हो हो' करणाऱ्या भाडोत्री कळकळीच्या माणसांच्या हुलकावणीवर आपण हुरळलों हाच मूर्खपणा झाला. मला तर वाटतं अजून झांकली मूठ आहे तोंच आपण शहाणं व्हावं. कौतुका,

[ पद-" शिर ताज साज० " ही चाल. ]

**मज जवळ दिसत मरण मरण ॥ व्यसनप्रवाहीं न दिसे धरण,**
**तारिल कवण दयाभरण ॥ धृ० ॥ चल आंवरूं पसारा सारा, नच सोसे**
**दुगुणा मारा ॥ शोधूं कुणा सुगुणागारा न तरि विनोदा जाउं शरण ॥१॥**

**कौतुक**--काय विनोदाला आणि विलासांनीं शरण जायचं ?

**विलास**--खबरदार ! तूंही मला बुडविणाऱ्यांपैकींच एक आहेस.

**कौतुक**—मग कलेजवळ आपली निंदा करून आपल्यावरून तिचं मन उडविण्याचा प्रयत्न करणारी लीला आपल्या हातावर तुरी देऊन विनोदाच्या हातांत हात घालील व कलेवइल तिनं त्याच्या कानांत मंत्र फुंकला कीं तिलाही तो घेऊन जाईल. मग बसा ह्या कारखान्यांच्या लोखंडावर आपलं कपाळ घांशीत.

**विलास**—हो हेंही खरंच. मग कसं करूं तें सांग.

**कौतुक**—मी तुह्मांला बुडविणारा; माझी सल्ला मी नाहीं देणार.

**पडद्यांत**—( दुरून ) ते, ते पहा विलास-चला आतां सोडूं नका त्यांना.

**विलास**-हे कोण ? ( पडद्यांत पाहून ) अरे घेणेंदार ! आतां कसं करूं ?

**कौतुक**—द्या आतां जबाब. माझं काय? मी जाणून बुजून भिकारी. आपण जा ह्मणण्याचा उशीर कीं, बगला वर करून भीक मागायला निघून जाईन.

**विलास**—नको नको. असं नको करूं कौतुका,

[पद-राग-भैरवी.]

**तुजविण कोठें जाउं मी ॥ जाउं कोठें व्यसन मोठें तुजला नमीं ॥धृ०॥**
**मजसि कौतुकाविण न जगिं तुका न करिं इतुका प्रेमा कर्मी ॥ १ ॥**
**देइं न अंतर मित्रा क्षणभर राहुं बरोबर समीं विषमीं ॥ १ ॥**

**पड्यांत**—चला, पाय उचला लवकर. नाहींतर शिकार चुकेल.

**विलास**-(पड्यांत वारंवार पाहून ) ते पहा ते आलेच.

**कौतुक**—असें घाबरतां काय ? मी त्यांना जबाब देतों.

**विलास**—मी जरा ॲनूसरिंग कॉल ऑफ् नेचर करतों. (जाऊं लागतो)

**घेणेदारमंडळी**-(प्र० क० ) अरे चाल्यो. ए चाल्यो. भय्या इसकूं पकडो.

**कौतुक**-अरे काय आहे काय गडबड ? मला विचारा मी जाब देतों.

**कांहीं**-गडबड एटले. अमारा पैसा जोईए.

**कौतुक**-इतकेंचना ? चला घरीं-पैसे पैसे काय करतां ? कधीं पाहिले होते का नाहीं ? चला घरीं सर्व देऊन टाकतों. उगीच पिरपिर लाविली आहे ?

**विलास**-( हळूंच ) अरे पण घरीं जाऊन देणार काय त्यांना ?

**कौतुक**-ऐकाहो. तुझी गंमत तर पहा ! ( मंडळीस ) चला, पैसे हवेना ?

**कित्येक**-पैसे होते तर आह्मांला कशाला ना ह्मणून भडकविलंत ?

**कौतुक**--तुमची परीक्षा पहावयासाठीं-चला उचला पैसे.पुन्हां व्यवहार नको.

**कांहीं**-छेः छेः तसं नाहीं; पाहिजे तर आठ दिवस आह्मी थांबूं.

**विलास**—(स्वगत) अरे तिच्या ! खूप युक्ति लढविली यानं !

**कित्येक**-आणखी कांहीं पैसे लागले तरी देऊं तुम्हाला.

**कौतुक**-नको; माफ करा. आतां तुमच्याशीं व्यवहारच नको.

**सर्व**-आतां वाटाघाटच नको. हे रागावले आहेत, चला आतां. (जातात.)

**कौतुक**-कां कां ? अहो, पैसे हवेत ना ? घेऊन जा.( ते ' आंता नको ' ह्मणून जातात. ) कां विलास ? आतां तर हंसूं लागलां ?

**विलास**-आत्तां हंसून काय करूं ? ही वेळ अशी मारून नेली. पुढें ?

**कौतुक**-पुढें आणखी युक्ति. वेळ तसा खेळ. चला.

**विलास**-करशील बावा, मला खात्री आहे तुझी.

[ पद-" ढोलक तासा० "ही चाल. ]

**खचित कौतुका आधारचि तूं जगीं कौतुकाचा ॥**
**युक्ति शक्तिचा तूंच नियामक असशीं तूं साचा ॥ धृ० ॥**
**वशीकरण तें रम्य लोचनीं ॥ कर्णपिशाच्य वसे तव श्रवणीं ॥**
**स्पर्शरसायन तव करचरणीं ॥ मोहाची वाचा ॥ १ ॥ ( जातात. )**

## प्रवेश ३—फोर्ट, हमामस्ट्रीट विनोदगुणग्राहीकलामंदिर.

( गुणग्राही, विनोद, धुरंधर, सगुणा, लीला, कला व विद्या प्र० क० )

**गुण०**-विनोदांकडे हल्लींचं त्यांचं कार्यबाहुल्य व वैभव एवढ्यावरूनच पाहूं नका. तर पूर्वी ते अकिंचन होते हेंही त्याबरोबरच आठवा. ह्मणजे एकादा अकिंचन मनुष्य देखील किती व कसें काम करतो हें ध्यानांत येईल.

**धुरंधर**—यांत कांहीं शंका नाहीं.

[ पद--" भुलि मा तुं मुजे " ही चाल. ]

**स्तुतिलागिं स्मरे ना स्तवन स्तवन॥ वाचेसि स्फुरेना वचन वचन॥धृ०॥**
**रंग सुचेना रसने रस ना, केंवि करूं यांचें अभिनंदन॥ १ ॥**
**अंतरंग करि तरंगक्रीडा धन्य धन्य ह्मणतां रंगत मन ॥२॥**

**सगुणा**--आमच्याकडून यांची फार प्रतारणा झाली !

**विनोद**—छेः छेः असं ह्मणूं नका. पुढें कांहीं चांगलं व्हायचं असलं ह्मणजे अशाच गोष्टी प्रथम देव घडवून आणितो. देवाच्या सत्तेवांचून लहानशी काडीही हालत नाहीं. चांगलं वाईट हे भेद आपल्याला. त्याला सर्वच चांगलं.

**विद्या**-देवानं यांच्याकरितांच आपल्या घरांत सिद्धसाधकी जुळवून दिली होती. आपण निगेटिव्ह फोर्स लावीत होतां व लीलाताई उलट पॉझिटिव्ह फोर्स देत होती.

**गुणग्राही**—विनोदांच्या उत्कर्षांत तुमचाही भाग आहेच.

**कला**—खरी कामगिरी गुणग्राहींची व विद्यादेवींचीच.

**धुरंधर व सगुणा**-आम्हीही तेंच ह्मणणार होतों.

**गुणग्राही व विद्या**-आमच्या यशांत कलादेवीचाही भाग आहे.

**लीला**—हल्लीं कांहीं नवीन शोध लागले आहेत का ?

**विनोद**-हो हो. ते पेटंट मिळण्यास पाठविले आहेत. या शोधांनीं कार्य पुष्कळ पण व्याप थोडा, सुख व शोभा पुष्कळ पण खर्च थोडा, साधनं मुबलक परंतु सवंग; अशा रीतीनं अगदीं गरिबांत गरीब मनुष्याला सुद्धां आपला प्रेमसंसार थोडक्यांत टुमदार रीतीनं थाटतां येईल.

**कला**—( ठमक्यानें ) विलासांचे कारखानेही जोरांत चालले आहेत.

**विनोद**—असं का ? फार उत्तम. मीही त्यांची कीर्ति ऐकतों आहे.

**धुरंधर**-आतां हातांत कोणत्या शोधाचं काम आहे ?

**विनोद**-नवीन शोधांपेक्षां आमच्या उद्योगाच्या शाखा गांवोगांव काढण्याची स्कीम तयार करण्याकडे हल्लीं जास्त लक्ष वेधलं आहे.

**सगुणा**-वेल एकदां रुजला म्हणजे असा वाढूं लागतो.

**विनोद**—सरकारला उपयोगी पडतील असेही कांहीं शोध मला लावायचे आहेत म्हणजे सरकारच्या कृपेंत वाढल्यासारखीं सरकारची सेवाही आपल्या हातून झाल्यासारखी होईल.

**विद्या**-योग्य योग्य; माझ्या सेवेचं सार्थक झालं.

[ **पद**—" शिपाई पिंजरेमें०" ही चाल. ]

**सुखाचे हे गोड गोड बोल ॥ सौख्य कल्लोळ करिती अमोल ॥ ध्रु० ॥**
**आनंदविती बहु लोभविती म्हणति मनाला डोल ॥ १ ॥**
**उपराउपरि या महदाशा प्रेम रुजविती खोल ॥ २ ॥**
**हा यशोरवी मी ही पृथिवी घालिन भोंवति घोळ ॥ ३ ॥**

**गुणग्राही**—यांनीं आपल्या योजनेचा अर्जही दिला आहे.

**धुरंधर**-असं का ? वा: सरकारकडून याबद्दल मोठी शाबासकी मिळेल.

**सगुणा**— अगदीं स्वस्थ असे तुम्ही केव्हां व्हालसं वाटतं ?

**विनोद**--( हंसत ) मनुष्याला आपला मृत्यु कळता, मग काय ?

**विद्या**-इडापिडा टळो. भलतंच काय ! यांच्या विचारण्याचा अर्थ----

**विनोद**--मी समजलों. ( सगुणेस ) मनुष्याला मरेपर्यंत पोटापुरते तरी हातपाय हालवावेच लागतात. तो स्वस्थ कुठें बसतो ? यापुढें मला कित्येक अध्यात्मिक शोध अर्वाचीन पद्धतीनं बसावयाचे आहेत.

**लीला**--कले, ऐकते आहेस ना हें ?

**कला**--त्यांत काय ? विलासांना सांगितलं तर तेही असले शोध करतील.

**गुणग्राही**--( स्वगत ) रडले विलास ! त्यांना विलासही पुरते येत नाहींत.

**धुरंधर**--विनोद, तुम्ही इतके पुढें जाल असं वाटत नव्हतं.

**विनोद**--अजून माझ्या पुढें काळाचा पुष्कळ टापू बाकी आहे.

**लीला**--तो सर्व तुमच्या आयुष्यांत आक्रमून होईल काय ?

**विनोद**--माझ्याच्यानं ज्या गोष्टी करवल्या त्या केल्या आहेत, होण्यासारख्या आहेत त्या करतों आहे व आणखी ज्या कांहीं करतां येतील त्या शोधतों आहे. काळ अनंत आहे तशाच सुधारणाही अनंत आहेत. त्या कांहीं एकट्या माझ्यावर अवलंबून नाहींत. मनुष्याच्या मागें धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे पुरुषार्थ लागलेलेच असतात. ते करायचेच करायचे अशी बळकट महत्वाकांक्षा त्यानं बाळगिली म्हणजे ती साध्य होण्यास अडचण येत नाहीं.

**लीला**—आपल्यासारखे कर्ते पुरुष जगांत फार थोडे दिसून येतात.

**विनोद**-थोडे तरी असतात. पण तुमच्यासारख्या कर्त्या मुली तर दुर्मिळ.

[**पद्**–" डुलडुलत अहो० " ही चाल.]

**नव नवल मला वाटे मनाला कथितों जनांला ॥ ध्रु० ॥**
**आजवरी या संसारीं नारी जगीं नरावरि सौभाग्यवती ॥**
**परि आज नारी नरभाग्यकारी रामा जशी रम्य रामा यशाला ॥ १ ॥**

**कला**–परमेश्वर आपणास दीर्घायुषी करो!

**विनोद्**–माझी हिंमत खंबीर आहे तोंपर्यंत काळ माझ्या पासून दोन पावलं दूरच राहील, आयुष्याचं घड्याळ हळूं हळूंच चालेल आणि मरण देखील माझें-मर्त्याचें औद्योगिक पुरुषार्थकौतुक पाहण्याच्या हौसेनें माझी हौस पुरी होईपर्यंत थांबेल!

**सर्व**–वाहवा! वाहवा! विनोद तुमची कोणत्या स्तुतीनीं स्तुति करावी!

**विनोद्**–स्तुतिविती जी काय ज्यांना करायची असेल ती त्यांनीं आधीं त्या विलास कौतुकांची व कलाबाई, धुरंधर, सगुणा यांची आणि नंतर मग गुणग्राही, विद्या व लीलावती यांची करावी. सगळ्यांच्या उलट सुलट कर्तबगारीचं खेळणं ह्मणजे मी.

**धुरंधर व सगु०**--विनोद तुमच्या सौजन्याची कमाल आहे. आम्ही क्षमा-

**कला**—माझं खेटर मागतं आहे क्षमा. माझा विलास व कौतुक--

**एक नोकर**--(घाईनें प्र० क०) महाराज. ऐकण्यासारखी गोष्ट. विलासांच्या कारखान्यांतील म्यानेजर, कारागीर व इतर नोकर यांनीं काम बंद पाडलं. सावकारांनीं विलास व कौतुक यांना घेरून कारखान्याशीं धरणं घेतलं आहे. जिकडे तिकडे मागतेकऱ्यांनीं आपले लोक पसरून दिले आहेत. भांडाभांडी ओरडाओरडी, मारून सारखी धुमाकुळ चालली आहे.

**सर्व**--आं, आं, आं! काय विलासांचं दिवाळं निघालं?

**विनोद व सगुणा**–नुकतेच आह्मी तिकडे जाऊन आलों. आमच्याजवळ तर केवढी बढाई मारली होती त्यांनीं!

**गुणग्राही व विद्या**–कोणी आपल्या तोंडानं का आंतली स्थिति सांगतो?

**लीला**--काय कले, मीं सांगितलं होतं त्याचं आलं का प्रत्यंतर?

**कला**--कोणी द्वेष्ट्यानं मुद्दाम हें अरिष्ट आणलं असेल.

**विनोद**--चला आपण जाऊं व भांडण तोडूं. (सर्व हो हो ह्मणून जातात.)

**कला**--(दुसरे गेल्यावर जातांना)

[**पद्**--रागललीत.]

**हें वृत्त खरें का, मज ये शंका ॥ ध्रु० ॥ ग्रीष्मघनाची शुष्क गर्जना ॥**
**मायावी मारीचजल्पना ॥ श्रृगालमुखिंचि वृथा जल्पना ॥ कारिभ तिरेका ॥ १ (जा.)**

ग्रंथ संग्रह

**प्रवेश ४--गोलपिठ्याजवळील कौतुकविलासीरत्नभांडार.**

( सावकार लोक, विलास, कौतुक यांची भांडाभांडी. )

**कौतुक**—तुम्ही म्यानेजर, तुम्हीच लोकांना फितवितां ?

**म्यानेजर**—मी फितवितों ? शाबास--मीं तोडीचा उपाय काढला तो--

**विलास**-अरे, पण ती तोडही सध्यां पुरी होण्यासारखी नाहीं ना?

**दुसरा एक**—मग त्याला आतां मीं काय करूं ?

**विलास**-( नोकरांस ) इतके दिवस माझं अन्न खाल्लंत ! कांहीं तरी स्मरा.

**कांहीं**-अन्न काढतां ! कांहीं वाटत नाहीं ? फुकट दिलंत वाटतं ?

**१ घेणेंकरी**—असं भलतंच बोलूं नका; तुम्ही मालक आहां.

**विलास**-तुम्ही कांहीं मदत करा म्हणतों तर तेंही तुम्ही ऐकत नाहीं.

**२ घेणेंकरी**-हो दिले ते गेलेच, आणखी वर ही दक्षणा !

**कौतुक**-दक्षणा कां ? आम्हीं कांहीं फुकट थोडेच मागतों आहों ?

**विलास**—सगळे देऊं त्याबरोबर हेही देऊं.

**सर्व घेणेंकरी**-दिलेत तुम्ही आतां. तें कांहीं नाहीं. तोडबीड कांहीं काढतां कीं नाहीं ? का पुढची शोभा करून घ्यायची आहे ?

( विनोद, लीला, कला, विद्या, धुरंधर, सगुणा, गुणग्राही प्र० क० )

**विनोद**—काय, काय गडबड आहे ?

**लोक**-विनोदशेट आले रस्ता सोडा. शेटसाहेब आमची तोड करा.

**घेणेंकरी**-यावं यावं विनोद. चांगले वेळेवर आलांत.

**दुसरे कित्येक**-आतां यांना वांकडं बोलतां येणार नाहीं.

**विलास**-( स्वगत ) यापेक्षां मरण आलं असतं तरी बरं होतं.

**कौतुक**-विनोद, कलाबाई, लीलाबाई या भिकाऱ्याला सोडवा.

**सर्व**--भिकारी ? विनोद, हा भिकारीच मूळ लबाड आहे.

**कला**-अरेपण बावांनो, कांहीं सोईनं तर घ्याल ? धंदा आहे अडचण येते जाते, म्हणून असं कां करायचं ?

**कांहीं पांढरपेशे लोक**--कलाताई, धंद्याची गोष्ट कशाला ? धंदा तर आतां आहे, पण धंदा सुरू होतांना आम्हीं हँडबिलं लिहून दिलीं त्यांचे पैसे अजून मिळाले नाहींत, समजलांत ?

**दुसरे कांहीं**--तीं हँडबिलं देखील आमच्यामागून. आम्हीं या कौतुकासाठीं हजारों ग्रंथांतलीं टांचणं करून दिलीं, कविता रचून दिल्या, गोष्टी लिहून दिल्या, गायन, वादन, नृत्य, चित्रकलाचे निबंध दिले त्यांचे पैसे अजून कोठें आहेत?

**कला**–काय काय ? ते यांना तुम्हीं लिहून दिले होते ?

**मंडळी**—तर काय ? रात्रीच्यारात्री त्यावेळीं आम्हीं जागून काढल्या.

**कौतुक**--(स्वगत ) झालं आटोपलं. भ्रमाचा भोंपळा फुटला !

**धुरंधर व सगुणा**--कले, असाच का तूं कौतुकाला तयार केलास ?

**लीला**--तरी मी इला वेळोवेळीं बजावित होते कीं यांत लबाडी आहे.

**कला**--( डोळ्यांत आंसवं आणून )

[ **पद**-- राग परज. ]

**बोलुं काय जीभ तुटे । पाहुं काय नेत्र विटे । श्रवण रंध्र तेंहि मिटे । प्राण कोंडले ॥ ध्रु० ॥ तनु झाली सर्व बधिर । थिजलें मम सकल रुधिर । चलनवलन सर्वहि स्थिर । प्राण कोंडले ॥ १ ॥ चिरूं काय कंठनाळ । फोडुं काय हें कपाळ । छेदूं का हृदयजाळ ॥ प्राण कोंडले ॥ २ ॥**

**कांहीं कारागीर**--आतां पहा कसे विलास खालीं मान घालून बसले आहेत ! कारखान्यांची स्कीम घडतांना आम्हांला काय काय आशा दाखविल्या होत्या ! दोन तीन वर्षं यांचं नांव करण्यांत घालवून अखेरीस आम्ही आमच्या पगारालाही महाग झालों.

**गुणग्राही**--तुम्ही सगळे होतां मग असं कां झालं?

**घेणेकरी**—कारखाने चालविण्याचं काम यांचं थोडंच आहे? हे काय करतील ? विलासांनाच माणसं संभाळतां आलीं नाहींत !

**कामकरी**—माणसं संभाळायचीं होती कोणाला ? कांहींतरी आणायचं, कांहींतरी करायचं अन् मूळांत कांहीं नसायचं व वर मी असं केलं आहे म्हणून गोंगाट करायचा. आपल्याला समजत नाहीं, दुसऱ्याचं ऐकायचं नाहीं.

**कला**—अन् मग जर्मन मशीनरी, अन् अमेरिकन मशीनरी हें खोटंच का?

**सर्व**–यांची तोंडाची मशीनरी पाहून घ्या तेवढी.

**विनोद**–हें पहा, पुरे करा या गोष्टी आतां. दोन हातांनीं टाळी वाजते. अन् ती वाजायची असली म्हणजेच तसे हात जुळून येतात. विलास, कोणाचं काय काय देणं आहे त्याची नोंध आहे ?

**विलास**–कायरे कौतुका, आपण ठेवली आहे कारे नोंध ?

**सर्व**–(मोठ्यानें) घ्या. याचाही येथें पत्ता नाहीं.

**कौतुक**–नोंध काय ? ज्याला त्याला आपलं देणं ठाऊक आहेच.

**सर्व**–(गोंगाट करून) इतकी तर येथें सुव्यवस्था आहे !

**लीला**–बरं कामकऱ्यांची मस्टर्स-हजेऱ्या.

र–त्या गेल्या पंधरा दिवसांच्या लिहावयाच्या राहिल्या आहेत. बाकी सर्व तयार आहेत.कोणी गैरहजरच नव्हतं मग हजेऱ्या काय करायच्या?

**कला**–(हंसत) शाबास. म्यानेजरसाहेब शाबास!

**सर्व नोकर**–पैसे मिळेनात मग कामाकडे लक्ष कसं लागणार?

**विनोद**–बरं तें सगळं ठीक. आतां माझें ऐकाल कीं नाहीं?

**सर्व**–आपण मरायला सांगाल तरी मरूं महाराज.

**विनोद**--हें पहा, हा सगळा कांहीं बसल्या बैठकीला निकाल लागायचा नाहीं. तेव्हां तूर्त इतकंच सांगतों कीं, त्यांचं सगळं देणं मजकडे लागलं. मी हिशेब पाहून निकाल करीन.

**घेणेंकरी**–सावकाश. आपण मध्यें असल्यावर आमचे पैसे घरांत आहेत.

**विनोद**–कामकरी लोकहो, तुह्मीही कामास लागा. मी निकाल करीन.

**कामकरी**--इतकं सरळ उत्तर मिळाल्यावर आमची ना नाहीं महाराज.

**विनोद**–विलास, मनांत कांहीं संकोच धरूं नका. होणार तें होणार. त्यांत तुह्मी काय करणार? पण आतांतरी पुढें व्यवस्थित रीतीनं चाला.

**विलास**–मला ती व्यवस्था नकोन् कांहीं नको. आपण सर्व संभाळा.

**कौतुक**--आह्मी आपले नोकर ह्मणून राहूं. ( दोघे हात जोडतात. )

**लीला**--कले, सांग, आतां कोणाचं खरं झालं?

[ **पद**--" पानसुपारी०" ही चाल. ]

**कौतुक-विलास । झाले बघ विनोददास ॥ ( कला– ) मीहि ना उदास । झालें बघ विनोददास ॥ ध्रु० ॥ ( विद्या- ) कळलें जगाला । यश उद्यमाला॥ ( धुरंधर व सगुणा– ) शेवट हा गोड भारी । अति सुखकारी ॥ ( विनोद– ) प्रेमसंसारी ॥ या प्रेमसंसारीं । कथा रम्य सारी ॥ १ ॥**

**गुणग्राही**–( लोकांस ) जा तर मग तुह्मी, आतां कां उभे राहिलां?

**सर्व घेणेंकरी, नोकर इ०**—हो हो, जातों. विनोदांचा जयजयकार.

**पडद्यांत**—विनोदांचा जयजयकार. थांबा. पेढे घेऊन मग जा.

**कित्येक**--पेढे? कसले पेढे?

( विनोदाचे कारागीर, कारभारीमंडळ व इतर नोकरांचा घोळका हार तुरे, पेढे, मिठाईच्या छबड्या, पागोटीं, शेले इ० सह प्र० क० )

**कारभारी**--विनोद महाराजांचा जयजयकार!

**विनोद**--काय हो म्यानेजर, काय आहे गडबड ही?

**कारभारी**--दोन तीन आनंदाच्या बातम्या! आपलीं सर्व पेटंटें पास होऊन आलीं,सरकारांतून बारोनेटची पदवी, आणि अमेरिका, फ्रान्स, जर्मनी,

इटली, जपान वगैरे ठिकाणच्या प्रदर्शनांतून चांद आले आहेत. सर्व मंडळींना तेथेंच पेढे वाटले तरी पण त्यांना आपला आनंद आवरेनासा होऊन सर्व यथाशक्ति आपला बहुमान करीत आहेत.

**कांहीं**--आह्मीं बंगल्यावर गेलों होतों, पण आपण इकडे आल्याचं कळलं तेव्हां इकडे आलों. आजच्या आनंदाला पारावार नाहीं.

**विनोद**--आनंदाची गोष्ट आहे. पण हा माझा एकट्याचा नव्हे. त्यांत सगळ्यांचा भाग आहे. तेव्हां कारभारी, माझ्या तर्फेनें आणखी कांही हारतुरे, पानसुपारी व मिठाई आणवा.

**कारभारी**--सगळी कांहीं तयारी आहे. आधीं सगळ्यांची सेवा घ्यावी मग तें होईल. या, मंडळींनो, एकेकजण या. कोणीही पेढे घेतल्याशिवाय जाऊं नका अशी सर्व मंडळींना प्रार्थना आहे. चला या एकेकजण

**धुरंधर**--( पुढें होऊन) थांवा; या आनंदांत प्रथम मला भर घालूं द्या. विनोद, आज तुम्ही जर माझ्या इथेंच असतां तर तुमचा गौरव करण्याचा बहुमान प्रथम मलाच मिळाला असता; तथापि गुणग्राहींच्या औदार्यानं तो आज मला मिळत आहे यावद्दल मला धन्यता वाटत आहे. यावेळीं येथच्या येथें मला तुम्हाला देण्यासारखा नजराणा म्हणजे ही माझी लीलाच-- तुम्हां उमयतांचें प्रेमही आहेच--तेव्हां आणा तुमचा हात, सर्व जयघोष करतात.

[ **पद**--"मत बढो बढो जी मिया०" ही चाल. ]

**तुह्मि गुणी, गुणी ही बाळा, संतोषें देत तुम्हाला ॥ ही सांभाळा ॥**
**(सगुणा--)व्हासुखो, सुखी जगताला, लावा जन उद्योगाला ॥ ध्रु० ॥**
**(धुरंधर--) आधुनिक संसारी सावित्री ही माना ॥ (सगुणा--)उद्योगी सत्यवान तुम्हि इस जाणा ॥ ( धुरंधर-) प्रेमसंसारा । सुखरंगभरा ॥**
**(सगुणा--) विसरा अवमान सारा ॥ (धुरंधर--) पूर्वसंबंध सारा ॥**
**(विनोद--) पार न आजि उपकारांला ॥ (दोघे--) करा क्षमा आम्हांला॥१॥**

**सर्व**--( पुन्हां मोठ्यानें ) संसारी--सावित्री ! उद्योगी--सत्यवान !

**गुणग्राही**--धुरंधर, विनोदांचा गौरव करण्याचा अग्रमान आपल्यांस दिल्याबद्दल आपण माझे आभार मानिलेत पण तो मान आपलाच. यांना प्रथम हात आपण दिला व माझ्या स्वाधीन आपल्या लीलादेवीनेंच केलें. विनोद, या आनंदांत मी कशानें भर घालूं? कारण माझं आहे तें मी आधींच तुह्मांला दिलं आहे. तरीपण वृद्धापकाळीं तुम्हांला देऊन निश्चित होण्यासारखं अजून एक

उरलं आहे तेंच देऊन मी तुमचा गौरव करतों. ये, विद्ये ये. आणा तुमचा हात. ( दोघांचे हात एकत्र करतो. )

**विनोद**--आपल्या या अमूल्य देणगीबद्दल मी आभारी आहें. ( जयघोष )

**सगुणा**--काय कले, काय विचार आहे आतां तुझा ?

**कला**--मला माझ्या वेडेपणाचा पश्चात्ताप होत आहे. माझ्या मनाच्या अनिश्चितपणामुळं हा सगळा विचित्र प्रकार घडून आला. या अनिश्चितपणाला योग्य शासन म्हणजे एक आत्महत्या किंवा अविवाहित राहणं. यापैकीं, आत्महत्या हें कृत्य निषिद्ध असल्यामुळं मी अविवाहित राहणार व विनोदलीलांची आजन्म सेवा करणार.

**वि०**--मी देखील अविवाहित राहून प्रेम्यांच्या प्रेमसंसाराला मदत करणार.

**कौतुक**--मी आपली पुन्हां चौपदरी घेणार ! ( हंशा )

**दोघे**--आम्हांस मुक्त केलें हेच विनोदांचे आमच्यावर मोठे उपकार आहेत.

**धुरंधर**--आजच्या आनंदाच्या प्रसंगीं मी यासंबंधानं आतां कांहीं बोलूं शकत नाहीं. सगळ्या गोष्टी नेचरच्या इच्छेप्रमाणेंच घडून येत असतात. आपला पुढचा क्रम सुरू करावा.

**विनोद**--आपापल्या मताबद्दल जो तो स्वतंत्र आहे; तथापि मला इतकंच सांगायचं कीं, या विनोदलीलांवर कोणाचीच अवकृपा नसावी.

( एकेक येऊन विनोद, लीला व विद्या यांच्या गळ्यांत हारतुरे घालतात. विनोद आपल्या आधीं गुणग्राही, सगुणा व धुरंधर यांचा प्रत्येक वेळीं मान ठेवतो. )

**सर्व**--मोठयानें, उद्योगी--सत्यवानाचा जयजयकार.

[ **पद**—ईशस्तुति. ]

**प्रणति प्रणयेश्वरा प्रमद प्रमदा मदभरा ॥ ध्रु० ॥ विमल प्रेमांजनें ॥ निवळवी जनमनें ॥ करि अलंकृत गुणें । प्रियप्रिया सुंदरा ॥ १ ॥ वाढवी बलमदा । रूपश्रीसंपदा ॥ रंगरस सर्वदा । रसिकरसिकावरां॥२॥ विरति तशि अविरती । एक करि संप्रति ॥ उभयिं पुरुषार्थरति देइं सुखविस्तरा ॥ ३ ॥ उद्यमाचे घरीं । ऋद्धिसिद्धी खरी ॥ जनमना हें कळे जरि ॥ हर्ष कवि-अंतरा ॥ ४ ॥** ( पडदा. )

[समाप्त.]

॥ श्रीप्रेमसंसारार्पणमस्तु ॥

# खालील मजकूर लक्ष्य देऊन वाचून पहा.

कान फुटणें, कानांतून पू व रक्त येणें, ठणका लागणें, सूज येणें, कानांत आवाज होणें, दडा बसणें व कमी ऐकूं येणें वगैरे विकार आमच्या दवाखान्यांत खात्रीनें बरे केले जातात. यंत्राच्या सहाय्यानें कान तपासणें, कान धुणें व औषधें घालणें वगैरे काळजीपूर्वक केलें जातें. केव्हांही कानांत कंड सुटली किंवा खुटखुट होऊं लागलें कीं कानांत बोट वगैरे घालून कधींही खाजवूं नये. हा कानाच्या रोगांचा आरंभ होय. अगदीं प्रथम गाईचें किंवा म्हशीचें थंड दूध कानांत घालून ५ मिनिटांनीं ओतून टाकावें. असें त्याच वेळेस ३ । ४ वेळ करावें व मग आम्हास भेटावें. दुसरें कोणतेंही औषध कानांत घालूं नये. जीं मुलें दूध पितांना कान खाजवितात त्यांच्या आयांनीं वरील उपचार प्रथम करून नंतर मुलांना तावडतोब आमचेकडे घेऊन यावें. पुढील उपचार आम्ही करूं.

पहिल्या दिवशीं ज्या मानानें औषध लागेल त्या मानानें ४ चार आण्यांपासून दीड रुपयापर्यंत खर्च येतो. पुढें प्रत्येक दिवशीं फारतर २ दोन आणे खर्च येतो. १ औंसाची बाटली किं. १ रु. सुमारें १० दिवसपर्यंत पुरते. १ डबी किं. ॥. रु. सुमारें १५ दिवसपर्यंत पुरते. जितकें औषध अगदीं जरूर तितकेंच देण्यांत येतें. आमचेकडे येऊन कान तपासवून कर्णरोग प्रतिबंधक उपाय सर्वांनीं अवश्य करावा. ऑरीनचा मोठा सांठा तयार आहे. व्यापाऱ्यांनीं ऑरीन विक्रीस ठेवावें. ऑरीन नोटबुक. किं. ८॥. ऑरीन एक्झरसाईझबुक किं. ८।. ऑरीन खेळण्याचे पत्ते किं. ८२॥.

व्यापाऱ्यांना कमिशन भरपूर मिळेल.

# डॉ. गाडगीळ यांचा कानाचा दवाखाना.

भीमराव आत्माराम यांच्या वाडींत आंतील बंगल्यांत तिसरा मजला,
ठाकुरद्वार, पोष्ट काळबादेवी—**मुंबई** नं. २.

## કાનના રોગીઓને અગત્યની ચેતવણી.

જ્યારે કાનમાં ખુજલી થાય ત્યારે ગો માતાનું કે ભેંસનું દૂધ નાખો. પાંચ મિનીટ પછી કાઢી નાખો. એવીરીતે તેજ વખતે ચાર પાંચ વખત કરો અને તરત અમને મળો.

**ડા. ગાડગીળનું કાનનું દવાખાનું**:—ભીમરાવ આત્મારામની વાડીમાં બંગલામાં ત્રીજે માળે ઠાકુરદ્વાર, પોષ્ટ કાળબાદેવી, **મુંબઇ.**

# सर्व पुस्तकें

## एकेच ठिकाणीं मिळण्याजोगें

### उत्तम ठिकाण

ह्मणजे

आज ५० वर्षांवर सारखा चालू असलेला

## नारायण रामचंद्र सोहोनी

यांचा

# बुकडेपो

## हें होय !

व्यापारी व मास्तर लोकांस भरपूर कमिशन देऊन माल व्ही. पी. नें वेळेवर पाठविला जातो. एकवेळ मागणी करून खात्री करून पहा !

पत्ता:-गिरगांव, मुंबई.

## पुस्तकांची यादी फुकट !